❑ मुख्य संपादक ❑
अरविंद भंडारे

❑ संपादकीय मंडळ ❑
शांतारामजी इंगळे
रोहीणी जुवाटकर - भंडारे
विशाल मोरे, संतोष आयरे

❑विधी सल्लागार ❑
अनिल वैद्य (माजी न्यायाधिश)

❑प्रकाशक ❑
पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई

❑सल्लागार मंडळ❑
नागसेन गमरे, अरुण वाघमारे,
अरुण साळुंके, रॉकेश यादव,
रामचंद्र सकपाळ, विकास ढवळे

❑संपादकीय पत्रव्यवहार❑
अरविंद भंडारे
५४/७८, बी. डी. डी. चाळ,
वरळी, मुंबई - ४०० ०१८.
भ्रमणध्वनी: ९९६७६९२०१४

हे त्रैमासिक पालि रिसर्च इन्स्टिट्यूट,
मुंबई यांनी खाजगी वितरणाकरीता छापून
**पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई**
५४/७८, बी. डी. डी. चाळ, वरळी,
मुंबई - ४०० ०१८. येथून प्रसिद्ध केले. या
**त्रैमासिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**

**किंमत रु. ५०/-**
**वार्षिक वर्गणी रु. २००/-**
**पंचवार्षिक वर्गणी रु. १०००/-**
**आजन्म वर्गणी रु. ५०००/-**

❑ मुखपृष्ठ सजावट ❑
अमोल सुर्यकांत कांबळे

❑अक्षर जुळणी❑
पी.सी.मॅन कॅम्प्युटर,
दादर

*पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई चे मुखपत्र*

# बुद्धसासन

**त्रैमासिक, मराठी**

वर्ष ५ वे, अंक १७ वा, ऑक्टो. ते डिसेंबर २०२२ बुद्धाब्द २५६६

## अनुक्रमणिका

◆ संपादकिय 3

◆ पालि विनय-पिटकातील तंत्राचा केंद्रबिंदू 5
**– सुनीतीकुमार पाठक**

◆ पालि भाषा: प्रचारातील समस्या आणि संभावनाा 9
**– महानागरत्न**

◆ प्रवारणा (पवारणा) 16
**– अरुण वाघमारे**

◆ आयुर्वेद आणि विपश्यना 29
**– प्रो. अंगराज चौधरी**

◆ विध्वंसाबाबत सिंहाचे प्रश्न 36
**– पॉल कॅरस**

◆ कुशल कर्माचा मूलाधार शील 39
**– भन्ते शुभमचित्त**

## वर्गणीदारांना विशेष सुचना

वार्षिक वर्गणी/आजन्म वर्गणी - पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई ५४/७८, बी. डी. डी. चाळ, वरळी, मुंबई - १८ या पत्त्यावर मनिऑर्डरने किंवा बँक खात्यावर जमा करु शकता.

**Bank Name** : ABHYUDAYA CO. OP. BANK LTD.
**ACCOUNT NAME** : PALI RESEARCH INSTITUTE MUMBAI
**AC NO.** : 013011100064813
**BRANCH** : WORLI
**IFSC CODE** : ABHY0065013
**GOOGLE PAY NO.**: 9967692014

वर्गणीदारांना अंक स्पीड पोस्टने घरपोच हवा असल्यास संपादकांना फोन करुन स्पीड पोस्ट चार्जेस विचारुन पाठविणे. वर्गणीदारांनी नुतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठविताना आम्हांस सूचित करावे.

# पालि भाषा व ब्राह्मी लिपी कार्यशाळा

पालि भाषेचा प्रचार व प्रसार जन सामान्यांपर्यंत व्हावा या सद्हेतूने स्थापन झालेल्या पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबईच्या वतीने दोन दिवसांची पालि भाषा व ब्राह्मी लिपी कार्यशाळा वेगवेगळ्या शहरात/ गावात घेतली जाणार आहे. तरी पालि भाषा व ब्राह्मी लिपी प्रेमी यांनी या सुवर्णसंधीचा अवश्य फायदा घ्यावा. कार्य शाळेची फी नाममात्र असेल.

अधिक माहितीसाठी खालील भ्रमणध्वनीद्वारे किंवा ई-मेलद्वारे संपर्क साधावा.

Email : paliresearchinstitute@gmail.com
Web : www.paliresearchinstitute.com
**अरविंद भंडारे - ९९६७६९२०१४**


प्रिय, जाहिरातदार,

सप्रेम जय भिम,

उपरोक्त संस्थेच्या वतीने पालिभाषेचा पर्यायाने बौद्ध धम्माचा प्रचार सर्वसामान्यांपर्यंत व्हावा. या हेतुने बुद्धसासन नावाचे त्रैमासिक सुरू केले आहे. हे त्रैमासिक पालि भाषेचा, बौद्ध धम्माचा इतिहास, आदर्श संस्कृती, कला, वाङ्‌मय व तत्वज्ञान इत्यादिंना संपूर्ण वाहिलेले आहे. तसेच त्यात महिला व तरूण यांच्यासाठी वेगळे सदर असतील. आपल्या सारख्या सामाजिक बांधिलकी मानणाऱ्यांनी या त्रैमासिकात आपली जाहिरात प्रसिद्ध करून व वार्षिक/आजन्म सभासद बनून समाज प्रबोधनाच्या या कार्यात सहभागी व्हावे हीच आपणांस नम्र विनंती.

आपण जाहिरात देऊन या पवित्र कामास हातभार लावाल ही खात्री आहे.

**जाहिरातीचे दर खालीलप्रमाणे आहेत.**

| **पान** | **दर रूपये** |
|---|---|
| मुखपृष्ठ बाहेरील (रंगीत ) | ६,०००/- |
| मलपृष्ठ आतील (रंगीत ) | ५,०००/- |
| संपूर्ण आतील पान | ४,०००/- |
| अर्धे पान | २,०००/- |
| पाव पान | १०००/- |

**आपला धम्मबंधू**
**संपादक**

**त्रैमासिकासाठी**

| | | |
|---|---|---|
| उत्तर प्रदेश | :- | राजेश चन्द्रा, लखनौ - ९४१५५६५६३३ |
| बिहार | :- | भिक्खु प्रग्यादिप महाथेरो, अखिल भारतीय भिक्खु संघ विहार - ९४७०८५२०७८ |
| मध्यप्रदेश | :- | रामानंद जाधव - ९०९८३०८४०४, जे. पी. पेठारी - ९९२६८०८४६९ |
| नागपुर | :- | महानागरत्न - ८२७५९२११८५ |
| मलकापुर, बुलढाणा | :- | शांतारामजी इंगळे - ९९६०७९६८२७ |
| मुंबई | :- | अरविंद भंडारे - ९९६७६९२०१४ |
| गुजरात | :- | अनिलकुमार पाटील, अहमदाबाद - ९७२५५०५४२२ |

## संपादकिय
## कठीण चिवर दान

कठीण चिवर दान हा एक महत्वपूर्ण बौद्ध समारंभ आहे. बौद्ध मतानुसार हा बौद्ध भिक्खूंना दिला जाणारा सर्वात पवित्र उपहार आहे. चिवर हे भिक्खूंनी परिधान करावयाचे वस्त्र आहे. ज्याचा रंग भगवा असून ते भगवान बुद्धांच्या शिकवणुकीचे प्रतिक आहे. कठीण चिवर दान स्विकारण्याची अनुमती मिळण्यापूर्वी बरेच भिक्खू अंगावर पांसुकुलिक वस्त्र परिधान करत असे. जे स्मशानातील प्रेताच्या अंगावरील फेकून दिलेल्या फाटक्या कापडापासून व इत्यादी वस्त्रापासून बनविलेले असत. भगवतांनी कठीण चिवरासंदर्भात ज्या भिक्खूनी पावसाळयातील तीन महीने (वर्षावास) पूर्ण केला असेल अश्या भिक्खूंना कठीण चिवर स्विकारण्याची अनुमती दिली होती. हे आपण पुढे पाहणार आहोत. कठीण चिवर दानाचे समारंभ प्रवारणा पौर्णिमेपासून (अश्विन पौर्णिमा) ते कार्तिक पौर्णिमेपर्यंत सुरू ठेवण्याची परंपरा आहे. कठीण चिवर दान उपासकांद्वारे एका दिवसांत म्हणजेच सुर्योदय झाल्यापासून पुढील सूर्योदयापर्यंत त्याचे विणणे, कापड कापणे, रंग देणे, सुकवणे, धुणे अशी प्रक्रिया पूर्ण करावी लागते. यामुळेच चिवर स्विकारणारे म्हणजेच वर्षावासाच्या कठीण काळात तीन महिने व्यतित करणारे भिक्खू व तयार करणारे उपासक या दोघांकरिता हे कठीण असल्यामुळे याला कठीण चिवर दान असे संबोधले जाते. विनयपिटकाच्या कठीण स्कंधकात भगवंतांनी भिक्खूंना कठीण चिवर दानाचा उपदेश दिलेला आढळतो. या विनयानुसार कठीण चिवर दान हे सर्वोकृष्ट दान मानले जाते. सुज्ञ, श्रध्दावान उपासकांद्वारे ते पिढ्यान पिढ्या पुढे प्रचारीत झाले तर धम्मातील असे समारंभ विधी टिकून राहतील.आज भारतात जरी कठीण चिवर दानाचा विधी फार क्वचितच विहारांमध्ये साजरा होताना दिसत असला तरी बांगलादेश, बर्मा, थायलंड, श्रीलंका, लाओस, कंबोडिया इत्यादी थेरवादी देशात हे समारंभ फार मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. या प्रसंगी बौद्ध परिवार चिवर घेऊन विहारात आदरपूर्वक चिवर भिक्खू संघाला दान देतात. वर्षावास पूर्ण केलेले भिक्खू हे चिवर स्विकारून उपासकांना आशिर्वाद देतात. प्रत्येक बौद्ध श्रद्धाळू उपासक आपल्या आयुष्यात एकदा तरी कठीण चिवर दान करतात.

**विनयपिटकाच्या कठीण स्कंधकात कठीण चिवरासंदर्भात आलेली कथा :-**

त्या समयी भगवान बुद्ध अनाथ पिंडकाच्या आरामात जेतवनात विहार करत होते. तेव्हा पाठेय्यक (पाठा येथे वास्तव्य करणारे) तीस भिक्खु जे सर्वच्या सर्व अरण्यवासी, भिक्षेवर अवलंबून असणारे, फेकलेले, फाटलेले वस्त्र घालणारे (पांसुकुलिक) तीन चिवर धारण करणारे भगवान बुद्धांच्या दर्शनाकरिता जांत असताना वर्षावास सुरू झाल्याने श्रावस्तीच्या मार्गात येणारे साकेत (अयोध्या) येथे त्यांना वर्षावास करावा लागला. त्यांनी भगवंताचे दर्शन घेता यावे. या उत्कंठेने वर्षावास केला. भगवंत येथून ६ योजन दूर जवळच विहार करत असून ही आपल्याला त्यांचे दर्शन होत नाही. असा विचार करत तीन महिन्यांचा वर्षावास पूर्ण करून पवारणा समाप्तीनंतर पाऊस पडत असताना देखील पाणी साचलेल्या रस्त्यातून, चिखलातून शरीराने, वस्त्राने भिजलेल्या अवस्थेत भगवंताकडे पोहोचले. भगवंतांना अभिवादन करून ते एका बाजूस बसले. भगवंतांनी नवांगतुक भिक्खुंचे कुशल मंगल विचारून पुढे म्हणाले - वर्षावास कसा होता ? चांगला तर होता ना ? एकत्रितपणे मतभेद न राहता व्यतित केला ना ? भोजनासंबंधी काही कष्ट तर झाले नाही ना ? तेव्हा ते भिक्खु म्हणाले - भगवंत आम्ही पाठेय्यक इथपर्यंत भीजत भीजतच आलो आहोत. तेव्हा भगवंतांनी त्यांना एक धार्मिक कथा सांगून भिक्खुंना संबोधित केले की - भिक्खुंनो, मी अनुमति देतो की, वर्षावास पूर्ण केलेले भिक्खू कठीण चिवर स्विकारू शकतात.

**कठीण संदर्भात भिक्खूंकरिता विधान (नियम) :-** कठीण स्विकारल्यानंतर भिक्खुंनो या पांच गोष्टी तुम्हास नियमातीत असतील.

१) विना आमंत्रण पोहोचणे. २) तिन्ही चिवर धारण केल्याशिवाय विचरण करणे. ३) गणासह भोजन करणे. ४) इच्छेनुसार चिवर घेणे. ५) चिवर दान देते वेळी जो तिथे असेल चिवर त्याचे होईल.आणि भिक्खुंनो, कठीण करिता याप्रकारे ठराव केला पाहिजे. वरीष्ठ समर्थ भिक्खू संघाला सूचित करेल की

**ज्ञप्ति (सूचना) :-**

भन्ते! संघाने माझे ऐकावे. हे संघाकरिता कठिण बनविण्याकरिता कापड प्राप्त झाले आहे. जर संघाला हे उचित वाटत असेल तर या कठिण कपड्याला अमूक भिक्खुला परिधान करण्यासाठी देऊ. ही सूचना आहे.

**अनुश्रवण :-**

१) भन्ते! संघाने माझे ऐकावे. संघाला हे कठीण साठी कापड मिळाले आहे. संघ याला अमूक नावाच्या भिक्खुला परिधान

करण्यास देत आहे. ज्या भिक्खुंना हा कपडा अमूक नावाच्या भिक्खुला देणे पसंत असेल त्यांनी गप्प राहावे. ज्यांना पसंत नसेल त्यांनी बोलावे. (२) दुसरी वेळ...(३) तिसरी वेळ....

**धारणा :-**

संघाने कठिणच्या या कपड्याला अमूक नावाच्या भिक्खुला परिधान करण्यास दिला आहे. संघाला पसंत आहे. म्हणून संघ गप्प आहे. असे मी समजतो.अश्याप्रकारे कठिण चिवरासंबंधी माहिती आपणांस विनयपिटकाच्या कठीण स्कंधकातून प्राप्त होते. ज्यात कठिण चिवरासंबंधी नियम, कठीण चिवराची उत्पत्ती व कठीण चिवराचे अविघ्न अशी सखोल माहिती उपलब्ध होते. वरील माहितीच्या आधारे सामान्य उपासकांना या विधी समारंभाविषयी माहिती उपलब्ध व्हावी. याकरिता छोटासा लेखप्रपंच!

## बुद्ध धम्मात पौर्णिमांचे महत्व

**अश्विन पौर्णिमा** :- अश्विन पौर्णिमेला वर्षावास समाप्त होतो.

**कार्तिक पौर्णिमा** :- नदी काश्यप, उरूवेला काश्यप, गया काश्यप या तीन काश्यप बंधूची धम्मदिक्षा. धम्मसेनापती सारिपुत्तांची धम्मदीक्षा, अग्रश्रावक महामोग्गलान यांचे परिनिर्वाण.

**मार्गशीर्ष पौर्णिमा :-** नालागिरी हत्तीवर भगवान बुद्धांचा करुणामयी विजय.

---

## दिनविशेष

2 ऑक्टोबर :- महात्मा गांधी जयंती, लाल बहादूर शास्त्री जयंती.
9 ऑक्टोबर :- धर्मानंद कोसंबी जन्मदिवस.
11 ऑक्टोबर:- थिक नाथ हान्ह जन्मदिवस.
28 नोव्हेंबर :- महात्मा जोतिबा फुले स्मृतिदिन, अलेक्झांडर कनिंघहम स्मृतिदिन.
6 डिसेंबर :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाप्रयाण दिन.
12 डिसेंबर :- भैय्यासाहब आंबेडकर जयंती.
20 डिसेंबर :- राष्ट्रसंत गाडगेबाबा स्मृतिदिन.
27 डिसेंबर :- प्रो. व्हिस डेव्हिड स्मृतीदिन.

### धम्मचक्र

पालि भाषा, तिपिटक साहित्याच्या प्रचार आणि प्रसाराच्या उद्देशाने बुद्ध धम्म संघाला समर्पित, धम्मचक्राला गतीमान करण्याच्या हेतूने तसेच सामाजिक मुद्दयांवर समयानुसार होणाऱ्या घटनांची सत्य माहिती प्रस्तुत करण्याकरीता पाक्षिक धम्मचक्र पाठकांकरीता नियमित प्रस्तुत केले जात आहे.

- **शांतारामजी इंगळे,** संपादक धम्मचक्र

## पालि विनय-पिटकातील तंत्राचा केंद्रबिंदू

- सुनीतीकुमार पाठक

'तंत्र' या संकल्पनेची व्याख्या 'सर्व जगातील सर्व प्राण्यांच्या मर्यादेच्या पातळीपर्यंत मनुष्याची वैयक्तिक ऊर्जा वाढवण्याची एक पद्धत' अशी केली जाऊ शकते. विश्वात व्यापलेली ती ऊर्जा म्हणजे वैश्विक ऊर्जा.

'तंत्र' हा शब्द संस्कृत मूळ 'तन' या शब्दापासून आला आहे, ज्याचा अर्थ 'विस्तार करणे', 'पसरवणे'. तंत्र हे असे व्यावहारिक तसेच वैज्ञानिक ज्ञान आहे जे मनुष्याच्या चांगल्या आणि सजीवांच्या कल्याणासाठी क्षमता कशी वाढवायची हे सांगते. तंत्राचा उद्देश एखाद्या व्यक्तीच्या जीवनशक्तीचा वैश्विक पातळीपर्यंत विस्तार करणे हा आहे; म्हणजे, व्यक्तीचे आतील तेज वैश्विक तेजावर पसरणे.

तंत्राचा उगम कसा झाला याबद्दल एकमत नाही आणि त्याबद्दल इतरत्र तपशीलवार चर्चा केली जाऊ शकते. थोडक्यात, मानवी संस्कृतीच्या आदिम काळापासून मनुष्याच्या मनाला प्रभावित करणाऱ्या निसर्गाच्या नियमांतून तंत्राचा उगम झाला असावा. मानवी इतिहासाच्या सुरुवातीच्या काळात आदिम माणसांनी स्वत:मध्ये अंतर्भूत असलेल्या शक्तीचे अस्तित्व शोधले. त्यांनी पृथ्वी, सूर्य, चंद्र, ग्रह आणि तारे या सर्वांवर अधिराज्य गाजवणाऱ्या त्या शक्तीचे मूर्त स्वरूप पाहिले.

त्यांच्यासमोर जे सत्य प्रकट झाले होते ते ऊर्जेचे दुहेरी प्रकटीकरण होते, म्हणजे संभाव्य ऊर्जा, वरवर पाहता स्थिर वाटते, पण ती तशी नसते; आणि, गतिज ऊर्जा सतत बदलणारी आणि अस्थिर दिसते. निसर्गातील विविधतेमध्ये समानता आणि सममिती शोधण्यासाठी तंत्र हा सार्वत्रिक दृष्टिकोन आहे. तंत्र हे विश्वातील प्राणिमात्रांच्या 'स्व-भावा'ची जाणीव निर्माण करते आणि युगानुयुगांच्या विकासाच्या प्रक्रियेतून ते विकसित झाले आहे.

मानवी ज्ञानाची एक शाखा म्हणून तंत्राचे संहितीकरण नंतर झाले. सुरुवातीच्या भारतीय समाजांमध्ये जेव्हा गूढ पद्धती परिचित झाल्या तेव्हा तंत्र पद्धतीही दुर्लक्षित राहिल्या नाहीत आणि त्याही स्वीकारल्या गेल्या आणि नंतर संहिताबद्ध केल्या गेल्या. अनेकांचे असे मत आहे की, श्रुती दोन प्रकारच्या आहेत, वैदिक आणि तांत्रिक. भारतीय साहित्यातील अथर्ववेद, मंजुश्रीमूलकल्प आणि जैनांचे मंत्रशास्त्र ही संहिताकरणाची उदाहरणे म्हणून सांगता येऊ शकतात. जेव्हा तंत्राचे सुव्यवस्थिकरण केले गेले नव्हते त्यावेळेस प्रचलित असलेल्या अनेक प्रथा, चालीरीती, संस्कार आणि प्रथा आदिम लोकांनी आत्मसात केल्या. त्यानंतर त्यातूनच सुव्यवस्थिकरण आणि स्तरीकरण प्रक्रियेतून तंत्र तयार झाले. तंत्र मनुष्याच्या जीवनाचा आधार तयार करते, ज्याच्यानुसार त्याची दैनंदिन कार्ये, जीवनपद्धती, समानतेची स्थिती प्राप्त करण्याचा त्याचा प्रयत्न आणि शेवटी उर्जेच्या दुहेरी अभिव्यक्तींचे एकीकरण पाहणे यांचे निर्धारण होते.

या द्रष्ट्या लोकांकडे विश्वाच्या कल्याणासाठी कार्य करण्यासाठी आणि ती पूर्ववत करण्यासाठी एक आसन्न जीवनशक्ती असते. त्यांच्या कृती अधूनमधून गूढ, चमत्कारिक आणि अलौकिक असतात आणि कधी कधी माणसाच्या सामान्य बुद्धीला आणि तर्कशक्तीला न उमजण्यासारख्या असतात. या द्रष्ट्यांभोवती पसरलेले तेज हे लौकिक विश्वाला एकरूप करते. तंत्र हे अनेक गुप्त सूत्र आणि गूढतेच्या पद्धतींची योजना करते, त्याद्वारे शांती स्थिरता शोधणारा साधक त्याच्या जीवनकाळात इच्छित ध्येये साध्य करण्यात यशस्वी होऊ शकेल.

**धम्मचक्क पवत्तन**

शाक्यपुत्र गौतमाने जागृत (बुद्ध) होण्याचा मान मिळवला असे म्हटले जाते, धर्माचे चाक फिरण्यापूर्वी (धम्मकक्कपवत्तन) उपकाबरोबरच्या चर्चेत गौतम बुद्ध अमरत्वाची घोषणा करतात -

सर्वांवर विजय प्राप्त, मी सर्वज्ञ आहे.
सर्व विकारांपासून, तृष्णेपासून, मृत्यूपासून मी मुक्त झालो
स्वत: ला जाणून, मी अनुसरण करतो
माझा कोणीही शिक्षक नाही
माझ्यासारखा दुसरा कोणीच अस्तित्वात नाही,

त्याच्या देवांसह जगात कोणीही माझ्या बरोबरीचे नाही.
मी सर्वोच्च गुरु आहे,
कारण मी या जगात परिपूर्ण आहे,
मी जागृत आहे,
मी निर्वाण प्राप्त केले आहे....

वरील ओळींतून परावृत्तीकडे झुकणाऱ्या तंत्र पद्धतीच्या गाभ्याचा स्पष्टपणे संदर्भ मिळतो. एक यशस्वी साधक आत्मविश्वासाने घोषित करतो की, 'माझ्या बरोबरीने कोणीही नाही, मी सर्वजागृत आहे'. मनाला तृष्णेपासून मुक्त करून

मनुष्याचा स्व-भाव परत मिळविणाऱ्याची ही वैशिष्ट्ये आहेत. हे शाक्यपुत्र गौतमाने स्वत:ची बढाई मारण्याचे किंवा खोटा अहंभाव दाखवल्याचे उदाहरण नाही.

बौद्ध वाङ्मयात मनुष्याच्या 'स्व' त्वाचे प्रकटीकरण कसे करावे याचे उपाय सांगितले आहेत. एखाद्या जीवाची जीवनशक्ती बिंदूमधून बाहेर पडते आणि बिंदूमध्ये विरघळते, म्हणजेच ती ज्या स्थितीपासून उत्पन्न होते त्याच स्थितीत पुन्हा येते. ही (पदार्थाची) प्रत्यावर्तनाची किंवा परत फिरण्याची स्थिती किंवा उलटा प्रवास आहे. मानवाच्या खोल मनात अशीच प्रक्रिया घडते. परावृत्ती ही प्रवृत्ती आणि निवृत्तीपेक्षा वेगळी आहे. गौतम बुद्धांच्या मते, मानवासह सर्व सजीव हे अज्ञानामुळे (अविद्या) अव्यक्त प्रभावांच्या (संस्कार) अधीन दृढ आसक्ती (उपादान) असलेले मन आणि पदार्थ (नाम-रूप) यांचे एकत्रीकरण आहेत. त्यामुळे हे त्यांच्या स्व-स्वभावापेक्षा भिन्न आहे. स्वभावाविषयीच्या अज्ञानामुळे मनुष्य सदैव क्षणिक सुखांमध्ये रममाण होऊन पुन्हा-पुन्हा जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात अडकतो.

जीव हा मृत्युशून्यता काय आहे हे जाणून घेण्यास अयशस्वी होऊन मृत्यूच्या छायेत तृष्णेच्या बंधनात आनंद मिळवतो.

गौतम बुद्ध 'स्वत:ला' जाणून 'विजयी' (जिन) बनतात. ते म्हणतात, 'सर्वांमध्ये विजयी मी सर्वज्ञ आहे... स्वतला जाणून घेऊन.' माणसामध्ये सर्वज्ञता आहे. अज्ञानामुळे मनुष्य त्याच्या आत्मस्वरूपाची जाणीव करू शकत नाही. तंत्र आत्म स्वरूपा (स्वभाव) ची कल्पना कशी करायची हे शिकवते, जो सारहीन (निहस्वभाव) आहे. जो सारहीनतेची कल्पना करतो तो झोपेसारख्या अज्ञानातून 'जागृत' (बुद्ध) असतो.

भगवान गौतम बुद्ध म्हणतात:
अनेक भरती-ओहोटींमधून मी जिंकलो आहे. पुरे!
मी ते का ओळखावे ?
वासनेने आणि द्वेषाने ग्रासलेल्या लोकांना,
हा धम्म समजत नाही,
प्रवाहाच्या विरोधात पुढे चालणारा,
सूक्ष्म, खोल, दिसण्यास कठीण, नाजूक, अदृश्य,
अज्ञानाची कस्तुरी पांघरलेल्या
वासनेच्या गुलामांना तो दिसणार नाही....

बुद्धाच्या शिकवणी देखील 'प्रवाहाच्या विरोधात अग्रेसर' आहेत; परंतु या डोळयांची दृष्टी (चक्खु) आणि मनाची जाणीव (नानकरणी) विकसित करण्यासाठी सहाय्यक आहेत. त्यांच्या अनुयायांकडे योग्य दृष्टी (सम्मादिट्ठि) आणि योग्य एकाग्रता (सम्मासमाधि) साठी जगामध्ये (योनिसुमनसिकार) स्त्रोत किंवा मूळ प्राणी यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी योग्य चिंतन आहे. 'प्रवाहाच्या विरुद्ध जाण्याने प्राण्यांचा स्व-स्वभाव अचूकपणे पाहिला जातो. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, तंत्रात अवलंबिलेल्या प्रत्यावर्ती पद्धती (परावृत्ती) विधी पद्धती केल्या जातात. बुद्धत्व प्राप्त करण्यासाठी पाच वासनांचे कसे शमन करायचे याचा शोध तंत्र घेते. भगवान तथागत म्हणतात.

'मी शांत झालो,
निर्वाण प्राप्त झाले'.
अज्ञानी लोकांत आत्मविश्वासाने भगवान बुद्ध निर्वाणाचा ढोल वाजवतात.

त्यानंतर, गौतम बुद्ध जगातील समस्त मानव, प्राण्यांच्या कल्याणासाठी काशी नगरात धम्मचक्क प्रवर्तित करतात.

**भगवान बुद्धांच्या धम्माचे स्वरूप**

भगवान बुद्धांनी पाच परिव्राजकांच्या (पंचवग्गियभिक्खु) समुहासमोर प्रवचन देण्या आधीच्या बुद्धांच्या धम्माच्या स्वरूपाचा संदर्भ पालि विनयपिटकात मिळतो. गौतम बुद्धांचे शब्द पुढीलप्रमाणे आहेत:'

मी जाणलेला धम्म खोल आहे पाहण्यास कठीण आहे, समजण्यास कठीण आहे, शांततापूर्ण आहे, उत्कृष्ट आहे, द्वंद्वाच्या पलीकडे आहे, सूक्ष्म आहे, शिकलेल्यांना समजण्यास सुगम आहे.'

ते पुढे म्हणतात:

'परंतु इंद्रियसुखाने आनंदित होणारी इंद्रियसुखाने प्रसन्न होणारी, इंद्रियसुखात पुन्हा सामील होणारी ही सृष्टी आहे. त्यामुळे इंद्रियसुखात आनंदित होणारी सृष्टी, इंद्रियसुखाने प्रसन्न होणारी, इंद्रियसुखात पुन्हा सामील होणारी ही सृष्टी पाहणे अवघड आहे. म्हणजे सर्व सवयी प्रवृत्ती शांत करणे, सर्व आसक्तींचा त्याग, तृष्णा, वैराग्य, थांबणे, निर्वाण या गोष्टी कठीण आहेत.

सम्मासम्बुद्ध (पूर्णपणे जागृत) आपल्या ज्ञानचक्षूंद्वारे (बुद्धचक्कू) जगाचे अस्तित्व पाहतो आणि तो जिथे पाहतो तिथे घडण्याची वास्तविक स्थितीचे आकलन करतो

(यथाभूतज्ञानदर्शन). त्यामुळे कोणताही द्वंद्ववाद उद्भवत नाही आणि त्याचा धम्म द्वंद्ववादाच्या पलीकडे आहे. तंत्र कोणत्याही वादविवादाला किंवा संघर्षाला नाकारते कारण ते सत्याच्या थेट प्रकटीकरणावर आधारित आहे.

**उत्तरमनुस्सधम्म**

शाक्यपुत्र गौतम, काशीजवळील इसिपतन येथे पाच परिव्राजकांच्या गटाकडे जात असताना, त्या परिव्राजकांनी त्यांना पाहताच त्यांचा आदर न करण्याचा निश्चय केला कारण त्यांनी अगोदरच या परिव्राजकांची संगत सोडली होती. परंतु बुद्ध त्यांच्यासमोर प्रकट होताच त्यांचा दृढनिश्चय डळमळीत होऊ लागला. हे चमत्काराचे उदाहरण नाही किंवा मोहिनी (इद्धी) नाही. बुद्धत्वाच्या अवतारातून पसरलेल्या तेजाने एकाच वेळी त्या पाच परिव्राजकांना गोंधळात टाकले आणि क्षणार्धात त्या सर्वांनी जागृत बुद्धाला वंदन केले. अशा घटनांमुळे सामान्य लोक अचंबित होतात आणि आश्चर्यचकीत होतात.

पालि विनयापिटकात अशा अनेक उदाहरणांमध्ये बुद्ध गौतमाशी संबंधित अशा कथांचे संदर्भ मिळतात. उदाहरणार्थ, राजायतन कथा, गौतमाच्या रक्षणासाठी ज्याने आपली फणा पसरवली होती त्या नागाची मुचलिंद कथा आणि तपुस्स आणि भल्लिका कथा ज्यामध्ये चार लोकपाल देवता तथागतासाठी भेटवस्तू स्वीकारताना दिसतात.

**ब्रह्मचर्य**

गौतम बुद्धांनी ब्रह्मचर्यावर म्हणजेच दु:खाचा अंत करण्याचा मार्ग म्हणून नैतिक जीवन जगण्यावर सर्वात जास्त भर दिला, असे म्हटले जाते. भगवान बुद्धांनी केलेल्या पहिल्या आदेशात ब्रह्मचर्याची स्तुती आढळते.

ब्रह्मचर्य पाळण्यात कोणतीही कसूर होणे म्हणजे संघातून भिक्षुत्वा (पाराजिक अपराध) पासून हकालपट्टी होणे होय. पिवळया वस्त्रांनी पाळल्या जाणाऱ्या नैतिक नियमांपैकी ब्रह्मचर्य हे अग्रगण्य आहे.

ब्रह्मचर्याचे पालन चार ब्रह्मविहार करण्याची क्षमता मिळविते, म्हणजे प्रेम (मेत्ता), करुणा (करुणा), इतरांच्या उन्नतीत आनंद (मुदिता) आणि सुख-दु:खात उदासीन वृत्ती (उपेख्खा) ब्रह्मकायिक देवतांसारख्या जगातील प्राणीमात्रांचे भले करण्यासाठी आणि कल्याण करण्यासाठी हळूहळू शुद्धीकरण करण्याच्या प्रकियेतून ब्रह्मविहार एका साधकाला सक्षम करते.

ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा आणि साधकाच्या शिस्तीसाठी नैतिक नियमांचे पालन करण्याबाबत तंत्र तितकेच कठोर आहे. ब्रह्मचर्यापासून यत्किंचितही दूर निघून गेल्याने संपूर्ण नाश होतो. गुह्यसमाज म्हणते जेव्हा शरीर, वाणी आणि मन - आपापल्या स्थितीत राहते तेव्हा बोधि प्राप्त होते. त्यापासून पतन होणे म्हणजे, साक्षात मृत्यू आणि नरकाच्या दलदलीत लोळणे.

**गूढ अभिव्यक्ती (संध्याभास)**

जेव्हा अधूनमधून अभिव्यक्तीचे अनेक गूढ प्रकार वापरले जातात तेव्हा तंत्र हे भगवान बुद्धांच्या धम्माच्या स्वरूपाचे औचित्य सिद्ध करते. उदाहरणार्थ, गुह्यसमाज म्हणते: महायानाच्या आवश्यकतेनुसार, आई, बहीण किंवा मुलगी यांच्या सहवासाची इच्छा करणारा साधक महान यश प्राप्त करेल.

अशा अनेक उक्ती यात वाचायला मिळू शकतात.

सर्व प्रकारच्या इच्छांचा उपभोग घेतल्याने, आणि इतरांना हवा तितका आनंद देणारे बनून माणूस लवकर बुद्धत्व प्राप्त करू शकतो. विनयपिटकात नमूद केल्याप्रमाणे अशा सर्व अभिव्यक्ती (दुरानुबोध) समजण्यास कठीण आहेत. अशा गूढ अभिव्यक्तींच्या (संध्याभास) औचित्याचे स्पष्टीकरण देताना चंद्रकीर्ती म्हणतात:

'वेगवेगळया आवडीनिवडी असलेल्या व्यक्तींमध्ये सत्याचे (धम्म-तत्त्व) महत्त्व व्यक्त करण्यासाठी संदिग्ध अभिव्यक्ती वापरल्या गेल्या आहेत आणि याला संध्याभास असे म्हणतात.

'व्यक्तींच्या आकलन क्षमतेच्या अशा वैविध्यपूर्ण अवस्थेबद्दल पालि विनयपिटक हे भगवान बुद्धांच्या ज्ञानचक्षूंनी प्राण्यांच्या मानसिक अवस्थेद्वारे भगवान बुद्धांचे दर्शन घडविण्याचा संदर्भ देते. मोठ्या सरोवरातील कमळांची उत्कृष्ट उपमा या स्थितीचे स्पष्टीकरण करते.

**पालिमध्ये प्रजनोपाय (वज्रब्जा) योग नाही**

पालि विनयपिटक हे तंत्र जसे मानते त्याप्रमाणे प्रज्ञा (शहाणपणा) किंवा करुणा यांना किंवा अद्वैततेकडे जाणारे त्यांचे एकीकरण म्हणजे (युगनद्ध) किंवा एकता (समरस) यांना तत्त्वे म्हणून संबोधत नाही. असे असूनही, पालि विनयपिटक

ध्यानाच्या उच्च अवस्थेवर भर देते जेव्हा ज्ञानेंद्रिय जग निराकाराच्या खोल एकाग्रतेच्या अवस्थेत अव्यक्त मनाशी एकरूप होते (अरुप्पसमापत्ती). हे निर्वाणाच्या क्षेत्रात घडते जिथे स्कंधाशी कोणतीही जवळीक नसते. पालि विनयपिटक निर्वाण प्राप्तीनंतर लगेच बुद्धाने उच्चारलेल्या उदानगाथेद्वारे त्या अवस्थेचा संदर्भ देते:'

खरंच जेव्हा ध्यानस्थ ब्राह्मण यजमान माराला मार्गात येऊ देत नाहीत जसे तो आकाश उजळणाऱ्या सूर्यासारखा पांढरा शुभ्र तेजस्वी दिसतो. !!

'त्याचप्रमाणे, तंत्राचा उद्देश लौकीक (इदं) आणि पारलौकीक (तत) यांचा समन्वय साधणे हा आहे.

**सारांश**

वरील विवेचनावरून असे दिसून येते आहे की, पालि विनयपिटकमध्ये पारंपरिकपणे चित्रित केलेले गौतम बुद्धांचे अनुभव एका कुशल तंत्र साधकाच्या (रत्नपुद्गल) अनुभवांशी साम्य दर्शवतात. बौद्ध विचारातील तंत्राचा प्रवेश हा साधारणत: तिसऱ्या-चौथ्या शतकापासून नंतरच्या बौद्ध धर्माचा एक टप्पा मानला जातो. अशा बाह्य बाबींचा प्रवेश नागार्जुनाच्या जीवनकाळापर्यंतचा असू शकतो.

तंत्र हे सामान्यत: प्रतीकात्मकतेसह पुरुष आणि स्त्री तत्त्वांशी संबंधित गुप्त गूढवाद म्हणून ओळखले जाते. मंत्र, मुद्रा, चक्र, मंडल, होम विधी इत्यादी कमी-अधिक विधी तंत्रात सांगितलेले आहेत. हे मुख्यत: सात्विक आणि पौष्टिकसह अभिचार कर्मासाठी लागू केले गेले आहेत. किंबहुना, ते भोगाच्या (रस्मि) विस्ताराने या जगाचा समावेश असलेल्या विश्वाच्या आत्मस्वरूपाचे पूर्ण जागृती अभिसंबोधीच्या क्षेत्रात प्रवेश करण्यास पात्र होण्यासाठी साधकाला सक्षम करण्याचे मार्ग किंवा माध्यम आहेत.

गौतम बुद्धांना बल, वसिता, वैसाराद्य, अभिज्ञा आणि बोध्यंग यांसारखे पारलौकीक गुण प्राप्त झाल्याचे म्हटले जाते. त्यांचे अनुभव विनय पिटकात तपशीलवार वर्णन केले आहेत. हा सर्वात प्राचीन स्त्रोत तंत्राच्या प्राचीनतेचा पुरावा आहे.

## सारु-मारु बौद्ध स्तुप महोत्सव २५ डिसेंबर, २०२२




**बुद्ध धम्म संघाच्या पावन धरती नकटी तलाई, रेहटी जिल्हा, सिहोर येथे ५ व्या सारु-मारु प्राचिन बौद्ध स्तुपाचा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन नकटी तलाई, नसरुल्लागंज, भोपाळ येथील बौद्ध उपासक रामानंद जाधव, जे. पी. पेठारी, अनिल पवार, डॉ. बी. एस. बगाना, धरमसिंह मेहरा, एच. सी. जानपुरे, रामाधार सोलंकी, रामाधार चौधरी यांनी व यांच्या सहकाऱ्यांनी आयोजित केला होता.**

**सदर कार्यक्रमास मुंबईतून अरविंद भंडारे, मलकापूर येथून शांतारामजी इंगळे, नागपूर येथून सत्यजित चंद्रिकापूरे, मनोज माणिक, अशोक पाटील, डी. पी. गोलिया, डी. पी. वर्मन, उर्मिला बौद्ध इत्यादी प्रमुख रुपाने उपस्थित होते.**

**सदर कार्यक्रमाचे आयोजन गेली ५ वर्षे सातत्याने मध्यप्रदेश मधील या बांधवांकडून होत आहे.**

## पालि भाषा : प्रचारातील समस्या आणि संभावना

– महानागरत्न, नागपूर

**प्रास्ताविक :**

भाषा मानवी जीवनातील व्यवहार पार पाडण्यासाठी संवादाचे किंवा बोलचालीचे एक माध्यम म्हणुन नेहमीच उपयोगात आणली जाणारी गोष्ट आहे. कोणतीही प्रांतीय भाषा व्यापार वा तत्सम दळणवळणाच्या रेलचेलीमुळे समिश्र होण्याची शक्यता असते कारण भाषेला टिकवून ठेवण्याची चिकाटी कोणातच न राहता भाषेचा उपयोग करुन अपले मानवी व्यवहार सुरळीत कसे पार पाडता येईल, हीच प्रमुख चेतना सर्वामध्ये काम करीत असते. परंतु भाषेचा संबंध जेव्हा जीवनविषयक समृद्ध अशा तत्वज्ञानाशी व उपदेशाशी असतो तेव्हा मात्र त्या भाषेला जैसे थे कायम राखण्याचा प्रयत्न काही सुज्ञ लोकांकडून होतो. हे लोक त्या भाषेला जीवंत ठेवण्यासाठी त्या भाषेचा अभ्यास करुन त्याचे व्याकरण, कोष किंवा शब्दकोश इत्यादी तयार करून तो भाषा व त्या भाषेतील समृद्ध ज्ञान पुढील पिढ्यांकडे सोपवत असतात; जेणेकरुन त्या ज्ञानाचा लाभ येणाऱ्या पिढ्यांनाही व्हावा.

बुद्धवचन ज्या भाषेत लिपीबद्ध आहेत अशा पालि भाषेच्या बाबतीतही हेच झालेले आहे. भगवान बुद्धांच्या काळात बोलली जाणारी भाषा म्हणुन आज पालि भाषा जीवंत नसुन तिच्यातील बुद्धवचनांमुळे ती जीवंत आहे. उदाहरण म्हणुन आपण पाहू शकतो की, महाराष्ट्रात मराठी भाषा वेगवेगळया प्रांतात वेगवेगळया प्रकारे बोलली जाते पण लिहीताना किंवा एखादा सुज्ञ व्यक्ती जेव्हा बोलतो तेव्हा ती भाषा प्रमाण मराठीतच बोलतो किंवा लिहतो, कारण आपण जे मत मांडतो ते सर्वांनाच समजावे हाच हेतु त्या सुज्ञाचा असतो, असे करताना तो कधी-कधी त्या त्या प्रांतानुसार शब्द ग्रहण करू शकतो कारण त्याचा हेतु भाषा जीवंत ठेवणे किंवा भाषेची वैशिष्टये कायम ठेवणे हा न राहता त्या भाषेच्या माध्यमाने लोकांच्या भल्यासाठी ज्ञान प्रसारीत करणे हाच असतो. भगवान बुद्ध आणि बुद्धांच्या श्रावकांच्या बाबतीतही असेच झालेले आहे म्हणुन पालि त्रिपिटकातील पालि भाषेत काही शब्दांमध्ये, किवा व्याकरण शैलीत भेद आढळतो. या भेदावरुन काही विद्वानांनी पालि भाषा ही कोणत्या प्रांतातील असेल ? यावर विविधांगी विचार मांडणे आरंभ केले. हे सर्व विचार प्रमुख्याने अनुमानात्मक आहेत. तर जो विचार पालि साहीत्यात परंपरेने मांडले गेले आहे तोच विचार प्रमुख आणि सत्य आहे कारण तो बुद्धवचनांसोबत पिढी-दर-पिढी प्रचलीत होत आलेला आहे.

**काही विद्वानांचे मत**

१) **प्रोफेसर ऱ्हीस डेविड्स** यांनी आपल्या **बुद्धिस्ट** इंडीया या ग्रंथात मांडले आहे की, पालि भाषा इ.स. पुर्व सहाव्या सातव्या शतकात कोशल प्रदेशात बोलली जाणारी भाषा होती म्हणुन पालि भाषेचा आधार कोशल प्रदेश आहे. याचा पुरावा देताना ते दोन मत मांडतात १) भगवान बुद्ध कोशल प्रदेशाचे होते, त्यांची जी मातृभाषा होती त्यातच त्यांनी उपदेश दिला २) भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर कोशल प्रदेशातच शंभर वर्षाच्या आत बुद्धवचनांचे संगायन केले गेले होते.

२+३) वेस्टरगार्ड आणि ई. कोन्जे यांनी पालि भाषा ही उज्जयिनी प्रदेशातील बोली-भाषा होती असे मत मांडले आहे कारण १) गिरनार (गुजरात) येथील अशोकाच्या शिलालेखाशी याचे साम्य आहे आणि २) महेंन्द्र स्थविर, ज्यांनी बुद्ध धम्म श्रीलंकेत पोहचवला, त्यांची मातृभाषा हीच होती...

४) आर. ओ. फ्रँक यांच्या मते पालि भाषा विन्ध्य प्रदेशाची भाषा होती कारण गिरनार शिलालेखाशी यांचे सर्वाधिक साम्य आहे परंतु पालि उत्तर भारताच्या पुर्वेकडील भागात बोलली जाणारी नाही. उत्तर पश्चिमी भागातील खरोष्टी लेखात सुद्धा या भाषेतील साम्य आणि विषमता आढळून येते. अधिक साम्य मध्य प्रदेशातील पश्चिमी भागातील लेखांशी असले तरी यातही काही असमानता आहे म्हणुनच पालि भाषेचा मूळ प्रदेश विन्ध्यचा मध्य आणि पश्चिमी भाग असु शकतो.

५) स्टेन कोनो यांचे मत सुद्धा पालि भाषा ही विन्ध्य प्रदेशातीलच आहे असेच आहे, या मागील कारण असे आहेत १) पैशाची भाषेशी या भाषेचे आधिक साम्य आहे २) पैशाची प्राकृत विन्ध्य प्रदेशात उज्जयिनीच्या आसपास बोलली जाणारी भाषा होती. परंतु ग्रियर्सन यांचे मत असे की, पैशाची प्राकृत भाषा ही केकय तथा पुर्वभागातील गांधार प्रदेशाची भाषा होती, आणि हे मत अधिक ग्राहय समजले जाते.

६) डॉ. ओल्डनबर्ग यांनी पालि भाषा कलिंगची भाषा असल्याचे मानले आहे कारण १) श्रीलंकेच्या शेजारी हा प्रदेश असल्यामुळे येथुनच लंकेत धम्मोपदेशाचे कार्य आरंभ केले गेले २) खारवेल येथील खण्डगीरी अभिलेखाशी पालि भाषेचे अधिक साम्य आहे. ओल्डनबर्ग यांनी कलिंगच्या लोकांनी श्रीलंकेत धम्मप्रचार केला आणि त्यासाठी अनेक शतक लागले असे मत मांडले आहे, महेन्द्र स्थविरांनी लंकेत बुद्धधम्म नेला याला यांनी विशेष लक्षात घेतले नाही.

७) ई. मुलर यांच्या मते सुद्धा कलिंग हाच पालि भाषेचा मुळ प्रदेश होय कारण येथुनच लोक धम्म घेऊन लंकेत गेलेत आणि तेथेच स्थिरावलेत.

८) त्रिपिटक परंपरा ज्याला सिंहल परंपरा म्हणतात त्यानुसार मगध प्रदेशाची मागधी भाषा (पालि) हीच बुद्धवचनांची भाषा होय.

वरील सातही मत या सिंहली परंपरेच्या विरुद्ध आहेत, आणि आपले मत बरोबर कसे आहे या साठी त्यांनी काही पुरावेही मांडलेले आहेत परंतु पालि भाषा मगध प्रदेशाची आहे या मताचे समर्थन जेम्स एल्विस, चाईल्डर्स, विण्डीस, विण्टरनित्स, गिर्यसन, गायगर, भिक्षु सिद्धार्थ आणि भिक्षु जगदीश काश्यप यांनी केले आहे. जेम्स ऐल्विसच्या मते बुद्धकालिन भारतात १६ प्रादेशिक भाषा प्रचलीत होत्या, त्यातील मागधी भाषेत, जी मगध प्रदेशाची भाषा होती त्यात भगवंतानी उपदेश दिला होता. चाइल्डर्स, विण्डीस यांनी सुद्धा मागधीलाच पालि भाषेचा आधार म्हटले आहे. विण्टरनित्सच्या मते पालि एक साहित्यीक भाषा होती जीचा विकास अनेक प्रादेशिक भाषेच्या संमिश्रनातून झाला पण यात प्राचीन मागधीच प्रमुख होती. गिर्यसन यांनी पालिचा आधार मागधीच आहे असे म्हटले आहे. या सर्व मतात जर्मन विद्वान गायगर याचे मत विचारात घेण्यासारखे आहे, त्यांच्या मते पालि मागधी भाषेचेच एक रूप आहे, ज्यात भगवान बुद्धाने उपदेश दिले होते. ही भाषा कोण्या विशिष्ट प्रदेशाची बोली भाषा नव्हती तर सभ्य समाजात बोलली जाणारी सर्व सामान्य भाषा होती ज्याचा विकास बुद्धपूर्व काळापासुनच होत आलेला होता. पालि विशुद्ध मागधी तर नव्हती पण त्यावरच आधारीत एक लोक भाषा होती, जी सर्व मान्य होती आणि ज्यातुन भगवान बुद्धाने धम्माचा उपदेश दिलेला होता. (पालि साहीत्य का इतिहास, भरतसिंह उपाध्याय; History of Pali Language and Literature, Ven. Acharya Buddharakkhita)

पालि भाषेच्या मुल प्रदेशाविषयी मांडली जाणारी वरील मते विकसित होण्यासाठी त्रिपिटकातील सुत्ताचाच आधार घेतला गेला आहे. महापंडित राहुल सांस्कृत्यायन यांनी आपल्या बुद्धचर्या या ग्रंथाच्या पुर्वकथनात म्हटले आहे की, त्रिपिटकाच्या अध्ययनावरुन वाटते की, भगवान बुद्ध कोसी-कुरुक्षेत्र, विन्ध्य-हिमालयाने घेरलेल्या मध्य-देशाच्या बाहेर गेले नाहीत. तसेच आपण पाहतो की, भगवंताच्या काळी सोळा जनपद होते, ज्याचा एक स्वतंत्र राजा आणि शासनप्रणाली होती, हे सोळा जनपद असे आहेत १) अंग २) मगध ३) काशी ४) कोसल ५) वज्जि (वृज्जि) ६) मल्ल ७) चेदि ८) वत्स ९) कुरु १०) पांचाल ११) मत्स्य १२) सौरसेन १३) अष्मक १४) अवन्ति १५) गान्धार आणि १६) कम्बोज, या सोळाही जनपदात बुद्धधम्माचा प्रचार प्रसार झाला होता पण तो स्वत: भगवान गेले होते म्हणुन नाही तर भिक्षूंनीच हा धम्म त्या त्या प्रदेशात पोहचविला होता. भगवान इसिपतनातील प्रथम वर्षावास संपविल्यानंतर आपल्या भिक्षूंना म्हणतात की, बहुजनांच्या हितासाठी, बहुजनांच्या सुखासाठी, लोकांवर अनुकम्पा करण्यासाठी, देवता आणि मनुष्याच्या हिता सुखासाठी भिक्षूंनी विचरण करा, एकाच दिशेने (ठिकाणी) दोघांनी जाऊ नका. तसेच आपण पाहतो की, सुनापरान्त प्रदेशात भिक्षु पुण्ण भगवंताना विचारुनच धम्मप्रचारासाठी गेले होते. सम्राट अशोकाच्या काळातच भिक्षु तिसऱ्या धम्मसंगितीनंतर देश विदेशात धम्मप्रचारार्थ गेले होते (इ.स. पूर्व तिसरे शतक) तसेच याच काळात देशातील काही भागात शिलालेख लिहीले गेले. चवथ्या धम्मसंगीतीच्या (इ. स. पूर्व २९, राजा वट्टगामिनीच्या कालकिर्दीत) श्रीलंकेत त्रिपिटक लिपिबद्ध झाल्यावर जेव्हा चवथ्या-पाचव्या शतकात आचार्य बुद्धघोष श्रीलंकेत गेले तेव्हा त्यांनीच सिंहल प्राकृत लिपित लिपिबद्ध असलेल्या बुद्धवचनांना पालि भाषेत अनुवादित केले. आचार्य बुद्धघोष आणि त्यांचे गुरु रेवत स्थविर सुद्धा याच भागातील होते, आणि त्यांनीच त्रिपिटकाचा अनुवाद आचार्यांना मागधीत करायला सांगितला होता. (आचार्य धम्मपालत्थेर आणि आचार्य बुद्धदत्तत्थेर यांनी सुद्धा पालि अट्ठकथा लिहीण्यात योगदान दिले आहे.)

कुठलीही भाषा बदलत असते पण तीचा पुर्णत: लोप व्हायला खुप मोठा कालावधी लागतो. आचार्य बुद्धघोष श्रीलंकेत गेले तेव्हा त्यांनीच सिंहल प्राकृत लिपित लिपिबद्ध असलेल्या बुद्धवचनांना पालि भाषेत अनुवादित केले. आचार्य बुद्धघोष आणि त्यांचे गुरु रेवत स्थविर सुद्धा याच भागातील होते, आणि त्यांनीच त्रिपिटकाचा अनुवाद आचार्यांना मागधीत करायला सांगितला होता. (आचार्य धम्मपालत्थेर आणि आचार्य बुद्धदत्तत्थेर यांनी सुद्धा पालि अट्ठकथा लिहीण्यात योगदान दिले आहे.)

कुठलीही भाषा बदलत असते पण तीचा पुर्णत: लोप व्हायला खुप मोठा कालावधी लागतो. बुद्धघोष आचार्याच्या काळातही त्या परिसरात पालि बोलली जात असावी म्हणुनच त्यांनी त्याच भाषेत अनुवाद केला तसेच बुद्धवचनांची भाषा म्हणुनही भिक्षूंनी ती जतन करून ठेवली होती.

याच त्रिपिटकाचा आधार घेऊन, सुरुवातीला आलेल्या १६ प्रदेशाची माहीती व काही बोली भाषेतील शब्द साधर्म्य याच्याच आधाराने काही विद्वानांनी आप-आपली मते मांडली आहेत. प्रो ऱ्हीस डेविड्स यांनी पालिला कोशल प्रांतातील भाषा म्हटले असुन तीच बुद्धाची मातृभाषा होती असे म्हटले आहे पण भगवंतानी गृहत्याग केल्यानंतर आपला धम्मप्रचार केवळ कोसल प्रांतात केला नाही तर मगध, कुरु, राजगृह, श्रावस्ती या परिसरात केला होता. त्या वेळेस त्यांनी त्यांचीच मातृभाषा वापरली असे म्हणता येत नाही कारण धम्माचा प्रचार सर्वांसाठी असल्यामुळे त्यांनी सर्वांना समजेल अशी प्रचलित सभ्य भाषा अवलंबीली होती, हा सामान्य तर्कही आपण लक्षात घेऊ शकतो. वेस्टरगार्ड आणि ई. कोन्जे यांनी पालि भाषेला उज्जयिनी प्रदेशाची भाषा आहे असे म्हणताना अशोकाच्या शिलालेखाचा व महेन्द्र भिक्षुच्या जन्माचा दाखला दिला आहे, पण ही गोष्ट सुद्धा बुद्धकालिन न राहता त्याच्या नंतरचीच आहे म्हणुन या शिलालेखातही त्रिपिटकातील पालि आणि शिलालेखातील भाषा यात फरक जाणवतोच. केवळ शब्द साधर्म्यावरुन आपण त्याचे उगम उज्जयिनी प्रदेशातील आहे असे म्हणता येत नाही. या तिनशे वर्षात धर्म सर्व भागात पसरला होता. तसेच व्यापारी संबंधही अधिकच सोयीस्कर झाले होते म्हणुन मगधची भाषा जी बुद्धाने वापरली होती तिचाही प्रचार बोलचालीत वाढला असेलच, त्याच आधारावर शिलालेख लिहीले गेले असावेत. आर.ओ. फ्रेन्क आणि स्टेन कोनो यानी पालि ही विन्ध्य प्रदेशाची भाषा असल्याचे मानले आहे, जी उज्जयिनीच्या आसपास बोलली जायची. जी पैशाची प्राकृत भाषेच्या समरुप आहे, ज्याचे साम्य गिरनार अभिलेखातही आढळते. वरील प्रमाणे चारही विद्वानांनी उज्जयिनी, विन्ध्य प्रदेश व गिरनार (गुजरात) या प्रदेशाशी पालि भाषेचा संबंध जोडलेला आहे. हे का झाले ? याचे उत्तर आपण महापंडीत राहुल सांस्कृत्यायन यांनी विनयपिटकाच्या भुमिकेत जे मत मांडले, त्यातून अधिकच स्पष्ट होईल ते असे -

बुद्ध निर्वाणसे (४८३ ई. पूर्व) से लेकर राजा वट्टगामनी (२९ ई. पूर्व) के काल तक स्थविरवादियोंका त्रिपिटक बराबर कंठस्थ ही चला आया था। वट्टगामनीके समय लंकासे त्रिपिटक लेख-बद्ध किया गया। इन चार सौसे अधिक वर्षो तक कंठस्थ आनेका प्रभाव एक तो यह पळा, कि मूल त्रिपिटककी भाषा, जो पहीले मागधी थी क उच्चारण बिगळकर महाराष्ट्रीसा हो गया। वस्तुत: यह स्वभाविक ही था। सिंहलके प्रथम प्रवासी गुजरात (लाट) से वहाँ पहुँचे थे पुरानी महाराष्ट्रकी भाँति ही उनकी भाषामें भी श का पुरा बायकाट था, और र को ल में बदल देनेका रिवाज न था । इसके विरुद्ध स की जगह भी श, तथा र के स्थानपर ल (जैसे राजा का लाजा) कहना मागधी भाषाके विशेष लक्षण थे महेन्द्रके सिंहल - आगमन (२४७ ई. पू.) से प्राय: ढाई सौ वर्ष तक त्रिपिटकके कंठस्थका भार सिंहलके गुजराती प्रवासीयोंको मिला था, जिनसे उच्चारण मागधीसे बिल्कुल ही उल्टे थे, यही कारण है, जो पलिबोध (परिबोध) आदि कुछ शब्दोंको छोळ जिनमें मागधी व्याकरणके अनुसार र के स्थानपर ल कायम रक्खा गया, मागधीकी सभी विशेषतायें लुप्त हो गई; और एक प्रकारसे वर्तमान पालि त्रिपिटक मागधी न होकर प्राचीन गुजराती भाषा का त्रिपिटक है।

डॉ. ओल्डनबर्ग आणि ई. मुलर यांनी पालि कंलिंग प्रदेशाची भाषा आहे असे म्हटले आहे कारण कंलिंग प्रदेशातूनच सागरी मार्गाने बरेचसे भिक्षु आणि लोक धम्मप्रचारार्थ श्रीलंकेत गेले होते. श्रीलंकेतील दंतधातु सुद्धा कलिंगच्या हेममाला राजकुमारीनेच नेला होता, असाच इतिहास आहे पण आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, सम्राट अशोकाने कलिंगवर आपली राजसत्ता चालवली असताना मगध, पाटलीपुत्र या परिसरातील लोकच त्या ठिकाणी येऊन स्थायिक झाले असावेत कारण सम्राट अशोकाने कलिंगवर स्वारी केली असता त्या युद्धात लाखो लोक मारले गेले होते, याही अर्थाने मगधची भाषा कलिंगमध्ये आली असावी असेच वाटते.

**पालि ही मगध देशाची भाषा :**

त्रिपिटक ज्या भाषेत लिहीले गेले आहे त्या भाषेला मागधी भाषा न म्हणता पालि असेच म्हटले जाते परंतु त्या भाषेसाठी मात्र मागधी, मगध भाषा, मागधा-निरुक्ती, मागधिक भाषा इत्यादी शब्दांचा उपयोग केला गेला आहे, ज्याचा अर्थ होतो मगध देशाची भाषा ! सिंहल परंपरेनुसार मागधी हीच ती मुळ भाषा होती ज्यात भगवान बुद्धाने आपला धम्मोपदेश दिला होता. याचे काही उदाहरण असे आहेत कच्चायन व्याकरणात म्हटले आहे. **सा मागधी मुल भासा नरा यायादिकप्पिका। ब्रह्मा तो चस्सुतालापा सम्बुद्धा चापि भासरे** म्हणजे मागधी हीच ती मुळ भाषा आहे, ज्यात प्रथम कल्पातील मनुष्य बोलत असत, ब्रह्म (श्रेष्ठ) पासून तर अद्भुत प्रजेची ही मुळ भाषा आहे, ज्यात भगवंतांनी आपला धम्म शिकविला. समन्तपासादिकेत आचार्य बुद्धघोष म्हणतात, **सम्मासम्बुद्धेन वुत्तप्पकारो मागधको वोहारो।** म्हणजे सम्यक सम्बुद्धांनी प्रयुक्त केलेली भाषा ही मागधीच आहे.

तसेच विशुद्धमग्गात आचार्य म्हणतात, **मागधिकाय सब्ब सत्तानं** मुलभासाय म्हणजे संपूर्ण प्राण्यांची मुळ भाषा असलेल्या मागधीत. तसेच चुलवंशाच्या परिच्छेद ३७ च्या २४४ च्या गाथेत म्हटले गेले आहे की, **सब्बेस मुलभासाय मागधाय निरुत्तिया** म्हणजे संपुर्ण प्राण्यांची मुळ भाषा असलेल्या मागधीत... रेवत स्थविरांनी आचार्य बुद्धघोषांना लंकेत जाऊन सिंहली अट्ठकथांचा पालित अनुवाद करण्यासाठी सुचित करताना म्हटले होते की, **मागधानं निरुत्तिया परिवत्तेहि ।** म्हणजे मागधी भाषेत अनुवाद करा आणि अनुवाद पार पडल्यावर स्वत: आचार्य बुद्धघोष लिहीतात **परिवत्तेसि सब्बा पि सोहलट्ठकथा तथा सब्बेसं मुलभासाय मगधाय निरुत्तिया** म्हणजे सर्वाची मुळ भाषा असलेल्या मागधीमध्ये (मी) सर्वच सिंहल अट्ठकथांचा अनुवाद केला आहे. तसेच बाराव्या शतकात मोग्गलान स्थविरांनी जे व्याकरण लिहीले त्यात ते म्हणतात, **भासिस्सं मागधं सद्दलक्खणं** म्हणजे मी मागध शब्द लक्षणांना (मागधी व्याकरण) सांगत आहे.

या संदर्भावरून आपण जाणू शकतो की, श्रीलंका व बर्मा येथील संपूर्ण स्थविरवादी परंपरा या शतकापर्यंत मागधीलाच पालि भाषा मानते, ज्याला त्या परंपरेत मागध भाषा, मागधिका निरुत्ति किंवा मुलभासा म्हणुनही संबोधले जाते. पालि हा शब्द प्रामुख्याने बुद्धवचनांसाठी वापरला जातो. आज केवळ बुद्धवचन आहेत व त्याच आधाराने त्या वचनांची भाषा शिकली जाते. बुद्धवचनांसाठी आचार्य बुद्धघोषांनी पालि हा शब्द वापरला म्हणुन मागधीला आज पालि भाषा म्हणुन ओळखले जाते.

मागधी भाषेला पालि का म्हटले गेले, याचे विवेचन भिक्षु जगदीश कश्यप महास्थविरांनी त्याच्या पालि महाव्याकरणाच्या प्रस्तावनेत खालील प्रकारे केले आहे, ते अशाप्रकारे -

**सिद्धमिद्धगुणं साधु नमस्सित्वा तथागतं ।**
**सधम्मस भासिस्सं मागधं सद्दलक्खणं ।**

ऋद्धि-सिद्धी आदि उत्तम गुणांनी युक्त तथागतांना, त्यांच्या सद्धम्म व संघाला नमन करून मागध शब्द लक्षणास सांगत आहे. (मोग्गलान व्याकरणाचा आदि श्लोक)

येथे या ग्रंथाचे नाव मागध शब्द लक्षण असेच सांगितले आहे, पालि शब्द लक्षण असे नाही. वास्तविकता पालि शब्द हा मुळ त्रिपिटकासाठी वापरला गेलेला शब्द आहे. जसे, दीघनिकायपालि, उदानपालि इत्यादी. **पालिमत्तं इध आनीतं, नत्थि अट्ठकथा इध** येथे केवळ पालि आणली गेली, अट्ठकथा येथे नाही. **नेव पालियं नेव अट्ठकथायं दिस्सति ।** हे ना पालित, ना अट्ठकथांमध्ये दिसून येत. **इमिस्सा पन पालिया एवमत्थो वेदितब्बो ।** या पालिचा असा अर्थ समजला पाहिजे. इत्यादी वाक्यांना पाहून हे स्पष्ट आहे की, पालि शब्द मूळ त्रिपिटकासाठी प्रयुक्त केला गेला आहे.

काळाच्या ओघात ज्यात बुद्धवचन सुरक्षित आहे, त्या भाषेलाच पालि म्हटले जाऊ लागले. हे स्मरणात ठेवले पाहिजे की, पालि शब्द कधीच भाषेसाठी वापरला गेलेला नाही तर भाषेसाठी नेहमी मागधी हाच शब्द वापरला जातो.

भिन्न भिन्न प्रांतात बोलल्या जाणाऱ्या भाषेचा प्रभाव शुद्ध मागधी (पालि) भाषेवर पडत गेला, सम्राट अशोकांच्या काळापर्यंत एकाच पालिचे अनेक विकृत रूप विकसित झाले होते. याची छाया आपण त्यांच्या शिलालेखातून पाहू शकतो. मूळ मागधीत नंतर संस्कृत, अर्धमागधी (प्राकृत) यातील शब्दही आलेले आहेत.

**पालि ही बुद्धवचनाची भाषा आहे**

पालि ही बुद्धवचनाची भाषा आहे, आज मागधी भाषा सामान्य लोकात प्रचलित नाही. पालिचे रक्षण करणे म्हणजे बुद्धवचनांचे रक्षण करणे होय. बुद्धवचनांचे रक्षण केवळ पालि भाषेचे व्याकरण किंवा शब्दार्थ पाठ असले किंवा माहित असले म्हणून होत नाही तर त्या वचनांचा प्रत्यक्ष अनुभव असल्याने होत असतो. यासाठी आपण खालील दोन गाथा समजून घेतल्या पाहिजे.

**बहुम्पि चे सहितं भासमानो, न तक्करो होति नरो पमत्तो ।**
**गोपो व गावो गणपं परेसं, न भागवा सामञ्ञस्स होति ।।**

कोणी कितीही धर्मग्रंथाचं पठन-पाठन करीत असेल मात्र प्रमादामुळे तो त्यानुसार आचरण करीत नसेल तर जसे दुसऱ्यांच्या गाई मोजणाऱ्या या गुराख्यास काही प्राप्त होत नाही तसेच अशा मनुष्यास श्रामण्यफलाचा लाभ होत नाही.

**अप्पपि चे सहितं भासमानो, धम्मस्स होति अनुधम्मचारी**
**राज्य दोसथ पहाय मोहं, सम्मप्पजानो सुविमुत्तचित्तो।**
**अनुपादियानो इध वा हुरं वा, स भागवा सामञ्ञस्स होति ।।**

कोणी जरी धर्म ग्रंथाचे थोडेच पठन-पाठन करीत असेल मात्र राग (लोभ), द्वेष आणि मोह सोडून धम्मानुसार आचरण

करीत असेल तर, तो बुद्धीमान, अनासक्त व्यक्ती येथील आणि परलोकातील भोगाची आसक्ती ठेवीत नाही,त्यालाच श्रामण्यफलाचा लाभ होतो. (धम्मपद, यमकवग्ग, गाथा १९-२०)

बुद्धवचनांची सुरक्षा करताना त्याचे व्याकरण, शब्द आणि अर्थ (परियत्ति) सोबतच पटिपत्ति आणि परिवेदनाचे ज्ञानही अवगत असावे लागते. यासाठी केवळ पालिला केवळ भाषेच्या दृष्टिने न शिकवता, धम्मानुधम्मपटिपदेच्या दृष्टिने शिकवले जाणे गरजेचे आहे. पण असे शिक्षक निर्माण करणे साधे सोपे कार्य नसल्याने किंवा तशी व्यवस्था आपण अजून निर्माण केली नसल्याने पालिला आपण केवळ भाषा किंवा बुद्धवचन माहित करून घेण्याचे एक माध्यम म्हणून समोर आणलेले आहे; ही बाब सुद्धा आशादायीच समजली पाहिजे. परंतु आपले अंतिम ध्येय ध्यान, विमोक्ष, मार्ग, फल, निर्वाण प्राप्त लोक निर्माण करणे हे असले पाहिजे आणि ह्याच पालिचा म्हणजे बुद्धवचनांचा खरा प्रचार होय.

**पालि : प्रचारातील समस्या आणि संभावना**

पालि भाषेला भारत सरकारने प्राचिन भाषा म्हणून गौरवलेले आहे; आणि त्याच्या प्रचाराची यंत्रणाही अनेक विद्यापिठातून केली गेली आहे पण त्याची मर्यादा विद्यार्थी आणि प्राध्यापकांपुरतीच आहे. एक अकेडेमिक वर्क म्हणून त्यात अनेकांनी पदव्या सुद्धा संपादन केल्या आहेत, लेखन केले आहे. एक भाषा, तत्वज्ञान आणि पुरातत्वीय दस्ताऐवज म्हणूनही त्याचे जतन केले जात आहे. दिल्ली विद्यापिठ, वाराणसी विश्वविद्यापिठ, लखनौ विद्यापिठ यात पालि विषयक बरीच कामे पार पाडली गेली आहेत. स्वामी द्वारकादास शास्त्री, रामशंकर त्रिपाठी इत्यादींना त्रिपिटक आणि व्याकरणावर भरीव कामगिरी केली आहे, ते वाराणसी विश्वविद्यापिठात प्राध्यापक होते. लखनौ विद्यापिठातून पालि त्रिपिटकाचा इंग्रजी, हिंदी आणि संस्कृत भाषेतून अनुवाद करण्याचे कार्य सध्या चालू आहे. आपल्या महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, औरंगाबाद, नांदेड, नागपूर, अमरावती, कोल्हापूर येथील विद्यापिठातून पालि आणि बुद्धिस्ट स्टडिजचे शिक्षण दिले जात आहे. या विद्यापिठात कार्यरत असलेल्या प्राध्यापकांनी पालि ग्रंथावर काही अनुवाद व लेखनही केलेले आहे. (बार्टी आणि पुणे विद्यापिठाच्या संयुक्त विद्यमाने पालि त्रिपिटकाचा मराठी अनुवाद करण्याचे ठरले आहे पण ते काम अजून आरंभ झालेले नाही.)

वरील सर्व बाबी लक्षात घेता पालि भाषेशी संबंधीत कार्य केवळ विद्यापिठ व महाविद्यालयीन पातळीवर कार्यरत असल्याचे दिसून येते. जन-मानसात याचा पाहिजे तो प्रचार झालेला नाही. भिक्षु संघ व धम्म प्रचाराचे कार्य करणा-यांकडून पालि बुद्धपूजा वंदना आणि परित्राणपाठ याचा प्रचार मात्र जन-मानसात होत असल्याचे आपण पाहू शकतो पण याचा बुद्धवचनाची सुरक्षा करण्याशी काही संबंध नसून बौद्ध संस्कृती आणि धम्म शिकविण्याशीच असल्याचे दिसून येते. या सर्व बाबी मर्यादीत असल्या तरी चांगल्याच समजल्या पाहिजे. पालि भाषेच्या प्रचारातील समस्या आणि ते सोडविण्याचे संभाव्य उपाय खालील प्रमाणे मला विषद करता येतील.

१. पालि भाषा (बुद्धवचन) कोणी आवड म्हणून शिकत असेल तर ती आवड किंवा अभ्यास हा समाजाभिमुख होत नाही; आणि समाजाभिमुख झाला तरी त्याला मर्यादा असतात कारण त्यात कोणताच व्यवस्थितपणा नसतो. पालिचा अभ्यास करणाऱ्यांना रोजगाराची फारशी सोय नसल्यामुळे ते पालि भाषेसाठी निरंतर आणि नेटाने काही करू शकत नाहीत; उपजीविकेसाठी अन्य साधनांवर विसंबून राहील्यामुळे त्यांची आवड आणि ज्ञान कमी होत जाते. परंतु ही बाब शिक्षक व प्राध्यापकांच्या बाबतीत होत नाही कारण त्यांना पालिच्या माध्यमाने पगार भेटतो आणि समाजात विद्वान म्हणून मान पण भेटतो मात्र ही बाब बाकीच्यांसाठी लागू होत नाही. यामुळेही पालिचे गाढे अभ्यासक आपल्याकडे कमी आहेत; आणि असतील तर त्यांना रोजगार व पैशाच्या अभावाने त्यांचे कार्य पुढे चालू ठेवता येत नाही. (येथे माझेच उदाहरण घेता येण्यासारखे आहे.) थोडक्यात, पालिशी संबधीत रोजगार निर्माण झाला पाहिजे. रोजगार जर केवळ शिक्षण पेशातील असेल तर त्यालाही मर्यादा येतील म्हणून संशोधन आणि बुद्धिस्ट उपचार हा रोजगार उभा करण्याची गरज आहे. थोडक्यात, पालिशी संबंधीत रोजगार निर्माण झाला पाहिजे. रोजगार जर केवळ शिक्षण पेशातील असेल तर त्यालाही मर्यादा येतील म्हणून संशोधन आणि बुद्धिस्ट उपचार या क्षेत्रातही रोजगार उभा करण्याची गरज आहे.

२. सर्व शाळा आणि महाविद्यालयात सेकंड लॅग्वेज म्हणून पालिला लागू केले गेले तर त्या विषयाचे शिक्षक भरले जातील, त्यामुळे पालि शिकणारे तरूण तरूणी निर्माण होतील आणि त्यांचा रोजगाराचा प्रश्नही सुटेल.

३. ज्यांनी पालि मध्ये एम. ए., एम. फिल., पी. एच. डी. केली आहे, त्यांचा डेटा तयार करावा; त्यांची संख्या निश्चित करावी. ज्यांना कोणता रोजगार नाही त्यांना बौद्ध समाजाने दरमहा २०,००० से २५,००० रू. मानधन द्यावे आणि त्यांच्याकडून

पालि वाङ्मयाचा अनुवाद व सुत्रबद्ध धम्म शिकविण्याचे कार्य करवून घ्यावे. या कामासाठी समाजाकडून वा देश विदेशातील संस्थाकडून फंड उभा करण्याची जबाबदारी घेणाऱ्या लोकांचे एक संघटन निर्माण केले जावे आणि त्या संस्थेकडूनच सर्वांना काम व मानधन देण्यात यावे. वैयक्तिक कामापेक्षा संघटीत काम यशस्वी आणि दीर्घकाळ चालणारे असते म्हणून यावर गांभिर्याने विचार झाला पाहिजे.

४. लहान मुला मुलींसाठी धम्म स्कुल किंवा धम्म संस्कार वर्ग जेथे सुरू आहेत, तेथे पालि हा विषय तसेच ब्राह्मि लिपी (धम्मलिपी) सक्तीने शिकवली जावी.

५. सामान्य बौद्धांनी सुद्धा किमान वर्षातून एकदा पालि भाषेवर आधारीत अभ्यासक्रमावर परिक्षा द्यावी, हा अभ्यासक्रम परिसरातील संबंधीत संघटनेने पुरवावा.

६. सरकार किंवा विद्यापिठ पालि भाषेच्या प्रचाराच्या संबंधाने आवड दाखवत नसेल, आर्थिक मदत देत नसेल तर त्यांच्या मदतीची अपेक्षा न ठेवता बौद्ध समाजातील धनवान लोकांनी या भरीव कामासाठी पैसा उभा करावा. धार्मिक कार्यक्रम आणि उत्सव यात उभारल्या जाणाऱ्या पैशातून यासाठी मदत करावी.

७. त्रिपिटकाची भाषा ही सामान्य नाही, ती धम्म आणि विनयाशी संबंधीत आहे म्हणून त्याचा अनुभवाच्या पातळीवर विकास होण्यावर भर दिला गेला पाहिजे तेव्हाच ती भाषा आपल्या सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक जीवनाचा भाग बनू शकेल. त्रिपिटकाला एक भाषा म्हणून विकसित केले जात असेल तर त्याचा मानवतेसाठी फारसा लाभ होणार नाही आणि हा विषय एक शैक्षणिक/ अकेडेमिक विषय म्हणून लोक हाताळतील.

८. भिक्षु भिक्षूणीसाठी पालि शिकणे सक्तीचे असावे, धम्मचारी, बौद्धाचार्य, धम्मप्रचारक यांना सुद्धा पालि शिकणे सक्तीचे असावे. बुद्धपूजा वंदना, परित्राणपाठ आणि उपदेश केल्याने कार्यक्रम तेवढा संपन्न होतो, त्यातून दान सुद्धा प्राप्त होते पण एवढ्यावरच समाधानी असू तर त्रिपिटकाचे जतन होण्याची कोणतीच शक्यता नाही म्हणून धम्म प्रचारकासाठी पालि शिकणे सक्तिचे असावे,

९. अलिकडे सेवानिवृत्त झालेले आणि घरी राहणाऱ्या महिला पालि भाषा शिकण्यासाठी विद्यापिठातून प्रवेश घेताना दिसतात; त्यांच्याकडे वेळ आहे, पैसा आहे, आवड आहे आणि सेटलमेंट आहे पण तरूण तरूणींना यात काही आशा दिसत नाही कारण हे शिकून आपले जीवनयापन होत नाही, काही रोजगार भेटत नाही अशी त्यांची ठाम धारणा आहे आणि हे सत्यही आहे म्हणून यावर गांभिर्याने विचार करून मार्ग काढावा लागेल. बरेचशे म्हातारे लोक सुद्धा विद्यापिठातील प्राध्यापकांच्या जागेवर चिपकून बसतात पण ती जागा तरूणांसाठी रिकामी करून देत नाहीत तर त्यांनी अन्यत्र अप्लाय करावे, असे सल्ले देतात. पालि शिकून सुद्धा त्यांच्या मनातील पैसा, मानपान आणि काही करण्याची हाव कमी होत नाही म्हणूनही तरूणांना यांच्यामुळे काही प्रेरणा लाभत नाही. धम्म विनय अलोभ सांगतो आणि असे लोक लोभातच असलेले दिसून येतात. या संदर्भात सुद्धा मार्ग शोधणे गरजेचे आहे.

१०. सर्व स्तरातील लोकांना पालि आणि बुद्धधम्म शिकता येण्यासाठी दुरस्थ पालि शिक्षण व्यवस्था उभारण्यात यावी. पुस्तके, परिक्षा आणि प्रमाणित प्रमाणपत्र पुरविण्याची अद्ययावत सोय करावी. शिक्षार्थीकडून काही फिज् घेतली जावी जेणेकरून हे कार्य निरंतर चालेल.

११. बौद्ध समाजाने स्वत:चे स्वायत्त पालि विद्यापिठ स्थापन करावे. जेथे, पालि, बुद्धिजम्, आंबेडकर विचारधारा शिकवावी, पदवी द्यावी आणि शिकलेल्यांना रोजगार देण्याची यंत्रणा उभारावी.

१२. बुद्धवचनांना केवळ साहित्यीक अंगाने न पाहता मानवांमधील मानसिक व वर्तनविषयक आजारांना दूर करण्याचे एक माध्यम म्हणून पाहून त्यात विशेष संशोधन करून त्याचा एक उपचार पद्धती म्हणून विकास केला गेला पाहिजे. विहारातील बुद्धपूजा वंदना, धम्मदेसना, विपश्यना शिविर याची चाकोरी थोडी व्यापक करून धम्म आणि विनयाला एक उपचार पद्धती म्हणून विकसित केले तर यामुळे मानवतेला मोठा लाभ तर होईलच तसेच संशोधन आणि रोजगाराला यामुळे चालना भेटेल. (यावर माझे संशोधन व कार्य चालू आहे.)

१३. वैचारीक वाद आणि बुद्धिविलासातून पालि बुद्धवचनाला बाहेर काढावे लागेल. त्यासाठी ध्यान, विमोक्ष, मार्ग, फळ प्राप्त करणाऱ्यांची संख्या वाढवली पाहिजे; यासाठी उचित रितीने धम्म शिकविण्याचे नियमित व प्रामाणिक असे संस्थात्मक कार्य चालू केले पाहिजे.

१४.पालिला चांगले दिवस येण्यासाठी अभ्यासक, प्रशिक्षक, संशोधक, उपचारक, विद्यार्थी, ग्रंथ, वेबसाईटस्, मोबाईल ॲपस्, संस्थात्मक कार्य, अनुभवाधारीत प्रयोगात्मक पद्धतीचा

अवलंब आणि यासाठी येणारा खर्च सांभाळणारी यंत्रणा निर्माण करावी लागेल. तसेच पालि शिकल्यामुळे मनुष्याला आरोग्य, सुख आणि रोजगार सुद्धा प्राप्त होतो याची सर्व सामान्यांना हमी वाटली पाहिजे. तसे होत नसेल तर केवळ रूची असणारे लोक पालि आणि बुद्धिजम् शिकतील आणि बाकीच्यांना याचे काहीच महत्व वाटणार नाही.

१५.पालिच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्याला स्थायी स्वरूपाचे वेतन पुरवले गेले पाहिजे. (हे कोण पुरवेल हा एक प्रश्नच आहे, पण याची नोंद क्र. ३ मध्ये दिली आहे.) मोफत किंवा ऐच्छिक कामे दिर्घकाळ आणि सातत्याने चालत नसतात; कोणाच्या दानाच्या भरोश्यावरही हे फार काळ शक्य नसते; दानाचा प्रवाह सतत टिकवून ठेवता येत असेल तर हे शक्य आहे पण लोकांना काही प्रत्यक्ष लाभ होत नसेल तर या कामी कोणी दान देऊ शकणार नाहीत. (धर्मशाळा, लंगर, धार्मिक उत्सव, विपश्यना शिबिरे इत्यादीला दान मिळते कारण यात दानदात्याचा प्रत्यक्ष सहभाग असतो.. पण हे पालिच्या बाबतीत होणे थोडे कठीणच वाटते कारण यात सर्वसामान्याचा सहभाग कमी असतो.) म्हणून पालिची प्रचार यंत्रणा विनिमयाच्या आधाराने उभी होणे गरजेचे आहे.पालि समोरील समस्या आणि प्रचारातील संभावना संक्षेपाने मी येथे मांडल्या आहेत. त्याचा आपण नक्कीच विचार कराल अशी मला आशा आहे. पालि रिसर्च इन्स्टिट्यूट, मुबंई (अध्यक्ष अरविंदजी भंडारे आणि सहकारी) यांनी आयोजित केलेल्या या एक दिवशीय कार्यक्रमात माझे विचार मला मांडता आले त्याविषयी मी आयोजकांप्रती धन्यवाद व्यक्त करतो तसेच उपस्थित सन्माननिय पाहूने आणि उपासक उपासिकांनी माझे विचार शांततेने ऐकून घेतले त्या सर्वांप्रती विशेष धन्यवाद व मंगलकामना व्यक्त करून माझ्या भाषणाला विराम देतो.

भवतु सब्ब मंगलं ।

३ नोव्हेंबर २०१९ रोजी पालि
व्याख्यानमालेत व्यक्त केलेले विचार

## १७ वे आंतरराष्ट्रीय तिपिटक चांटिंग, बोधगया डिसेंबर - २०२२

**आंतराष्ट्रीय तिपिटक चांटिंग कौन्सिलच्या वतीने**
**दरवर्षी तिपिटक चांटिंगचा कार्यक्रम आयोजित केला जातो. या कार्यक्रमामध्ये तिपिटकातील विविध भागातील सुत्तांचे पठण देश विदेशातील सन्माननिय भिक्खु संघ व उपासकांद्वारे केले जाते.**
**गेल्या काही वर्षात भारतातील उपासकांमध्ये या कार्यक्रमामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.**
**पालि रिसर्च इन्स्टिटच्युट, मुंबईच्या वतीने यावर्षी ७० उपासकांनी भाग घेतला होता.**
**पुढील वर्षीच्या कार्यक्रमात देखील पालि रिसर्च इन्स्टिटच्युट, मुंबई महत्वाचा सहभाग देणार आहे.**

## सामणेर शिबीर

**पालि रिसर्च इन्स्टिटच्युट, मुंबईच्या वतीने १३ डिसेंबर ते २४ डिसेंबर २०२२ दरम्यान**
**बोधगयेत आयोजित केलेल्या सामणेर शिबीरात एकुण २४ उपासकांनी भाग घेतला.**
**संस्थेच्या सामणेर शिबीर आयोजनाचे हे दुसरे वर्ष होते. दरवर्षी डिसेंबर या महिन्यात सामणेर शिबीराचे आयोजन संस्थेमार्फत केले जाते. या शिबीराचे प्रमुख मार्गदर्शक वंदनीय भिक्खु प्रग्यादीप महाथेरो - सचिव - अखिल भारतिय भिक्खु महासंघ हे होते. तर सामणेरांना कोरिया विहार व इतर भिक्खु संघाकडून मौल्यवान मार्गदर्शन प्राप्त झाले.**
**पुढील वर्षी या सामणेर शिबीरात सहभागी होण्याकरीता**
**आजच पालि रिसर्च इन्स्टिटच्युट, मुंबई शी संपर्क साधावा.**

## प्रवारणा (पवारणा)

– अरुण वाघमारे

वर्षावास समाप्तीच्या शेवटच्या दिवशी, वर्षावास पूर्ण केलेल्या भिक्खूंनी, पाहिलेल्या, ऐकलेल्या आणि ज्याबद्दल संशय आहे अशा तीन प्रकारच्या दोषांबाबत / अपराधांबाबत भिक्खूंना संपूर्ण संघासमोर प्रवारणा करावी लागते. प्रवारणा हा वर्षावासाच्या समाप्तीच्या शेवटच्या दिवशी केला जाणारा एक धार्मिक उत्सव अथवा विधी आहे.

**प्रवारणेचा (पवारणा) प्रारंभ :**

भगवान बुद्ध श्रावस्तीमध्ये अनाथपिण्डकाने बांधून दिलेल्या जेतवनातील आश्रमात (कुटीमध्ये) राहात होते. त्यावेळी कोसल प्रदेशातील एका लहानश्या खेड्यात बरेचसे भिक्खू वर्षावास करण्याकरिता आले होते. त्यांना प्रश्न पडला, भोजनाचा कसलाही त्रास न होता, कोणताही वितंडवाद न होता, कोणताही अपशब्द न बोलता, आनंदाने, सुखपूर्वक एकत्रितपणे वर्षावास कसा घालविता येईल ?' याबाबत ते विचार करू लागले. त्यांनी असे ठरविले की, कोणीही एकमेकांशी हा वर्षावासाचा काळ समाप्त होईपर्यंत बोलायचे नाही, भिक्षाटन करून जो प्रथम येईल त्याने, बसण्याकरिता आसने टाकावीत, पाय धुण्याचे पाणी, पाट व पाय घासण्याचे लाकूड ठेवावे, कचरा टाकण्याचे पात्र धुवून ठेवावे, पिण्यासाठी, धुण्यासाठी पाणी ठेवावे. भिक्षाटन करून जो शेवटी येईल त्याने, 'जेवणानंतर उसे अन्न ठेवले असेल तर, त्याला ते अन्न खावेसे वाटले तर खावे, नसेल खावयाचे तर हिरवे गवत नसलेल्या ठिकाणी किंवा वाहत्या पाण्यात टाकावे, बसण्याची आसने उचलून ठेवावीत, पाय धुण्याचे पाणी, पाट व पाय घासण्याचे लाकूड उचलून बाजूला ठेवावे, पिण्याचे पाणी, धुण्याचे पाणी पूर्वीच्या जागेवर ठेवावे, जेवणाची जागा झाडून स्वच्छ करावी, पिण्याच्या पाण्याचे, वापरावयाचे पाण्याचे व पायखान्यासाठी पाण्याचे मडकी रिकामी दिसली तर ती भरून ठेवावीत. जर हे त्याच्या एकट्याने होणे शक्य नसल्यास त्याने मूकपणे खुणेने दुसऱ्यांना मदतीकरिता बोलवावे.' अशा प्रकारे राहिल्यास, भोजनाचा कसलाही त्रास न होता, कोणताही वितंडवाद न होता सुखपूर्वक एकत्रित राहून वर्षावास घालविता येईल, असे ठरवून ते वर्षावास करू लागले.

वर्षावास समाप्तीनंतर भिक्खू हे भगवान बुद्धांच्या दर्शनासाठी जात असत. तशी भिक्खूंची वहिवाट होती. त्यानुसार भिक्खूसुद्धा श्रावस्तीमध्ये भगवान बुद्धांजवळ आले. भगवान बुद्धांना अभिवादन करून ते एका बाजूला बसले. भेटीकरिता येणाऱ्या भिक्खूंशी/अतिथींशी मैत्रीपूर्ण संभाषण करीत त्यांचे कुशलक्षेम विचारण्याचा भगवान बुद्धांच शिरस्ता (पद्धत) होता, त्यानुसार भगवंतांनी त्या भिक्खूंना कुशलक्षेम विचारून त्यांना म्हटले, "सर्व काही ठीक आहे ना? तुम्ही सर्वांनी मिळून वितंडवाद न करता आनंदाने सुखपूर्वक वर्षावास घालविला ना ? भोजनासाठी त्रास झाला नाही ना ?" "होय ! आम्ही सर्वांनी एकत्र राहून आनंदाने व सुखपूर्वक वर्षावास घालविला व भोजनासाठी कसलाही त्रास झाला नाही" असे त्या भिक्खूंनी सांगितले.

भगवान बुद्ध हे सर्व जाणत असूनही विचारीत असत. सर्व जाणत असूनही (विचारण्यायोग्य नसलेले) विचारीत नसत. काळ-वेळ पाहून विचारीत असत, काळ-वेळ पाहून (विचारण्यायोग्य नसलेले) विचारीत नसत. तथागत अर्थपूर्ण व अर्थयुक्त असेच विचारीत. अर्थहिन असे काहीही विचारीत नसत. तथागत अशा गोष्टींच्या पलीकडे गेलेले होते. असे विचारण्यामागे भगवान बुद्धांचे दोन उद्देश्य होते - १) धम्मासंबंधी उपदेश करण्याच्या उद्देशाने, २) शिष्यांना शीलासंबंधी नियम घालून देण्याच्या उद्देशाने विचारित असत. तेव्हा भगवान बुद्धांनी त्या भिक्खूंना विचारले, तुम्ही सर्वांनी एकत्रित राहून, आनंदात व सुखपूर्वक वर्षावास घालविला आणि भोजनासाठी त्रास तर झाला नाही ?' तेव्हा त्या भिक्खूंनी ते सर्वजण एकमेकांशी न बोलण्याचे ठरवून, कशाप्रकारे वर्तन करीत एकत्रित राहिले, हे सर्व भगवान बुद्धांना सांगितले. तेव्हा भगवान बुद्धांनी सर्व भिक्खूंना संबोधून म्हटले, "हे मुर्ख मनुष्य (मोघ पुरिसा) असुविधाजनक / असुविधायुक्त वर्षावास घालवून असे सांगतात की, त्यांनी सुखपूर्वक वर्षावास घालविला. या मुर्ख मनुष्यांनी जनावरासारखे राहून वर्षावास घालविला अन् असे सांगतात की, सुखपूर्वक वर्षावास घालविला. मेंढरासारखे एकत्र राहून वर्षावास घालविला अन् असे सांगतात की, सुखपूर्वक वर्षावास घालविला. या मुर्ख मनुष्यांनी, दुसऱ्या मतप्रणालीच्या परिव्राजकासारखे नैतिक बंधनाविना मूक राहणे कसे स्वीकारले ?" अशा तऱ्हेने त्यांनी भिक्खूंचा धिक्कार केला आणि त्यांना धम्मकथा सांगितली. ते सर्व भिक्खूंना संबोधून म्हणाले-

"नैतिक बंधनरहित मौनव्रताचा दुसऱ्या मतप्रणालीचे लोक स्वीकार करतात. त्याचा तुम्ही स्वीकार करू नये. स्वीकार केल्यास दुष्कर्माचा दोष लागेल.

वर्षावास पूर्ण केलेल्या भिक्खूने, पाहिलेल्या, ऐकलेल्या व संशय असलेल्या अशा तीन प्रकारच्या दोषांची किंवा अपराधांची

पवारणा करावी. तीच तुमच्यासाठी एकमेकांना अनुकूल असून, दोष काढून टाकणारी आणि विनयास अनुसरून होईल," असे म्हणून, भगवान बुद्धांनी प्रवारणा (पवारणा ) करण्याची भिक्खूंना अनुमती दिली. अशा प्रकारे, भिक्खूंना, शीलासंबंधी, आचारविचारासंबंधी, वर्षावास समाप्तीच्या शेवटच्या दिवशी प्रवारणा करण्याचा नियम घालून दिलाच, पण प्रवारणा कशी करावी हेसुद्धा भगवान बुद्धांनी सांगितले.

**प्रवारणा कशी करावी :**

भगवान बुद्धांनी म्हटले, "भिक्खूंनो ! प्रवारणा अशी करावी. हुशार, चतुर व सामर्थ्यवान अशा भिक्खूने संघासमोर निवेदन करावे. "भन्ते ! संघाने माझे ऐकावे ! आज प्रवारणा करण्याचा दिवस आहे, जर संघ उचित समजत असेल तर प्रवारणा करावी." तेव्हा वृद्ध भिक्खूने (स्थविर) एका खांद्यांवर उत्तरासंग ठेवून, दोन्ही जमिनीला गुडघे टेकवून (उकडू) बसावे. दोन्ही हात जोडून असे म्हणावे, आयुष्यमानहो! संघाजवळ, पाहिलेले ऐकलेले अथवा संशय असलेले ह्या तीन प्रकारच्या (आपल्या अपराधाची / दोषाची) मी प्रवारणा करतो. आयुष्यमान, कृपा करून, मला (माझे) पाहिलेले, ऐकलेले व संशय असलेले दोष / अपराध दाखवून द्यावेत. "ते पाहून, मला मान्य असल्यास मी योग्य ते प्रायश्चित करेन." असे तीन वेळा निवेदन करावे.

त्यावेळी एका भिक्खूने 'प्रवारणा किती आहेत?' असे विचारले असता, चतुर्दशी (चातुद्दसिका) व पौर्णिमा (पन्नरसिका) अशा दोन प्रवारणा आहेत, असे भगवान बुद्धांनी म्हटले. अर्थात, वर्षावास समाप्तीच्या शेवटची येणारी चतुर्दशी व पौर्णिमा या दोन प्रवारणा असून, त्यावेळी वर्षावास पूर्ण केलेले भिक्खू प्रवारणा करतात.

**प्रवारणा कर्म (पवारणाकम्म) :**

त्यावेळी, भिक्खूंना शंका निर्माण झाली की, प्रवारण कर्म किती आहेत? त्यांनी ती शंका भगवान बुद्धांजवळ सांगितली असता, भगवंतांनी, 'प्रवारणा कर्म चार असल्याचे म्हटले. ती चार प्रवारणा कर्मे येणेप्रमाणे.. १. अधम्मेन वग्ग पवारणा कम्मं.

धम्म नियमाविरुद्ध (विनय विरुद्ध) मतभेदात्मक (अपूर्ण संघ) प्रवारणा कृती. २. अधम्मेन समगं पवारणा कम्म. धम्म नियमाविरुद्ध (विनयाविरुद्ध) मतभेदात्मक एकजुटीची (संपूर्ण संघ) प्रवारणा कृती. ३. धम्मेन वग्गं पवारणा कम्मं. धम्मनियमानुसार (विनयानुसार) मतभेदात्मक प्रवारणा कृती. ४. धम्मेन समग्गं पवारणा कम्मं.

धम्म नियमानुसार (विनयानुसार) सुसंवादपूर्ण (संपूर्ण संघ) प्रवारणा कृती.

हया चार प्रवारणा कृती (पवारणा कम्मं) पैकी, पहिल्या तीन (१ ते ३) प्रवारणा कृती ह्या धम्म विनयाविरुद्ध केल्या जाणाऱ्या कृती असल्याने, त्या तीन कृती भिक्खूंनी करू नयेत. त्या प्रवारणा कृती करण्यास भगवान बुद्धांनी अनुमती दिलेली नाही. मात्र, चौथ्या प्रकारची कृती (कम्म) म्हणजे, 'धम्मेन समगं पवारणा कम्मं' अर्थात धम्मविनयानुसार सुसंवादपूर्ण (संपूर्ण संघ) प्रवारणा कृती करण्याची भिक्खूंना भगवंतांनी अनुमती दिली आहे. ही कृती (कम्म) धम्मविनयानुसार सुसंवादपूर्ण, संपूर्ण संघासमोर केली जाण्यायोग्य प्रवारणा कृती (पवारणा कम्मं) असल्याने, 'अशाच प्रकारची प्रवारणा कृती मी करेन,' हे भिक्खूंनी शिकण्यायोग्य आहे, असे भगवंतांनी म्हटले आहे.

**उपस्थित नसलेल्या भिक्खूची प्रवारणा :**

१) भगवान बुद्धांनी भिक्खूंना बोलावून त्यांना उद्देशून म्हटले, सर्व भिक्खूंनी एकत्र जमावे, संघ प्रवारणा करेल. असे म्हटल्यावर एक भिक्खू भगवान बुद्धांना म्हणाला, भन्ते! एक भिक्खू आजारी असल्याने तो आला नाही. तेव्हा, भगवंतांनी रोगी भिक्खूची प्रवारणा दुसऱ्या भिक्खूमार्फत पाठविण्याची भिक्खूंना अनुमती दिली व प्रवारणा कशा प्रकारे द्यावी ते सांगितले, रोगी भिक्खूने एका भिक्खूजवळ जाऊन, एका खांद्यावर उत्तरासंग ठेवून, दोन्ही गुडघे जमिनीला टेकवून बसावे. दोन्ही हात जोडून असे म्हणावे, मी प्रवारणा देतो, ती घेऊन जावी. माझ्यासाठी प्रवारणा करावी. अशा प्रकारे कायेद्वारे सूचित करावे, वाणीद्वारे सूचित करावे, काया-वाणीद्वारे सूचित करावे. म्हणजे पवारणा दिल्यासारखी होईल. जर कायेद्वारे सूचित केले नाही, वाणीद्वारे सूचित केले नाही वा काया-वाणीद्वारे सूचित केले नाही तर प्रवारणा दिल्यासारखी होणार नाही. अशा पद्धतीने इच्छिल्या प्रमाणे प्रवारणा मिळाली तर ठीक, जर नाही मिळाली तर, भिक्खूंनी त्या रोगी भिक्खुला मंचकावरून अथवा आसनावरून आणून संघामध्ये प्रवारणा करावी. जर रोग्याला जागेवरून हलविल्यामुळे त्याचा रोग वाढेल आणि त्याचा कदाचित मृत्यूही होईल, असे जर सोबतच्या भिक्खूंना वाटले तर त्याला जागेवरून हलवू नये; परंतु संघाने त्या रोगी भिक्खूच्या ठिकाणी जाऊन प्रवारणा केली पाहिजे. नाही केल्यास दुष्कृत्याचा दोष लागेल.

प्रवारणा दिल्यावर, प्रवारणा घेऊन जाणारा त्या ठिकाणावरून निघून गेला, तर योग्य अशा दुसऱ्याजवळ प्रवारणा

दिली पाहिजे. प्रवारणा दिल्यावर प्रवारणा घेऊन जाणाऱ्याने तेथेच भिक्खू जीवनाचा त्याग केला किंवा त्याचा मृत्यू झाला किंवा तो श्रामणेर झाला किंवा तो वेडा झाला किंवा त्यांचा त्याची मन:स्थिती विक्षिप्त बनली किंवा तो त्रासिक, पीडित असा राहू लागला किंवा तो बेशुद्ध अवस्थेत गेला, दोष न स्वीकारल्याने तो अधिकच उत्तेजित झाला, भिक्खू नसताना चोरून चीवर घालून भिक्खूसारखा राहू लागला, माता-पित्याची हत्या करणारा झाला, अर्हताची हत्या करणारा झाला, संघामध्ये दुफळी पाडणारा बनला, भगवान बुद्धांच्या शरीरातून रक्त सांडणारा झाला, स्त्री- पुरुष दोन्हीचे लिंग असणारा समजला जाऊ लागला, तर दुसऱ्याला प्रवारणा दिली पाहिजे.

भिक्खूंनो! प्रवारणा दिल्यावर प्रवारणा घेऊन जाणारा रस्त्यामधूनच निघून गेला, तर प्रवारणा घेऊन गेल्यासारखी होणार नाही / आणल्यासारखी होणार नाही. प्रवारणा दिल्यावर प्रवारणा घेऊन जाणारा उभयलिंगी (द्विलिंगी) असणारा समजला जाऊ लागला, तर दुसऱ्याला प्रवारणा दिली पाहिजे. जर प्रवारणा घेऊन जाणारा रस्त्यामधूनच निघून गेला तर प्रवारणा घेऊन गेला नाही, असे समजावे.

प्रवारणा दिल्यावर प्रवारणा घेऊन जाणारा संघामध्ये जाऊन प्रवारणा आणतो. प्रवारणा दिल्यावर प्रवारणा घेऊन जाणारा उभयलिंगी (द्विलिंगी) असणारा समजला जाऊ लागला. प्रवारणा आणल्यासारखे समजावे.

प्रवारणा दिल्यावर प्रवारणा घेऊन जाणारा, संघामध्ये नियमानुसार सूचना न देता प्रवारणा आणतो. प्रवारणा दिल्यावर प्रवारणा घेऊन जाणारा सूचित न करता, प्रमाद / आळस केल्याने बोलत नाही, अपराध केल्याने बोलत नाही. तर प्रवारणा आणल्यासारखी होईल.

वर्षावास करण्याकरिता, भिक्खू अरण्यात, एखाद्या निर्जन अशा ठिकाणी, एखाद्या गावातील निवासात, झाडाखाली राहात असत. काही ठिकाणी बरेचसे भिक्खू एकत्र राहात, तर काही ठिकाणी चार-पाच जण राहात, तर काही ठिकाणी एकटे-दुकटे राहात वर्षावास पूर्ण करीत असत. भगवान बुद्धांनी 'प्रवारणेच्या दिवशी भिक्खूने समग्र भिक्खू संघासमोर प्रवारणा करावी' असा नियम केला. परंतु, जेथे भिक्खू संघ राहात असे, त्या ठिकाणापासून दूरच्या ठिकाणी, अरण्यात राहात असत. त्यामुळे नियमानुसार काही भिक्खूंना प्रवारणेच्या दिवशी वेळेवर येता येत नसे. त्यामुळे ते भिक्खू संघासमोर प्रवारणा करण्यापासून वंचित राहात असत. ही बाब भिक्खूंनी भगवान बुद्धांना सांगितली असता, भगवंतांनी केलेले मार्गदर्शन थोडक्यात पाहूया.

अ) त्यावेळी प्रवारणेच्या दिवशी अन्य एका निवासामध्ये पाच भिक्खू वर्षावास करण्याकरिता एकत्रित राहात होते. तेव्हा त्यांना असे वाटले की, 'भगवंतांनी समग्र भिक्खू संघासमोर प्रवारणा करण्याचा नियम केला आहे.' आम्ही तर पाच जणच आहोत. आम्ही प्रवारणा कशी करावयाची?' त्यांनी भगवान बुद्धांना सांगितले, तेव्हा, भगवान बुद्धांनी पाच जणांच्या भिक्खू संघाला प्रवारणा करण्याची अनुमती दिली.

ब) त्यावेळी प्रवारणेच्या दिवशी अन्य एका निवासामध्ये चार भिक्खू एकत्रित वर्षावास करण्याकरिता राहात होते. तेव्हा त्यांना असे वाटले, 'भगवंतांनी पाच जणांच्या भिक्खू संघाला प्रवारणा करण्याची अनुमती दिली. आम्ही तर चार जण आहोत. आम्ही प्रवारणा कशी करावयाची?' त्यांनी भगवान बुद्धांना सांगितले, तेव्हा, चौघा (भिक्खू) जणांनी (भिक्खू) एक-दुसऱ्याशी प्रवारणा करण्याची भगवंतांनी अनुमती दिली आणि प्रवारणा कशी करावयाची तेही सांगितले. हुशार, चतुर व सामर्थ्यवान असणाऱ्या भिक्खूने त्या भिक्खूंना सांगावे, आयुष्यमान हो! माझे म्हणणे ऐकून घ्यावे, आज प्रवारणेचा दिवस आहे. तुम्हाला मान्य असेल तर आपण एक-दुसऱ्याशी प्रवारणा करावी. तेव्हा वृद्ध भिक्खूने (स्थविर) एका खांद्यावर उत्तरासंग घेऊन, दोन्ही गुडघे जमिनीवर टेकवून बसावे, दोन्ही हात जोडून, त्या भिक्खूंना असे म्हणावे, आयुष्यमानहो! मी आयुष्यमानांजवळ (समक्ष) प्रवारणा करतो. आपण कृपा करून मला (माझे) पाहिलेले, ऐकलेले व संशय असलेले दोष / अपराध दाखवून द्यावा. तो पाहून मान्य असल्यास मी त्याचे परिमार्जन करेन. असे तीन वेळा म्हणावे.

क) त्यावेळी, प्रवारणेच्या दिवशी एका निवासामध्ये वर्षावास करण्याकरिता तीन भिक्खू एकत्र रहात होते. तेव्हा त्यांना असे वाटले, 'भगवंतांनी, पाच जणांच्या भिक्खू संघाला प्रवारणा करण्याची अनुमती दिली. चार जणांना (भिक्खूंना) एक-दुसऱ्याशी प्रवारणा करण्याची अनुमती दिली. आम्ही तर तीन जण आहोत. आम्ही प्रवारणा कशी करावी?' त्यांनी भगवान बुद्धांना सांगितले, तेव्हा भगवंतांनी, 'तीन जणांना (भिक्खूंनी) एक-दुसऱ्याशी प्रवारणा करण्याची अनुमती दिली आणि प्रवारणा कशी करावयाची तेही सांगितले, एका हुशार सामर्थ्यवान... मी त्याचे परिमार्जन करेन. असे तीन वेळा म्हणावे.

ड) त्यावेळी, प्रवारणेच्या दिवशी अन्य एका निवासात वर्षावास करण्याकरिता दोन भिक्खू एकत्र रहात होते. तेव्हा त्यांना असे

वाटले, 'भगवंतांनी, पाच जणांच्या...एक दुसऱ्याशी प्रवारणा करण्याची परवानगी दिली. आम्ही तर दोघे जण आहोत. आम्ही प्रवारणा कशी करावी ?' त्यांनी भगवान बुद्धांना सांगितले, तेव्हा भगवंतानी, दोन जणांना (भिक्खूंनी) एकमेकांशी प्रवारणा करण्याची अनुमती दिली आणि प्रवारणा कशी करावी तेही सांगितले, एका हुशार, चतुर व सामर्थ्यवान... मी त्याचे परिमार्जन करेन, असे तीन वेळा म्हणावे.

**एकट्याच राहणाऱ्या भिक्खूची प्रवारणा :**

त्यावेळी, प्रवारणेच्या दिवशी अन्य एका निवासामध्ये एकच भिक्खू वर्षावास करण्याकरिता राहात होता. तेव्हा त्याला असे वाटले, 'भगवंतानी, पाच जणांच्या दोन जणांना एकमेकांशी प्रवारणा करण्याची अनुमती दिली आहे; परंतु मी तर येथे एकटाच आहे. मी प्रवारणा कशी करावी ?' त्याने भगवान बुद्धांना सांगितले. भगवान बुद्धांनी भिक्खूंना उद्देशून म्हटले, "भिक्खूहो ! प्रवारणेच्या दिवशी अन्य एखाद्या निवासात एकच भिक्खू एकटाच वर्षावास करण्याकरिता राहात असेल तर त्याने ज्या सभागृहात किंवा तात्पुरत्या उभ्या केलेल्या मांडवामध्ये, किंवा झाडाखाली, जिथे भिक्खू येतात ती जागा झाडून स्वच्छ करून, पिण्यायोग्य असे पाणी आणि वापरण्यायोग्य पाण्याची व्यवस्था करावी, बसण्यासाठी आसने अंथरून, दिवे लावून बसले पाहिजे. जर भिक्खू आले तर त्यांचेसोबत प्रवारणा करावी. जर नाहीच आले तर त्याने, 'आज मी प्रवारणा करतो,' असा दृढ संकल्प करावा. संकल्प नाही केला तर दुष्कृत्याचा दोष (दुक्कट) लागेल.

**प्रवारणेच्या वेळी अपराधाचा प्रतिकार :**

त्यावेळी, प्रवारणा करते वेळी एका भिक्खूला दोषाचे स्मरण झाले, तेव्हा त्या भिक्खूला असे वाटले, 'भगवंतांनी नियम केला आहे की,' दोषयुक्त असलेल्याने प्रवारणा नाही केली पाहिजे.' मी तर सदोष आहे. मी काय करणे योग्य होईल ?' त्याने भगवान बुद्धांना सांगितले. तेव्हा भगवान बुद्धांनी भिक्खूंना उद्देशून म्हटले, "भिक्खूहो ! येथे प्रवारणेच्या दिवशी भिक्खूला त्याचे दोषाचे स्मरण झाले. तेव्हा त्या भिक्खूने दुसऱ्या एका भिक्खूजवळ जाऊन, एका खांद्यावर उत्तरासंग ठेवून, दोन्ही गुडघे टेकवून बसावे, दोन्ही हात जोडून म्हटले पाहिजे, आयुष्यमान ! मी अमूक-अमूक नावाचा दोष अपराध केला आहे, तो मी स्वीकारतो. त्यामुळे दुसऱ्या भिक्खूने त्याला विचारावे, तू दोष पाहतोस ? हां/होय, मी पाहतो' व असे पुढील काळात (आयतिं) होणार नाही याची दक्षता घेईन / संयम बाळगीन." भिक्खूंनो ! येथे प्रवारणेच्या दिवशी एका भिक्खूला दोषाबद्दल संदेह / संशय असेल, तर त्या भिक्खूने दुसऱ्या एका भिक्खूजवळ जाऊन... हात जोडून, असे म्हणावे, आयुष्यमान ! मला अमुक-अमुक दोषाबद्दल संदेह / संशय आहे. जेव्हा मी संशयरहित / संदेहरहित होईन त्यावेळी त्या दोषाचा प्रतिकार करेन, असे म्हणून त्या भिक्खूने प्रवारणा करावी. त्याकरिता प्रवारणेच्या कर्तव्यात अडथळा येऊ देऊ नये.

त्यावेळी, प्रवारणेच्या दिवशी अन्य एखाद्या निवासामध्ये पाच किंवा पाचपेक्षा अधिक / जास्त भिक्खू एकत्रित आले होते. तेव्हा त्यांना जाणीव नव्हती की, निवासी भिक्खू अजून आलेले नाहीत. त्यांनी धम्म समजून, विनय समजून, समूहाचा (संघाचा) एक भाग असतानाही, समग्र असलेचे समजून प्रवारणा केली. ते प्रवारणा करीत असताना तेथे अन्य निवासी भिक्खू जे त्यांच्यापेक्षा अधिक संख्येने होते, ते आले. त्यांनी ही बाब भगवान बुद्धांना सांगितली. भिक्खूंनो ! येथे, प्रवारणेच्या दिवशी अन्य एखाद्या निवासामध्ये पाच किंवा पाचपेक्षा अधिक भिक्खू एकत्र जमतात / येतात त्या वेळी त्यांना माहिती नव्हती की, निवासी भिक्खू अजून आलेले नाहीत. त्यांनी धर्म समजून, विनय समजून समूहाचा (संघाचा) एक भाग असताना, समग्र समजून प्रवारणा करतात. ते प्रवारणा करीत असताना तेथे निवासी भिक्खू जे त्यांचेपेक्षा संख्येने अधिक असतात, ते येतात. भिक्खूंनो ! त्या भिक्खूसह पुन्हा प्रवारणा करावी. पुन्हा प्रवारणा करणाऱ्यांना दोष नाही.

३) भिक्खूंनो ! येथे, प्रवारणेच्या दिवशी तेथे निवासी भिक्खू जे त्यांचे संख्ये सारखेच समसमान (समसमो) असणारे येतात. भिक्खूंनो ! येथे प्रवारणेच्या दिवशी तेथे निवासी भिक्खू जे संख्येमध्ये समसमान आहेत, ते जर आले तेव्हा जी प्रवारणा झाली ती ठीक आहे, उर्वरित प्रवारणा (ते ही) ही करावी.

४) भिक्खूंनो येथे प्रवारणेच्या दिवशी तेथे निवासी भिक्खू जे संख्येमध्ये त्यांचेपेक्षा कमी आहेत, ते जर आले तर तेथपर्यंत जी प्रवारणा झाली ती ठीक आहे, उर्वरित प्रवारणाही (ते ही) करावी.

५) भिक्खूंनो ! येथे प्रवारणेच्या दिवशी समग्र समजून प्रवारणा करतात. प्रवारणा करून झाल्यानंतर दुसरे निवासी भिक्खू जे संख्येने त्यांचेपेक्षा अधिक आहेत, ते जर आले तर भिक्खूंनो ! त्या भिक्खूंनी पुन्हा प्रवारणा केली पाहिजे, प्रवारणा पुन्हा करण्यास दोष नाही.

६) भिक्खूंनो! येथे प्रवारणेच्या दिवशी समग्र समजून प्रवारणा करतात. प्रवारणा करून झाल्यानंतर दुसरे निवासी भिक्खू ने संख्येने त्यांच्या समसमान आहेत, ते जर आले तर भिक्खूंनो, ते भिक्खू येईपर्यंत जी प्रवारणा झाली असेल तर ठीक, उर्वरित प्रवारणा (आलेल्या भिक्खूंना) सांगितली पाहिजे. प्रवारणा करणाऱ्यास दोष नाही.

७) भिक्खूंनो ! येथे प्रवारणेच्या दिवशी समग्र समजून प्रवारणा करतात. प्रवारणा करून झाल्यानंतर दुसरे निवासी भिक्खू जे संख्येने त्यांचेपेक्षा कमी आहे, ते जर आले तर भिक्खूंनो, ते भिक्खू येईपर्यंत जी प्रवारणा झाली असेल ती ठीक, उर्वरित प्रवारणा (आलेल्या भिक्खूंना) सांगितली पाहिजे. प्रवारणा करणाऱ्यास दोष नाही.

**द्वेवाचिक दीपप्रवारणा**

क) त्यावेळी, कोसल प्रदेशातील एका निवासस्थानी प्रवारणेच्या दिवशी जंगली लोकांचे भय निर्माण झाले, त्यामुळे तीन वचनांनी भिक्खू प्रवारणा करू शकले नाहीत. हे भगवान बुद्धांना सांगितले. भगवान बुद्धांनी 'दोन वचनां'नी प्रवारणा करण्याची भिक्खूंना अनुमती दिली.

ख) जंगली लोकांचे भय जास्तच निर्माण झाल्याने दोन वचनांनीसुद्धा भिक्खू प्रवारणा करू शकले नाहीत. हे भगवान बुद्धांना सांगितले. तेव्हा भगवंतांनी 'एक वचना'ने प्रवारणा करण्याची भिक्खूंना अनुमती दिली.जंगली लोकांचे पूर्वीपेक्षा जास्तच भय निर्माण झाले. त्यामुळे, एकवचनाने सुद्धा भिक्खू प्रवारणा करू शकले नाहीत. ही बाब भगवान बुद्धांना सांगितली. तेव्हा भगवंतांनी 'भिक्खूंना त्याच वर्षाऋतूमध्ये प्रवारणा करण्यास अनुमती दिली.'

२) त्यावेळी, प्रवारणेच्या दिवशी एका निवासात लोक दान देत होते. त्यामुळे रात्र संपत येत होती. तेव्हा त्या भिक्खूला असे वाटले, 'लोक दान देत असल्याने बहुतेक रात्र संपत येत आहे. जर संघ तीन वचनाने प्रवारणा करेल तर संघाची प्रवारणा पूर्ण होणार नाही आणि पहाट होईल. आम्ही काय केले पाहिजे?' हे भगवान बुद्धांना सांगितले. तेव्हा भगवान बुद्ध भिक्खूंना संबोधत म्हणाले, "भिक्खूहो! अन्य एखाद्या निवासात प्रवारणेच्या दिवशी लोक दान देत असतील व त्यामुळे रात्र संपत जावी, आणि भिक्खूंना असे वाटावे, लोक दान देत असल्यामुळे रात्र जास्त संपत आहे. जर संघ तीन वचनयुक्त प्रवारणा करेल तर संघाची प्रवारणा पूर्ण होणार नाही आणि पहाट होईल. तेव्हा एका चतुर, हुशार व सामर्थ्यवान भिक्खूने संघास निवेदन करावे, भन्ते! संघाने माझे ऐकावे. लोक दान देत असल्यामुळे आज बहुतेक रात्र संपत येत आहे. संघ जर तीन वचनांनी प्रवारणा करेल तर संघाची प्रवारणा तर होणारच नाही, आणि पहाट मात्र होईल. जर संघास योग्य वाटत असेल तर संघाने दोन वचनाची..... एक वचनाची..... किंवा त्याचाऋतूमधील प्रवारणा करावी.

३) येथे जर प्रवारणेच्या दिवशी एखाद्या निवासात भिक्खू धम्मसुत्ताचे वाचन करीत नसल्यामुळे सुत्तधर भिक्खू सुत्ताचे संगायन करीत असल्यामुळे विनयधर भिक्खू विनयासंबंधी निर्णय करीत असल्यामुळे धर्मोपदेशक धर्माबाबत विचार-विनिमय करीत असल्यामुळे भिक्खू आपापसामध्ये भांडण करीत असल्यामुळे पुष्कळ रात्र संपावी तेव्हा भिक्खूंना अशा प्रकारे होईल, भिक्खू धम्मसुत्ताचे वाचन करीत असल्यामुळे आपापसात भांडण करीत असल्यामुळे बरीच / पुष्कळ रात्र संपून जात आहे. जर संघ तीन वचनांची प्रवारणा करेल तर संघाची प्रवारणा पूर्ण तर होणार नाही, पण पहाट होईल. तेव्हा हुशार, चतुर व सामर्थ्यवान भिक्खूने संघास निवेदन करावे भन्ते। संघाने माझे ऐकावे, भिक्खू धम्मसुताचे वाचन करीत आपापसात भांडण करीत असल्यामुळे आज बरीच रात्र झाली आहे. जर संघ तीन वचनाची प्रवारणा करेल तर संघाची प्रवारणा होणार पूर्ण होणार नाही, पण पहाट होईल. तेव्हा संघ उचित समजत असेल तर संघाने दोन वचनाची, एक वचनाची किंवा त्याच वर्षाऋतूमध्येच प्रवारणा करावी.

४) त्या काळी, कोसल प्रदेशातील एका निवासस्थानी प्रवारणेच्या दिवशी मोठ्या संख्येने भिक्खू संघ एकत्रित जमा झाला होता. पावसाळी ढग मोठ्या प्रमाणात जमू लागल्याने व पावसापासून भिक्खूंना सुरक्षित राहण्यासाठी ते ठिकाण अपुरे होते. त्या वेळी भिक्खूंना असा विचार आला, 'येथे मोठ्या संख्येने भिक्खू संघ एकत्रित जमा झाला आहे.

पावसापासून सुरक्षित राहण्यास ही जागा अपुरी असून, पावसाळी ढगही मोठ्या प्रमाणात जमू लागले आहेत. जर संघ तीन वचनाची प्रवारणा करेल तर संघाची प्रवारणा पूर्ण होणार नाही व पावसाळी ढग वर्षाव करतील. तेव्हा आपण काय केले पाहिजे?' ही वार्ता त्यांनी भगवान बुद्धांना सांगितली. तेव्हा भगवंतांनी म्हटले,

"जर, प्रवारणेच्या दिवशी एखाद्या निवासात मोठ्या संख्येने भिक्खू संघ एकत्रित झाला असेल आणि मोठ्या प्रमाणात पावसाळी ढग जमू लागल्याने पावसापासून सुरक्षित राहण्यासाठी

ते स्थान अपुरे आहे. त्यावेळी भिक्खूंना विचार आला, 'मोठ्या संख्येने भिक्खू संघ येथे एकत्रित जमा झाला आहे. त्यांना पावसापासून सुरक्षित राहण्यासाठी हे स्थान अपुरे आहे व पावसाळी ढग मोठ्या प्रमाणात जमू लागले आहेत. अशा वेळी जर संघ तीन वचनाची प्रवारणा करेल तर संघाची प्रवारणा पूर्ण होणार नाही आणि हे पावसाळी ढग वर्षाव करतील.' तेव्हा, हुशार व समर्थ भिक्खूने संघास सूचित करावे, "भन्ते! संघाने माझे ऐकावे. येथे मोठ्या संख्येने भिक्खू संघ एकत्रित जमा झाला आहे. हे पावसाळी ढग वर्षाव करतील. तेव्हा संघास मान्य असेल तर संघाने दोन वचनाची, एक वचनाची किंवा याच वर्षाऋतूतील प्रवारणा करावी."

यावरून, अशा प्रकारे विविध अडथळे येत असल्यामुळे प्रवारणेमध्ये व्यत्यय येत असे. त्याबद्दल भिक्खू तथागताना सांगत अडथळयांना काढून टाकून अडथळयाविरहित प्रवारणा करण्याबाबत कशी करावी या संदर्भात तथागत भिक्खूंना मार्गदर्शन करीत. प्रसंगी त्याकरिता भिक्खूंना नियमही घालून देत, हे आपणास दिसून येते. याव्यतिरिक्त इतर अडथळयांबाबत थोडक्यात समजून घेऊ..

५) जर एखाद्या निवासात प्रवारणेच्या दिवशी राजाकडून अडथळा / धोका निर्माण झाला.

६) जर, एखाद्या निवासात प्रवारणेच्या दिवशी चोरांपासून धोका निर्माण झाला

७) जर एखाद्या निवासात प्रवारणेच्या दिवशी अग्नीचे विघ्न निर्माण झाले.

८) जर एखाद्या निवासात प्रवारणेच्या दिवशी पाण्यापासून धोका निर्माण झाला.

९) जर एखाद्या निवासात प्रवारणेच्या दिवशी मनुष्यांकडून अडथळे निर्माण झाले.

१०)जर एखाद्या निवासात प्रवारणेच्या दिवशी अमनुष्यांकडून (राक्षसांकडून अथवा भूतांकडून, अथवा देवतांकडून) (अमनुस्सनारायो). विघ्न आले.

११)जर एखाद्या निवासात प्रवारणेच्या दिवशी हिंसक प्राण्यापासून (वाळन्तरायो) धोका निर्माण झाला

१२) जर एखाद्या निवासात प्रवारणेच्या दिवशी दंश करणाऱ्या प्राण्यांपासून (सरीसृप साप, विंचू इ.) धोका निर्माण - झाला .

१३) जर एखाद्या निवासात प्रवारणेच्या दिवशी जगण्याचीच भीती (जीववितन्तरायो) निर्माण झाली-

१४) जर एखाद्या निवासात प्रवारणेच्या दिवशी ब्रम्हचर्यामध्ये विघ्न आले आणि तेव्हा भिक्खूंना असे वाटले, 'हा ब्रह्मचर्यातील अडथळा आहे. जर संघ तीन वचनाची प्रवारणा करेल, तर संघाची प्रवारणा पूर्ण तर होणार नाहीच पण ब्रह्मचर्याचे पालन करण्यात अडथळा होईल. तेव्हा हुशार, समर्थ भिक्खूने भिक्खू संघास सूचित करावे, -

"भन्ते ! संघाने माझे ऐकावे. हा ब्रह्मचर्याचा अडथळा आहे. जर संघास मान्य असेल तर संघाने दोन वचनाची, एक वचनाची किंवा याच वर्षाऋतू काळातील प्रवारणा करावी."

काही भिक्खू विनयाविरुद्ध वर्तन करीत, त्यामुळे त्यांचेकडून अपराध घडत असे. अपराध करूनही ते प्रवारणा करीत. कधीकधी त्यांचेकडून गंभीर अपराध/गुन्हाही घडत असे. कधी एकदुसऱ्यास अपशब्द बोलत, अपमानास्पद बोलत. अशा अनेक प्रकारची अनेक अकुशल कर्मे ते करीत असत. हे सर्व अपराध करूनही ते प्रवारणा करीत असत. अशा दुष्कृत्य करणाऱ्या भिक्खूंबद्दल इतर भिक्खू भगवान बुद्धांना सांगत. त्यावर भगवान बुद्धांनी त्या दुष्कृत्यांबाबत भिक्खूंना काय मार्गदर्शन केले त्याबद्दल थोडक्यात पाहू.

त्याकाळी, अपराधप्राप्त सहा वर्गीय भिक्खू प्रवारणा करतात, असे भगवान बुद्धांना सांगितले असता, अपराधप्राप्त भिक्खूंनी प्रवारणा करणे योग्य नाही. जो अपराधप्राप्त भिक्खू प्रवारणा करेल, त्यास दुष्कर्म केल्याचा (दुक्कट) दोष लागेल, असे म्हणून, अपराधप्राप्त जो कोणी प्रवारणा करतो, त्याचेवर अपराधासंबंधी दोषारोप करून, त्यास अवसर (ओकासं) देण्याची अनुमती देतो, असे भगवंतांनी भिक्खूंना उद्देशून सांगितले.

अवकाश करवून घेतेवेळी सहावर्गीय भिक्खू अवकाश करण्यासाठी इच्छुक नव्हते, हे भगवान बुद्धांना सांगितले, तेव्हा जो कोणी अवकाश करीत नाही त्याची प्रवारणा स्थगित ठेवण्याची अनुमती देऊन भगवान बुद्धांनी अनुमती देऊन म्हटले, यावेळी प्रवारणा अशा पद्धतीने स्थगित ठेवली पाहिजे :- चतुर्दशी किंवा पौर्णिमा या प्रवारणेच्या दिवशी, त्या व्यक्तीसह त्या ठिकाणी संघामध्ये बोलण्यायोग्य असे बोलावे, भन्ते ! संघाने माझे ऐकावे, येथे असलेली अमुक-अमुक नावाची व्यक्ती

दोषपूर्ण आहे. त्याची प्रवारणा स्थगित ठेवतो. तो समोर असला तरी प्रवारणा करू नये. प्रवारणा अशी स्थगित होते.

त्यावेळी, सहावर्गीय भिक्खू (असा विचार करून) चांगल्या भिक्खूच्या समोर आमची प्रवारणा स्थगित ठेवतात. दोषरहित शुद्ध अशा भिक्खूंचीसुद्धा प्रवारणा विनाकारण स्थगित ठेवतात. तसेच, ज्यांची प्रवारणा झालेली आहे, त्यांचीसुद्धा प्रवारणा स्थगित ठेवतात. हे भगवान बुद्धांना सांगितले. तेव्हा, दोषरहित, शुद्ध अशा भिक्खूची प्रवारणा विनाकारण स्थगित ठेवणे योग्य नाही. जो कोणी प्रवारणा स्थगित ठेवेल त्यास दुष्कर्म केल्याचा दोष लागेल.

अशाप्रकारे, प्रवारणा स्थगित अथवा अस्थगित ठेवता येत येत नाही. भिक्खूंनो! प्रवारणा अस्थगित कशी होते ? जर तीन वचनांनी प्रवारणेचे भाषण देऊन, सांगून, समाप्त केलेली प्रवारणा स्थगित ठेवतो, तर ती अस्थगित प्रवारणा होते.....दोन वचनांनी - एकवचनानी आणि त्याच वर्षाऋतूतील प्रवारणेचे भाषण देऊन, सांगून, समाप्त केलेली प्रवारणा स्थगित ठेवतो. तर ती अस्थगित प्रवारणा होते. अशा प्रकारे भिक्खूंनो अस्थगित प्रवारणा होते.

**प्रवारणा स्थगित कशी होते ?**

भिक्खूंनो! जेव्हा तीन वचनांनी प्रवारणेसंबधी भाषण देऊन केली गेलेली, सांगितली गेलेली प्रवारणा समाप्त झालेली नसताना, कोणीतरी ती प्रवारणा स्थगित ठेवतो, ती स्थगित प्रवारणा होते. दोन वचनांनी, एक वचनाने किंवा त्याच वर्षाऋतूमधील प्रवारणेसंबंधी भाषण देऊन, सांगितलेली प्रवारणा स्थगित होते. अशा प्रकार भिक्खूंनो! स्थगित प्रवारणा होते.

येथे भिक्खूंनो! यावेळी प्रवारणेच्या दिवशी एक भिक्खू दुसऱ्या भिक्खूची प्रवारणा स्थगित ठेवतो. पण अन्य भिक्खू त्या भिक्खूला जाणत असतात. ह्या आयुष्मानाचे, कायिक आचरण अशुद्ध आहे, वाचिक आचरण अशुद्ध आहे, आजीविका अशुद्ध आहे. मुर्ख, अव्यक्त असणारा असा आहे. एखाद्या विषयात रत असलेला साधनेत / आचरणात योग्य सामर्थ्य देणारा नाही. थांब भिक्खू ! बस कर, वाद घालू नकोस, कलह करू नकोस, भांडण करू नकोस, तिरस्कार (विवाद) करू नकोस, अशाप्रकारे फटकारून/झिडकारून संघाने प्रवारणा केली पाहिजे.

येथे भिक्खूहो! प्रवारणेच्या दिवशी एक भिक्खू दुसऱ्या भिक्खूची प्रवारणा स्थगित ठेवतो. पण, अन्य भिक्खू त्या भिक्खूला जाणत असतात. "ह्या आयुष्मानाचे, कायिक आचरण शुद्ध आहे मात्र वाचिक आचरण अशुद्ध आहे, आजीविका अशुद्ध आहे" अशा प्रकारे फटकारून / झिडकारून संघाने प्रवारणा केली पाहिजे.

येथे भिक्खूहो! यावेळी एक भिक्खू दुसऱ्या भिक्खूची प्रवारणा स्थगित ठेवतो. पण, अन्य भिक्खू त्या भिक्खूला जाणत असतात. ह्या आयुष्यमानाचे, कायिक आचरण शुद्ध आहे, वाचिक आचरण शुद्ध आहे, आजीविका आहे- अशा प्रकारे फटकारून / झिडकारून संघाने प्रवारणा केली पाहिजे. अशुद्ध येथे भिक्खूहो! यावेळी एक भिक्खू दुसऱ्या भिक्खूची प्रवारणा स्थगित ठेवतो. पण, अन्य भिक्खू त्या भिक्खूला जाणत असतात. ह्या आयुष्यमानाचे कायिक आचरण शुद्ध आहे, पण त्याचे वाचिक आचरण शुद्ध आहे, आजीविका शुद्ध आहे. मुर्ख, अव्यक्त असणारा असा आहे. एखाद्या विषयात रस असलेला, साधनेत/आचरणात योग्य सामर्थ्य देणारा नाही.' योग भिक्खू ! बस कर.

वाद घालू नकोस, कलह करू नकोस, भांडण करू नकोस, तिरस्कार करू नकोस' अशा प्रकारे फटकारून/झिडकारून संघाने प्रवारणा करावी.

येथे भिक्खूंनो! यावेळी, प्रवारणाच्या दिवशी एक भिक्खू दुसऱ्या भिखुची प्रवारणा स्थगित ठेवतो. पण, अन्य भिक्खू त्या भिक्खूला जाणत असतात. ह्या आयुष्यमानाचे, कायिक आचरण शुद्ध आहे, वाचिक आचरण शुद्ध आहे, आजीविका शुद्ध आहे. हा पंडित चतुर वक्ता आहे. प्रेरित केल्यावर साधनेत सक्षमता देणारा आहे. त्याला असे बोलावे, मित्रा! तू ह्या भिक्खूची प्रवारणा का म्हणून स्थगित ठेवलीस ? शीलमर्यादेचे उल्लंघन केल्यामुळे स्थगित ठेवलीस? किंवा वाईट वर्तनामुळे (आचारविपत्तिया) स्थगित ठेवलीस? किंवा, सिद्धांतामधील असफलेमुळे (दिद्विविपत्तिया) स्थगित ठेवलीस? जर तो असे म्हणाला शीलमर्यादेचे उल्लंघन केल्यामुळे मी स्थगित ठेवतो किंवा वाईट वर्तनामुळे मी स्थगित ठेवतो किंवा सिद्धांतातील असफलतेमुळे मी स्थगित ठेवतो. तेव्हा त्याला असे विचारावे, आयुष्यमान! तू शीलमर्यादा उल्लंघनास जाणतोस काय? (सीलविपत्ति), तू वाईट वर्तन म्हणजे काय काय हे जाणतोस काय? (आचारविपति), तू सिद्धांतांतील अपयशाबद्दल (दिद्विविपत्ति) जाणतोस काय ? जर तो असे म्हणेल, होय, मी जाणतो आयुष्यमान ! शील मर्यादेचे उल्लंघन (सिलविपत्ति) जाणतो. वाईट वर्तनही (आचारविपत्ति) जाणतो, सिद्धांतातील अपयशही (दिव्दिविपत्ति) जाणतो. तेव्हा त्याला म्हणावे, पण मित्रा! शीलासंबंधी

आपत्ति किती (दोष) आहेत? वर्तनासंबंधीच्या किती आपत्ती (दोष) आहेत ? सिद्धांताबद्दल किती आपत्ती / दोष आहेत? जर तो असे म्हणेल, चार पाराजिक, तेरा संघादिसेस हे शीलासंबंधी आपती / दोष आहेत. थुल्लच्चयं (गंभीर गुन्हा), पाचित्तियं (प्रायश्चित), पाटिदेसनीयं (कबुलीजबाब), दुक्कट (दुष्कर्म), दुब्भासितं (अपशब्द, अपमानित शब्द) हे वर्तनासंबंधीचे (आचारविपत्ति) चे दोष / आपत्ति आहेत. मिच्छादिट्ठि ( मिथ्या दृष्टि), अन्तग्गाहिकाट्ठि (विधर्मी शिकवण - मत) ह्या सिद्धांताबद्दलच्या मताच्या (दिट्ठिविपत्ति) आपति/ दोष आहेत. तेव्हा त्याला असे विचारले पाहिजे, “मित्रा! ह्या भिक्खूची तू जी प्रवारणा स्थगित ठेवलीस, ती काय पाहून स्थगित ठेवलीस, किंवा ऐकून स्थगित ठेवलीस का? किंवा संशय असल्याने स्थगित ठेवलीस का?” जर तो असे म्हणेल, “पाहिल्याने स्थगित ठेवली आहे, ऐकल्याने मी स्थगित ठेवतो, संशय असल्याने मी स्थगित ठेवतो. तेव्हा त्याला असे विचारावे, ‘मित्रा! तू ह्या भिक्खूची प्रवारणा पाहिल्याने स्थगित ठेवलीस, तर तू काय पाहिलेस? तू कसे पाहिलेस? कधी तू पाहिलेस ? कुठे तू पाहिलेस? त्याने पाराजिक अपराध केला किंवा पाहिले का? संघादिसेसचा अपराध केलेला पाहिलास का ? थुल्लच्चयं (गंभीर गुन्हा ) --- पाचित्तियं ( प्रायश्चित) पटिदेसनीयं (कबुलीजबाब) --- दुक्कट (दुष्कर्म ) -- दुब्भासितं (अपशब्द वापरण्याचा) अपराध केलेला पाहिलास, त्यावेळी तू कुठे होतास? हा भिक्खू कुठे होता ? त्यावेळी तू काय करीत होतास आणि हा भिक्खू काय करीत होता ? “जर तो असे म्हणेल, आयुष्यमान ! मी ह्या भिक्खूची, प्रवारणा (अपराध) पाहिल्याने स्थगित ठेवत नाही, तर मी ऐकण्यानेसुद्धा प्रवारणा स्थगित ठेवतो.” तेव्हा त्याला असे विचारावे, मित्रा! जर तू ह्या भिक्खूची प्रवारणा (अपराध) ऐकल्याने स्थगित ठेवतोस, तर तू ते काय ऐकलेस ? ते तू कसे ऐकलेस ? ते तू कधी ऐकलेस? तू ते कोठे ऐकलेस ? पाराजिक अपराध केल्याचे ऐकलेस किंवा संघादिसेस अपराध केल्याचे ऐकलेस? थुलुच्चयं (गंभीर गुन्हा)... पाचित्तियं पाटिदेसनियं..... दुक्कट....... दुब्भासितं अपराध केल्याचे ऐकलेस, भिक्खूकडून ऐकलेस, भिक्खूणींचे ऐकलेस, प्रशिक्षणार्थीचे (सिक्खामानं) ऐकलेस, की श्रामणेरांचे ऐकलेस, राजाचे ऐकलेस की राजाच्या प्रधानमंत्र्यांचे (राजमहात्तानं) ऐकलेस, तित्थियांचे ऐकलेस की तित्थियांच्या श्रावकांचे ऐकलेस?

तेव्हा तो असे म्हणेल,’ आयुष्यमान ! मी या भिक्खूची प्रवारणा ऐकल्याने (अपराध) स्थगित ठेवली नसती, परंतु संशयामुळे प्रवारणा स्थगित ठेवतो. तेव्हा त्यास असे बोलावे, “मित्रा! जर तू ह्या भिक्खूची प्रवारणा (अपराधाच्या) संशयामुळे स्थगित ठेवतोस, तर तू काय संशय करतोस, कसला संशय करतोस, केव्हा संशय करतोस, कोठे संशय करतोस, पाराजिक अपराधाचा संशय करतोस की, संघादिसेस अपराधाचा संशय करतोस, थुल्लच्चयं--- पाचितिय-- पाटिदेसनीय --- दुक्कट --- दुब्भासित अपराधाचा संशय करतोस, भिक्खूचे ऐकून संशय करतोस की भिक्खूणीचे ऐकून संशय करतोस, प्रशिक्षणार्थीचे सामने (सिक्खामानाय) ऐकून संशय करतोस, श्रामणेराचे ऐकून संशय करतोस की श्रामणेरीचे ऐकून संशय करतोस, उपासकाचे ऐकून संशय करतोस की उपासिकेचे ऐकून संशय करतोस, राजाचे ऐकून संशय करतोस की, राजाच्या प्रधानाचे ऐकून संशय करतोस, दुसऱ्या मताच्या संस्थापकाचे (तित्थियान) ऐकून संशय करतोस की त्यांच्या शिष्याचे ऐकून संशय करतोस. जर तो असे म्हणेल, आयुष्यमान ! ह्या भिक्खूची प्रवारणा मी संशयामुळे स्थगित ठेवत नाही, परंतु, मला माहीत नाही, मी ह्या भिक्खूची प्रवारणा का म्हणून स्थगित ठेवतो हेच मला कळत नाही.

भिक्खू हो! दोषारोप करणारा भिक्खू जर, चौकशीद्वारे (अनुयोगेन) आपल्या ज्ञानी सहपाठींचे (सब्रह्मचारीनं) चित्ताने समाधान करू शकला नाही, तर त्याचे दोषारोप योग्य नाहीत, असे भिक्खूनी स्पष्टपणे म्हटले पाहिजे.

भिक्खूहो! जर तो भिक्खू, विनाकारणीभूत असलेले पाराजिक (अपराध / दोष) ठेवण्यास सहमत असेल, तर, संघादिसेसचा (दोष) आरोप करून संघाने प्रवारणा केली पाहिजे. जर तो भिक्खू विनाकारणीभूत असलेल्या संघादिसेसचा (अदोष) आरोप ठेवण्यास सहमत असेल तर, धर्मानुसार / नियमानुसार (दंड) करून, संघाने प्रवारणा केली पाहिजे.

जर तो भिक्खू, विनाकारणीभूत असलेले गंभीर गुन्हा (थुल्लच्चयेन) - दुब्भासित (अपमानजनक शब्द) -- अपराधाचा आरोप! दोष ठेवण्यास सहमत असेल तर धर्मानुसार (दंड) करून संघाने प्रवारणा केली पाहिजे. भिक्खू हो ! ज्याचेवर दोषारोप केला आहे, तो भिक्खू पाराजिकाचा अपराध (स्वत:) केल्याचे स्वीकार करतो त्याला (संघातून कायमचे) काढल्यानंतर संघाने प्रवारणा केली पाहिजे.

जर तो भिक्खू, ज्याचेवर दोषारोप केला आहे, त्याने संघादिसेसचा अपराध (स्वत:) केल्याचा स्वीकार करतो,

त्याचेवर संघादिसेसचा (अपराध) आरोप करून संघाने प्रवारणा केली पाहिजे. जर तो भिक्खू, ज्याचेवर थुल्लचय (गंभीर गुन्ह्याचा अपराध) (अपमानजनक शब्द बोलल्याचा) दुब्भासितचा अपराध केल्याचा स्वीकार करतो, त्याचेवर धर्मानुसार / नियमानुसार (दंड) करून संघाने प्रवारणा केली पाहिजे.

भिक्खूंनो! प्रवारणेच्या दिवशी एका भिक्खूने गंभीर गुन्ह्याचा अपराध केला होता. काही भिक्खू (त्या भिक्खूचा गुन्हा) थुल्लच्चय (गंभीर गुन्हाचा ) अपराध असल्याच्या मताचे होते, तर काही भिक्खू संघादिसेसचा अपराध असल्याच्या मताचे होते. तेव्हा भिक्खूंनो ! जे थुल्लचय (गंभीर गुन्हा) अपराध असल्याच्या मताचे आहेत, त्यांनी त्या भिक्खूला एका बाजूने दूर नेऊन त्याला धर्मानुसार / नियमानुसार (दंड) करून, संघाजवळ परत जाऊन असे म्हणावे, आयुष्यमान! ह्या भिक्खूने जो विनयाच्या उल्लंघनाचा अपराध केला होता, त्याचे त्याने निराकरण केले आहे. तेव्हा संघाला मान्य असेल तर संघाने प्रवारणा करावी.

भिक्खूंनो ! येथे प्रवारणेच्या दिवशी भिक्खूने गंभीर गुन्ह्याचा अपराध केला होता. काही भिक्खू (त्या भिक्खूचा अपराध) थुल्लच्चय (गंभीर गुन्ह्याचा) असल्याच्या मताचे होते, तर काही भिक्खू पाचित्तिय असल्याच्या मताचे होते. काही भिक्खू थुल्लच्चय अपराध असल्याच्या मताचे होते, तर काही पाटिदेसनीय अपराध असल्याच्या मताचे होते.. काही भिक्खू थुल्लचय अपराध असल्याच्या मताचे होते, तर काही भिक्खू दुक्कट (दुष्कृत्य) अपराध असल्याच्या मताचे होते. काही भिक्खू थुल्लचय अपराध असल्याच्या मताचे होते, तर काही भिक्खू सुब्भासित (अपशब्द बोलणे) अपराध केल्याच्या मताचे होते. तेव्हा भिक्खूंनो! जे भिक्खू थुल्लच्चय अपराध असल्याचा मताचे आहेत, त्यांनी त्या भिक्खूला एका बाजूला दूर नेऊन त्याला धर्मानुसार / नियमानुसार (दंड) करून, संघाजवळील जाऊन असे म्हणावे, आयुष्यमान ! ह्या भिक्खूने जो विनय उल्लंघनाचा अपराध केला होता, त्याचे त्याने निराकरण केले आहे. तेव्हा संघाला मान्य असेल तर / योग्य वाटत असेल तर संघाने प्रवारणा करावी.'

"भिक्खूंनो! जर प्रवारणेच्या दिवशी भिक्खूने पाचित्तिय (अपराध) केला होता -

भिक्खूंनो! जर प्रवारणेच्या दिवशी भिक्खूने पाटिदेसनीय (अपराध) केला होता --

भिक्खूंनो! जर प्रवारणेच्या दिवशी भिक्खुने दुक्कट (दुष्कृत्य) (अपराध) केला होता ---

भिक्खूंनो! जर प्रवारणेच्या दिवशी भिक्खूने दुब्भासित (अपशब्द बोलणे) अपराध केला होता ---

काही भिक्खू (त्या भिक्खूचा अपराध) अपशब्द बोलण्याचा (दुब्भासित) अपराध केला असल्याच्या मताचे आहेत तर काही भिक्खू संघादिसेस अपराध केला असल्याच्या मताचे आहेत. तेव्हा जे भिक्खू अपशब्द बोलण्याचा (दुब्भासित) अपराध केला असल्याच्या मताचे आहेत, त्यांनी त्या भिक्खूला एका बाजूला दूर नेऊन धर्मानुसार / नियमानुसार (दंड) करून, संघाजवळ जाऊन असे म्हणावे, 'आयुष्यमान! ह्या भिक्खूने विनय उल्लंघनाचा जो अपराध केला होता. त्याचा त्याने धर्मानुसार नियमानुसार निराकरण केले आहे. तेव्हा संघाला योग्य वाटत असेल तर संघाने प्रवारणा करावी.

जर भिक्खूंनो! प्रवारणेच्या दिवशी भिक्खूने अपशब्द बोलण्याचा (दुब्भासित) अपराध केला असेल व काही भिक्खू (त्या भिक्खूचा अपराध) थुल्लच्चय (गंभीर गुन्हा) अपराध असल्याच्या मताचे आहेत, तर काही भिक्खू अपशब्द बोलण्याचा अपराध असल्याच्या मताचे आहेत तर काही भिक्खू पाचित्तिय अपराध असल्याच्या मताचे आहेत. काही भिक्खू अपशब्द बोलण्याचा अपराध केला असल्याच्या मताचे आहेत, तर काही भिक्खू पटिदेसनीय अपराध असल्याच्या मताचे आहेत. काही भिक्खू अपशब्द बोलण्याचा अपराध असल्याच्या मताचे आहेत, तर काही भिक्खू दुष्कर्म (दुक्कट) चा अपराध असल्याच्या मताचे आहेत. तर तेव्हा भिक्खूंनो ! अपशब्द बोलण्याचा अपराध (दुब्भासित) केल्यास केला असल्याच्या मताचे जे भिक्खू आहेत, त्यांनी त्या भिक्खूला एका बाजूने दूर नेऊन - जर संघाला योग्य वाटत असेल तर संघाने प्रवारणा करावी.

**वत्थुउपनादि:**

जर भिक्खूंनो! प्रवारणेच्या दिवशी एखादा भिक्खू संघासमोर असे कथन करेल, "भन्ते ! संघाने माझे ऐकावे. येथे वस्तू (दोष/अपराध) असलेचे जाणवतो, पण व्यक्ती जाणवत नाही. संघ जर उचित समजत असेल तर संघाने वस्तूला स्थगित ठेवून प्रवारणा करावी." तेव्हा त्याला असे म्हणावे, मित्रा! भगवंतांनी असा नियम केला आहे की, 'परिशुद्ध, प्रज्ञावान (भिक्खू) ने प्रवारणा करावी. जर वस्तू असल्याचे जाणवत असेल पण व्यक्ती जाणवत नाही तर, तसे त्याने तेथेच जाहीर करावे/ सांगावे.

जर भिक्खूंनो ! प्रवारणेच्या दिवशी एखादा भिक्खू संघामध्ये असे कथन करेल, भन्ते ! संघाने माझे ऐकावे. येथे व्यक्ती असल्याचे जाणवते, पण वस्तू (दोष) जाणवत नाही. संघ जर उचित समजत असेल तर संघाने व्यक्तीला स्थगित ठेवून प्रवारणा करावी.' तेव्हा त्याला असे म्हणावे, मित्रा ! भगवंतांनी असा नियम केला आहे की, परिशुद्ध अशा सर्व (भिक्खूंनी) एकत्रित जमून प्रवारणा करावी. जर व्यक्ती असलेचे जाणवत असेल, पण वस्तू जाणवत नसेल तर तसे त्याने तेथेच जाहीर करावे / सांगावे.

जर भिक्खूंनो ! प्रवारणेच्या दिवशी एखादा भिक्खू संघामध्ये असे कथन करेल, भन्ते ! संघाने माझे ऐकावे, येथे वस्तूही जाणवते आणि व्यक्तीही जाणवते. संघ जर उचित समजत असेल संघाने वस्तू व व्यक्तीला स्थगित ठेवून प्रवारणा करावी. तेव्हा त्याला असे म्हणावे, मित्रा ! भगवंतांनी एकत्रित जमून प्रवारणा करावी, असा नियम केला आहे. जर वस्तू आणि व्यक्तीही असल्याचे जाणवत असेल तर तसे त्याने तेथेच जाहीर करावे / सांगावे.

जर भिक्खूंनो ! प्रवारणेच्या पूर्वी वस्तू जाणवली आणि मागे व्यक्तीही जाणवली तर तत्काळ तसे सांगावे.जर भिक्खूहो ! प्रवारणेच्या पूर्वी व्यक्ती जाणवली आणि मागे वस्तू (दोष) तर त्याने तसे तेथेच जाहीर करावे. जर भिक्खूंनो ! प्रवारणेच्या पूर्वी वस्तूही आणि व्यक्ती ही जाणवली तर प्रवारणा केल्यानंतर त्याचा आरोप सांगावा. ते आरोपाचे प्रायश्चित होय..

**भण्डनकारकवत्थु :**

त्याकाळी, कोसल प्रातांतील अन्य एका निवासामध्ये अनेक प्रसिद्ध अभिजन भिक्खू वर्षावास करण्याकरिता आले. त्यांचे जवळपास दुसरे, भांडण करणारे, विवाद करणारे, कलह करणारे, आरडाओरड करणारे, तसेच संघावर दावा करणारे भिक्खूही होते 'त्यांनी वर्षावास पूर्ण केल्यानंतर प्रवारणेच्या दिवशी आम्ही त्यांची प्रवारणा स्थगित ठेवू.' असा विचार करून तेही वर्षावास करण्याकरिता तेथेच राहिले. हे त्या भिक्खूंनी ऐकले, 'आम्ही कसे करावे ?' असा प्रश्न त्यांना पडला. तो त्यांनी भगवान बुद्धांना सांगितला, भगवान बुद्धांनी म्हटले -

जर भिक्खूंनो ! येथे, अन्य एका निवासामध्ये अनेक प्रसिद्ध अभिजन भिक्खू वर्षावास करण्याकरिता आले. त्यांचे जवळपासच दुसरे, भांडण करणारे त्यांची प्रवारणा स्थगित ठेवतील तर, भिक्खूंनो, अनुमती देतो, 'त्या भिक्खूंनी दोन-तीन चतुर्दशीचे उपसोथ करण्याची, ज्यामुळे त्या भिक्खूंच्या अगोदर प्रवारणा करू शकतील.' भिक्खूंनो, जर ते भांडण करणारे संघावर दावा करणारे भिक्खू त्या निवासात आले तर निवासी भिक्खूंनी शीघ्रतेने एकत्र येऊन / जमून प्रवारणा केली पाहिजे. प्रवारणा केल्यानंतर त्यांना असे सांगावे, "मित्रांनो ! आम्ही प्रवारणा केली आहे. आयुष्यमान ! तुम्हाला जसे वाटेल तसे करावे."

भिक्खूंनो ! जर ते भांडण करणारे संघावर दावा करणारे भिक्खू कोणतीही व्यवस्था न करता, त्या निवासामध्ये आले, तर निवासी भिक्खूंनी आसन टाकावे, पाय धुण्यासाठी पाणी आणि पाट व पाय रगडण्यासाठी लाकूड ठेवावे. स्वागत करून त्यांचे पात्र व चीवर घेतले पाहिजे. पाण्यासाठी विचारावे आणि त्यांना सांगून सीमेच्या बाहेर जाऊन प्रवारणा केली पाहिजे. प्रवारणा केल्यानंतर त्यांना सांगावे, "आयुष्यमान ! आम्ही प्रवारण केली आहे. आयुष्यमान, तुम्हाला जसे वाटेल तसे करावे."

जर असे झाले तर उत्तमच चांगलेच झाले. नाही झाले तर हुशार, चतुर व सामर्थवान अशा एका निवासी भिक्खूने, अन्य निवासी भिक्खूंना सूचित असे करावे,

"निवासी आयुष्यमान हो ! माझे ऐकावे, जर आयुष्यमान, योग्य वाटत असेल तर यावेळी आपण उपोसथ करावे, पातिमोक्षाचे (पातिमोक्ख) वाचन करावे आणि पुढील अमावास्येला प्रवारणा करावी." जर भिक्खूंनो ! ते भांडण करणारे संघावर दावा करणारे भिक्खू असे म्हणाले, "आयुष्यमान हो ! चांगले होईल की, यावेळी आपण प्रवारणा केली पाहिजे" तेव्हा त्यांना असे सांगितले पाहिजे, "आयुष्यमानहो ! आमच्या प्रवारणेमध्ये तुम्हाला अधिकार नाही, यावेळी आम्ही प्रवारणा करणार नाही."

जर भिक्खूंनो ! ते भिक्खू, भांडण करणारे संघावर दावा करणारे भिक्खू पुढील अमावास्येपर्यंत जरी राहिले, तर, हुशार, चतुर व सामर्थ्यवान अशा एका भिक्खूने, निवासी भिक्खूंना सूचित करावे.

निवासी आयुष्यमानहो ! माझे ऐकावे. जर आपणास योग्य वाटत असेल तर आपण यावेळी उपोसथ करावे व पातिमोक्खाचे वाचन करावे (प्रतिबंधक नियमांचे) आणि पुढील शुक्लपक्षातील पौर्णिमेला प्रवारणा करावी.' "भिक्खूंनो ! जर ते, भांडण करणारे संघावर दावा करणारे भिक्खू असे म्हणाले," आयुष्यमान ! चांगले उत्तम होईल की, यावेळी आपण प्रवारणा

केली पाहिजे. तेव्हा त्यांना असे सांगावे, मित्रांनो! आमच्या प्रवारणेमध्ये तुम्हाला अधिकार नाही. आम्ही यावेळी प्रवारणा करणार नाही. भिक्खूंनो ! जर ते भांडण करणारे संघावर दावा करणारे भिक्खू, तेसुद्धा शुक्लपक्षातील पौर्णिमेपर्यंत राहिले तरी येणाऱ्या चातुर्मासातील आश्विन (कौमुदि) पोर्णिमेला भिक्खूंनी, इच्छा नसली तरीही प्रवारणा केली पाहिजे.

जर भिक्खूंनो ! भिक्खूबरोबर प्रवारणा करते वेळी, रोगी (आजारी) दुसऱ्या निरोगी (आजारी नसलेल्या) भिक्खूची प्रवारणा स्थगित ठेवतो तेव्हा त्याला सांगितले पाहिजे, आयुष्यमान! आपण आजारी (रोगी) आहात. आजारी (रोगी) असलेल्याने दोषारोप लावणे/ करणे अयोग्य आहे, असे भगवंतांनी म्हटले आहे. आयुष्यमान, रोगमुक्त होईपर्यंत थांबावे. रोगमुक्त झाल्यानंतर इच्छा असेल तर दोषारोप करावे. जर असे सांगूनही तो दोषारोप करीत / लावत असेल, तर त्याला अनादरासंबंधीचे पाचित्तिय आहे.

जर भिक्खूंनो! त्या भिक्खूबरोबर प्रवारणा करते वेळी, एक निरोगी भिक्खू दुसऱ्या रोगी भिक्खूची प्रवारणा स्थगित ठेवतो. तेव्हा त्याला असे सांगितले पाहिजे, आयुष्यमान ! हा भिक्खू आजारी / रोगी आहे, रोगी / आजारी असलेल्यावर दोषारोप करणे / लावणे अयोग्य आहे, असे भगवंतांनी म्हटले आहे. आयुष्यमान निरोगी होईपर्यंत प्रतीक्षा करावी. निरोगी झाल्यानंतर जर इच्छा असेल तर दोषारोप लावावेत. जर असे सांगूनही तो आरोप लावत असेल, तर त्याला घृणे / अनादरासंबंधीचे पाचित्तिय आहे.

भिक्खूंनो! ते भिक्खू प्रवारणा करते वेळी रोगी भिक्खू दुसऱ्या रोगी भिक्खूची प्रवारणा स्थगित ठेवतो, तेव्हा त्याने सांगितले पाहिजे, आयुष्यमानहो ! तुम्ही (दोघेही) रोगी (आजारी) आहात. रोगी असलेल्याने दोषारोप लावणे योग्य नाही, असे भगवंतांनी म्हटले आहे. आयुष्यमान हो! निरोगी होईपर्यंत प्रतीक्षा करावी. निरोगी झाल्यावर इच्छा असेल तर दोषारोप लावावेत. असे सांगूनही जर ते दोषारोप लावतील तर त्याला अनादराचे पाचित्तिय आहे.

भिक्खूंनो! त्या भिक्खूबरोबर प्रवारणा करतेवेळी निरोगी भिक्खूने दुसऱ्या निरोगी भिक्खूची प्रवारणा स्थगित ठेवतो तेव्हा संघाने त्या दोषांची उलटतपासणी करून, कारण विचारून, धर्मानुसार / नियमानुसार (दंड) करून, संघाने प्रवारणा केली पाहिजे.

त्यावेळी, कोसल प्रांतातील अन्य एका निवासात अनेक प्रसिद्ध अभिजन भिक्खू वर्षावास करण्याकरिता आले होते. तेथे विवादरहित राहून, आनंदाने एकत्रित राहिल्याने चांगला विहार (ध्यान, समाधी इ.) प्राप्त झाला. तेव्हा त्या भिक्खूंना असे वाटले, 'आम्ही, विवादरहित राहून ...... आनंदाने एकत्रित राहिल्याने चांगला विहार प्राप्त झाला आहे. जर आम्ही यावेळी प्रवारणा केली तर असे होण्याची शक्यता आहे की, भिक्खू प्रवारणा करून चारिकेसाठी / यात्रेसाठी निघून जातील. अशामुळे आम्ही आनंदी व उत्तम विहारापासून बाहेर होऊ. तेव्हा आम्ही कसे करावे ?' त्यांनी भगवान बुद्धांना सांगितले.

जर भिक्खूंनो ! येथे अन्य एका निवासामध्ये अनेक प्रसिद्ध अभिजन भिक्खू वर्षावास करण्याकरिता आले आहेत. त्यांनी विवादरहित राहून. आनंदाने एकत्रित राहिल्याने चांगला विहार प्राप्त झाला. तेथे, भिक्खूंना जर असे वाटले/झाले की, 'आम्ही विवादरहित राहून ० बाहेर होऊ.' भिक्खूंनो! अनुमती देतो. त्या भिक्खूंना प्रवारणा संग्रह करण्याची. तर, प्रवारणा संग्रह अशा प्रकारे करावा, सर्वांनी योग्य ठिकाणी एकत्रित जमावे. एकत्रित जमल्यानंतर हुशार, चतुर व सामर्थ्यवान अशा एका भिक्खूने संघासमोर निवेदन करावे,

भन्ते ! संघाने माझे ऐकावे, आम्ही विवादरहित राहून बाहेर होऊ. तेव्हा संघाला जर उचित वाटत असेल तर, संघाने प्रवारणा संग्रह करावा. यावेळी उपोसथ करावे, पातिमोक्ख नियमाचे वाचन करावे व चातुर्मासी आश्विन (कौमुदि) शुक्ल पक्षातील पौर्णिमेला प्रवारणा करावी. अशी घोषणा करतो.

भन्ते ! संघाने माझे ऐकावे, आम्ही विवादरहित राहून बाहेर होऊ. संघ प्रवारणा करेल, यावेळी उपोसथ करेल, पातिमोक्ख नियमाचे वाचन करेल आणि चार्तुमासातील आश्विन शुक्लपक्षातील पौर्णिमेला प्रवारणा करेल. ज्यांना मान्य असेल त्यांनी गप्प राहावे / बसावे व ज्यांना मान्य नसेल त्यांनी बोलावे.

संघ प्रवारणा संग्रह करेल, यावेळी उपोसथ करेल व पातिमोक्ख नियमाचे वाचन करेल आणि चातुर्मासातील आश्विन पौर्णिमेला प्रवारणा करेल. हे संघाला मान्य आहे, म्हणून संघ गप्प राहिला / बसला आहे, असे मी समजतो / अशी मी धारणा करतो.

जर भिक्खूंनो! त्या भिक्खूंनी त्यांचेसाठी प्रवारणांचा संग्रह केल्यानंतर, अन्य एका भिक्खूने जर असे म्हटले, आयुष्यमानहो !

प्रदेशामध्ये माझे काम / कर्तव्य असलेमुळे प्रदेशभ्रमण करण्याची माझी इच्छा आहे. तेव्हा त्याला असे सांगावे, ठिक आहे, मित्रा! आयुष्यमान ! प्रवारणा केल्यानंतर जावे. भिक्खूंनो! जर तो भिक्खू प्रवारणा करतेवेळी, अन्य एका भिक्खूची प्रवारणा स्थगित ठेवतो तेव्हा त्याला त्या भिक्खूने असे म्हणावे, सांगावे, मित्रा! माझ्या प्रवारणेमध्ये तुम्हाला / तुला अधिकार नाही. माझी प्रवारणा तुमच्यासोबत होणार नाही. जर भिक्खूंनो ! प्रवारणेच्या वेळी त्या भिक्खूची प्रवारणा दुसरा भिक्खू स्थगित ठेवतो. तेव्हा त्या भिक्खू संघाने दोघांचीही उलटतपासणी करून त्यांचेशी बोलून, शोध घेऊन धर्मानुसार / नियमानुसार (दंड) केला पाहिजे.

जर भिक्खूंनो ! प्रदेशामधील काम संपवून तो भिक्खू चातुर्मासी आश्विन शुक्ल पक्षातील पौर्णिमेच्यापूर्वी निवासस्थानी परत आला तर त्या भिक्खूच्या प्रवारणा करतेवेळी अन्य कोणी भिक्खू त्याची प्रवारणा स्थगित ठेवतो तेव्हा त्याने त्याला असे महटले पाहिजे, मित्रा! माझ्या प्रवारणेमध्ये तुम्हाला / तुला अधिकार नाही. माझी प्रवारणा झाली आहे. जर, त्या भिक्खूच्या प्रवारणा करते वेळी तो भिक्खू दुसऱ्या भिक्खूची प्रवारणा स्थगित ठेवतो तेव्हा संघाने दोघांचीही उलटतपासणी करून, त्यांचेशी बोलून, तपास करून, धर्मानुसार / नियमानुसार (दंड) करून, संघाने प्रवारणा केली पाहिजे.

**समारोप :**

वर्षावासाच्या अखेरच्या दिवशी म्हणजे शुक्ल पक्षातील चतुर्दशी व पौर्णिमा हे दोन प्रवारणा दिवस आहेत. वर्षावासाच्या अखेरच्या दिवशी भिक्खू प्रवारणा करतात. स्वत: कडून एखादा अपराध घडला असेल (मग तो लहान असो अथवा मोठा) भिक्खू संपूर्ण संघासमोर तो अपराध मांडतो/ सांगतो आणि अपराध केल्याचे मान्य करतो. प्रवारणेसंबंधी जेवढे मला आकलन झाले, त्यानुसार त्याची मांडणी केली आहे.

प्रवारणा (पवारणा) हा एक धर्मोत्सव असून, तो भिक्खू भिक्खुणी यांचेकरिता जेवढा महत्त्वाचा आहे, तेवढाच तो उपासक उपासिका यांचेसाठी देखील उत्साहाचा समारंभ होता व आहे. भगवान बुद्ध हे श्रावस्तीमध्ये अनाथपिण्डिकाने बांधून दिलेल्या जेतवनातील कुटीमध्ये राहात होते. तेव्हा त्यांनी भिक्खूंना प्रवारणा करण्याची अनुमती दिली व तसा नियम केला. तेव्हापासून भिक्खू संघ प्रवारणा करीत असत व करीत आहेत. प्रवारणा विधीबाबत पालि तिपिटकामधूनच माहिती मिळते; परंतु प्रत्यक्षात प्रवारणा समारंभात आपणास भाग घेता येत नाही; किंबहुना प्रवारणा उत्सवच आपण साजरा करीत नाही.

भगवान बुद्धांच्या वेळी, ज्ञानी, महाज्ञानी अशा भिक्खूंसह इतर भिक्खू प्रवारणा समारंभ किती उत्साहाने करीत असतील ! प्रत्यक्षात आपणास प्रवारणा विधी पाहता जरी येत नसला तरी, कल्पनेद्वारे त्याचा अनुभव तरी घेता येईल. तर मग चला मित्रांना! कल्पना करूया. कल्पना करण्यास काय हरकत आहे ?

तर मित्रांनो ! चला. डोळे बंद करा अन् पंचविसशे वर्षांपूर्वीच्या काळात जाऊ या...... तो वर्षावासाचा अखेरचा दिवस..... संपूर्ण नगर आनंदी, उत्साही वातावरणाने भारावलेले आहे...... सगळीकडे नगरवासियांची लगबग चालू आहे...... धावपळ करीत आहेत...... राजदरबारातही लगबग चालू आहे..... नगरात कासाय वस्त्रधारी भिक्खू प्रवेश करीत आहेत........ प्रवारणा समारंभाच्या ठिकाणापासून जवळ राहणारे, भिक्खू तर आहेतच, त्यांचेबरोबर दूर ठिकाणी राहणारे भिक्खू देखील आलेले आहेत..... तर काही भिक्खू नगरामध्ये अजूनही प्रवेश करीत आहेत........आसमंतात एक प्रकारचा वेगळाच आल्हाददायक उत्साह, उल्हास पसरला आहे..... अरे, ते पहा..... तथागत सम्मासम्बुद्ध पूर्वाभिमुख होऊन एका आसनावर बसलेले आहेत. त्यांचेसमोर महाज्ञानी सारिपुत्त स्थविर, ऋद्धिमान महामोगल्लान, स्थविर, स्थविर आनंद इत्यादी बसले असून, त्यांचे पाठीमागे कासाय वस्त्रधारी संपूर्ण भिक्खू संघ बसलेला आहे, हे दृश्य अतिशय विलोभनीय असे दिसत असून, सर्व वातावरण कसे शांत, धीरगंभीर असून, एक प्रकारचा आनंद, उत्साह भरलेला आहे...... अशा आल्हाददायक वातावरणात समस्त भिक्खू संघासमोर भिक्खू प्रवारणा करीत आहेत. कोणी भिक्खू, दुसऱ्या भिक्खूचा पाहिलेला अपराध, ऐकलेला अपराध अथवा संशय असलेला अपराध, शांतपणे धीरगंभीर आवाजात संघासमोर सांगत आहे....... तर अपराधाचा आरोप असलेला भिक्खूही शांतपणे धीरगंभीर आवाजात प्रतिकार करीत आहे. तर स्वत:कडून घडलेला अपराध एखादा कोणी संघासमोर स्वत: सांगत असून, तो अपराध केल्याचा स्वीकार करतो. अपराध सिद्ध झालेले भिक्खू संघाने दिलेला दंड स्वीकारून त्यांचा पश्चाताप करण्याचे वचनही देत आहेत.....शांत, धीरगंभीर, आल्हाददायक अशा वातावरणात प्रवारणा संपवून उल्हासित उत्साहित झालेले भिक्खू भगवान बुद्धांना अभिवादन करून...परवानगी घेऊन.....चारिकेसाठी.....लोककल्याणार्थ धम्माचा प्रचार-

प्रसार करण्यासाठी निघाले आहेत आल्हाददायक, उल्हासित शांततेने भारावलेल्या आसमंतातून धीरगंभीर आवाज घुमतो आहे...... अशा त्या आल्हाददायक, उल्हासित शांततेने भारावलेल्या आसमंतातून धीरगंभीर आवाज घुमतो आहे.

**बुद्ध सरणं गच्छामि। धम्मं सरणं गच्छामि।**
**संघं सरणं गच्छामि........चिरं तिट्ठतु बुद्ध सासनं ।**

## संस्थेची ठळक वैशिष्टये

१) "बुध्दसासन" हे त्रैमासिक नियमित सुरु आहे.

२) रविवारचे पालि भाषा वर्ग सुरु आहे.

३) पालि वाङ्‌मय परिसा वर्षातून एकदा साजरी करण्यात येते.

४) लेणी, स्तुप, पगोडा व इतर पुरातन स्थळांवर अभ्यास सहल नेली जाते.

५) पालि भाषा तत्वज्ञान विषयी तज्ञ व विद्वान विभूतींची व्याख्याने आयोजित करण्यात येतात.

६) **"आचार्य बुद्धघोष"** नावाचे संदर्भ ग्रंथालय सुरु असून त्याच्या लाभ विद्यार्थी व इतर जिज्ञासूंना देण्यात येतो.

७) ग्रामीण व शहरी भागात पालि भाषेचा प्रचार व प्रसार करीत आहोत.

८) पालि वाङ्‌मयावर महत्वपूर्ण ग्रंथ प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

९) संस्थेतर्फे दर वर्षी साजरे होणाऱ्या परिषदेत पालि भाषेचा उत्कर्ष, संशोधन, प्रचार व प्रसार करणाऱ्या व्यक्ती तसेच संस्था यांना "पालि भूषण" पुरस्कार दिला जातो.

१०) पहिल्यांदाच राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर पालि विद्वानांची मान्यता घेवून संस्था "पालि दिन" साजरा करीत आहे.



## आयुर्वेद आणि विपश्यना

– प्रो. अंगराज चौधरी

वरकरणी पाहता, आयुर्वेद आणि विपश्यनेचा काही संबंध दिसत नाही. आयुर्वेद ही वैद्यकीय पद्धत आहे आणि विपश्यना ही ध्यानाची पद्धत आहे. रोगनिवारणासाठी औषधोपचार केला जातो आणि चंचल मन एकाग्र करून शांततेत प्रस्थापित करण्यासाठी ध्यान केले जाते. पण विपश्यना म्हणजे केवळ चित्त किंवा मन एकाग्र करणे नव्हे तर त्या एकाग्रतेतून तीक्ष्णता आणि सूक्ष्मता प्राप्त करून आपल्या अंतरंगात डोकवायचे असते. आपण काय पाहतो आणि का पाहतो ते पुढे स्पष्ट केले आहे.

पण खोलवर जाऊन दोघांच्या ध्येयांचा विचार केल्यावर दोघांमध्ये खोलवर संबंध असल्याचे स्पष्ट होते. रोगमुक्त हा या दोघांचाही उद्देश आहे. जिथे आयुर्वेद शारीरिक आणि मानसिक आजारांवर उपचार करतो, तिथे विपश्यना ही भवरोग दूर करण्यासाठी ध्यानाची सर्वात प्रभावी पद्धत आहे.

आपल्याला माहीत आहे की जोपर्यंत आपण भौतिक रोगांनी ग्रस्त राहू, जोपर्यंत आपण जन्म-मृत्यूच्या चक्रातून जात राहू, तोपर्यंत आपल्याला शारीरिक आणि मानसिक रोग होतच राहतील. भवरोग भोगणे म्हणजे संसारात पुन:पुन्हा जन्म घेणे आणि देह धारण करून शारीरिक व मानसिक दु:ख भोगणे. भगवान बुद्धांनी तीन प्रकारच्या दु:खांचे वर्णन केले आहे; कारण मृत्यू भौतिक आहे, दु:खात त्यांनी सर्व प्रकारच्या दु:खांची गणना केली आहे. जन्म, म्हातारपण, रोग आणि अप्रिय यांचा संयोग, प्रियांपासून विभक्त होणे आणि इच्छित गोष्टींची प्राप्ती न होणे ही मानसिक दु:खे आहेत आणि वारंवार जन्म घेऊन पाच 'स्कंध' प्राप्त होणे हे देखील दु:ख आहे, कारण हा शारीरिक आणि मानसिक दु:खाचा आधार आहे.

पहिल्या दोन प्रकारच्या दु:खांच्या मुळाशी तृष्णेचे पाच भौतिक पंख आहेत. हे स्वरूप, वेदना, ज्ञान, संस्कृती आणि विज्ञान आहेत. या पाच पंखांना नाम-रूप असेही म्हणतात. ती व्यक्ती आणखी काय आहे ? नाम आणि रूपाचा संचय म्हणजे कोणतीही व्यक्ती केवळ पाच स्कंधांनी बनलेली असते.

मनुष्याला त्याच्या कर्माच्या फळामुळे किंवा तृष्णेमुळे पुन:पुन्हा जन्म घेऊन दु:ख भोगावे लागते हे आयुर्वेदाला निश्चितच माहिती आहे आणि तो असेही म्हणतो की, जीवनात सत्कर्म करावे, सदाचाराचे पालन करून जीवन शुद्ध करावे, पण हे कसे करायचे याचा तो मार्ग दाखवत नाही; परंतु कोणत्याही मार्गावर चालण्यासाठी माणूस निरोगी असणे आवश्यक आहे, शारीरिक आणि मानसिकदृष्टया निरोगी असणे आवश्यक आहे, म्हणून तो शरीर आणि मन निरोगी बनविण्यावर लक्ष केंद्रित करतो.

शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्।

धर्म आचरण करणे किंवा धर्मप्राप्तीच्या मार्गावर चालण्यासाठी, ज्याचे अनुसरण केल्याने मनुष्य तृष्णेची मुळे खोडून काढू शकतो आणि पुन्हा गर्भात येणे टाळू शकतो, त्यासाठी निरोगी शरीर आणि मन असणे आवश्यक आहे. त्यामुळे आयुर्वेद हे शरीर आणि मन निरोगी बनवण्याचे शास्त्र आहे. आयुर्वेदाचार्यांचा उद्देश शारीरिक आणि मानसिक रोग बरा करणे हा आहे. त्यासाठी तो रोगाचे सविस्तर निदान करतो, लक्षणांवरून रोग ओळखून औषध देतो, जेणेकरून ज्या कारणांमुळे रोग झाला ती सर्व नष्ट होतील. शरीराने निरोगी राहून धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ प्राप्त होऊ शकतात.

'धर्मार्थकाममोक्षाणामारोग्यं मूलमुत्तमम्'

हे खरे आहे की चरकासारख्या प्रख्यात वैद्यांना भगवान बुद्धांप्रमाणेच याची जाणीव होती की, दु:ख आणि दु:खाने आश्रय घेतलेल्या शरीराच्या उत्पत्तीचे मूळ कारण उपाधेचे अस्तित्व हे आहे.

उपधा हि परो हेतुर्दु:ख दु:खाश्रयप्रदा:त्याग: सर्वोपधानां च सर्व दु:खव्यपोहक: ।। उपाध म्हणजे तृष्णा हे दु:खाचे मूळ आणि सर्व तृष्णेचा त्याग हा दु:खाचा नाश करणारा व निरोधक आहे.

जेव्हा मोठी माणसे तृष्णेला वाईट समजतात आणि तृष्णारहित होऊन दीर्घायुष्य जगतात, तेव्हा त्याचा परिणाम सामान्य लोकांवर होतो आणि ही गोष्ट समाजात, वातावरणात अशा प्रकारे पसरते की लोक काही मर्यादेपर्यंत आपली तृष्णा भागवण्यापासून दूर राहतात. पण अशा गोष्टींचा फारसा उपयोग होत नाही. जितका फायदा व्हायला हवा होता तितका तर नाहीच. चरक म्हणतो की, इच्छा ही सर्व प्रकारच्या दु:खांची जननी आहे, परंतु इच्छा पूर्णपणे नष्ट कशी करावी जेणेकरून ती पुन्हा डोके वर काढू शकत नाही यावरचा उपाय तो काही सांगू शकत नाही. तृष्णा पूर्णपणे नष्ट करणे त्याच्या वैद्यकीय क्षेत्रात येत नाही.

भगवान बुद्ध आणि चरक दोघेही शल्यचिकित्सक आहेत. दोघेही रोग बरा करतात; परंतु या दोघांमधील मूलभूत फरक

असा आहे की, चरक हे शारीरिक आणि मानसिक आजारांवर उपचार करत असताना, भगवान बुद्धाचे संपूर्ण लक्ष या रोगांच्या मुळावर केंद्रित झाले आहे, जो भवरोग, म्हणजे प्रबळ तृष्णेमुळे आणि भौतिक चक्रातून जात असताना पुन्हा पुन्हा जन्म घेणे, वार्धक्य, रोग इत्यादि दु:ख भोगणे, अप्रिय व्यक्तीचा संयोग व प्रिय व्यक्तीचा वियोग व इच्छित वस्तू न मिळण्यामुळे दु:खी होणे अशा सर्व गोष्टींवर आहे. तृष्णारूपी जटेला, आपल्या आत आणि बाहेर सर्वत्र पसरलेल्या अशा त्या जटेला, ज्यामध्ये सर्व लोक अडकलेले आहेत तिला 'अन्तो जटा बहि जटा, जटाय जटिता पजा' (विसुद्धिमग्गो) शीलाच्या भरभक्कम आधारावर उभे राहून एकाग्र चित्ताने, बुद्धीच्या अखंडित तलवारीने ते कापून टाकायचे आहे. **'सीले पतिट्ठाय नरो सपञ्ञ, चित्तं पञ्ञ च भावयं।'** (तिला) अशा प्रकारे कापून टाकायचे आहे की, तिचा अंशमात्रही शिल्लक राहणार नाही, ती समूळ नष्ट व्हायला हवी. त्यांना माहीत होते की, जिथे जर तृष्णेचा मागमूसही उरला तर, ती पुन्हा मालुवा लतेसारखी पसरेल, **'मनुजस्स पमत्तचारिनो, तण्हा वढति मालुवा विय'** (धम्मपद ३३४), वणव्याप्रमाणे पसरेल. त्यामुळे तिला अशा प्रकारे नष्ट करायला हवे, जसे की ताडाच्या झाडाच्या खोडाला कापले जाते. त्याला अशाप्रकारे कापले जाते की, त्याच्या फांद्या पुन्हा उगवत नाहीत, तो कायमचा नष्ट होतो. त्या ताडाच्या झाडाचे खोड जसे कापले जाते त्याच पद्धतीने ते नष्ट करावे लागेल. तो अशा प्रकारे कापला जातो की त्याची पुन्हा पालवी उगवत नाहीत, तो कायमचा नष्ट होतो. याला पालिमध्ये **'तालावत्थुकता'** असे म्हटले गेले आहे. शिल्लक राहिलेले की शिल्लक राहिलेला अग्नी आणि शिल्लक राहिलेले दुखणे पुन:पुन्हा उद्भवतात, म्हणून त्यांचा थोडासा अंशही शिल्लक ठेवू नये, अशी एक म्हण आहे.

**ऋणशेषं, चाग्निशेषं, व्याधिशेषं तथैव च ।**
**पुन: पुन: प्रवर्धन्ते तस्माच्छेशं न कारयेत्।।**

भगवान बुद्ध केवळ तृष्णा पूर्णपणे नष्ट करण्यास शिकवत नाहीत, तर त्याचा मार्गही दाखवतात, उपायही सुचवतात.

त्यामुळे शारीरिक व मानसिक रोग बरे करणारा भिषक किंवा शल्यचिकित्सक असेल तर या रोगांच्या मुळाशी असलेल्या शारीरिक रोगांवर उपचार करणारा तो हाच परम भिषक, श्रेष्ठ शल्यचिकित्सक होय. भगवान बुद्धांनी **'सुनक्खत्त सुत्त'** (मज्जिमनिकाय ३.४४) मध्ये म्हटले आहे - **भिसको सल्लकवत्तो- तथागतस्सेतं अधिवचनं अरहतो सम्मासम्बुद्धस्स ।** म्हणजेच तथागत, अर्हत सम्यक बुद्धालाच भिषक किंवा शल्यचिकित्सक म्हणतात. का ? कारण तो सहा आध्यात्मिक खंडरूपी सुईने आणि आर्य प्रज्ञारूपी चक्षूंने शस्त्रक्रिया करतो. तो चक्षूने जखमेतील पू तर काढतोच, पण औषधही देतो जेणेकरून जखम लवकर सुकून बरी होऊन माणूस निरोगी होतो. त्यामुळे ते शल्यचिकित्सकही आहेत तसेच भिषकही आहेत.

सुरुवातीच्या आयुर्वेद शास्त्रात काय आहे हे मला निश्चितपण ठाऊक नाही, पण चरक संहितेत अशा अनेक गोष्टी आहेत ज्यांचे बुद्धाच्या शिकवणीशी खूप साम्य आहे. चरकदेखील बुद्धांप्रमाणेच भवरोगाला मोठा रोग आणि तृष्णेला भवरोगाचे कारण मानतात. प्रवृत्ती किंवा तृष्णा हा दु:खाचा मार्ग आणि निवृत्ती किंवा तृष्णाक्षय हा सुखाचा मार्ग मानतात. बुद्धांप्रमाणे चरक म्हणतो.

**सर्वप्रवृत्तिषु दु:खसंज्ञा, सर्वसंन्यासेसुख मित्यभिनिवेश:।**
**एष मार्गो 'पवर्गाय अतो'न्यथाववध्यते॥**

दोघांच्या मते मन आणि शरीर यांचा खोल संबंध आहे. माणूस जसा विचार करतो तसा तो बनतो. त्याचा उत्कर्ष आणि पतन हे त्याच्या विचारांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. चरकाच्या मते **'यत्क्रतुर्भवति तत्कर्म कुरुते यत्कर्म कुरुते तदभिनिष्पद्यते।'** माणूस त्याच्या संकल्पानुसार काम करू लागतो आणि तो त्याच्या कृतीनुसार बनतो. विचारानुसार इच्छा आणि इच्छेनुसार कर्म घडत असते आणि कर्मानुसार त्याची गती असते. आपण जे काही चांगलं किंवा वाईट करतो किंवा आपण जे काही चांगलं किंवा वाईट असतो त्यात मनाची भूमिका खूप मोठी असते. बुद्धांनी **मनोपुब्बङ्गमा धम्मा, मनोसेट्ठा मनोमया** इत्यादी सांगून ते अगदी स्पष्टपणे विशद केले आहे. एके ठिकाणी भगवान बुद्धांनी **'चेतनाहं, भिक्खवे, कम्में वदामि'** असे सांगून इष्ट किंवा अनिष्ट कर्म यांचे निर्धारण मनाच्या जाणिवेने होत असल्याचे सांगितले आहेत. भगवानांनी मनाची अफाट शक्ती पाहिली आणि ते शुद्ध करण्यावर, त्यातील विकार काढून टाकून ते निर्मळ करण्यावर खूप भर दिला. ते म्हणतात की, मन हेच सर्व मानवी क्रियांची गंगोत्री आहे. त्यामुळे ते दूषित होऊ देऊ नये. भगवान बुद्धांनी शोधलेल्या विपश्यना ध्यानभावनेचे अंतिम ध्येय म्हणजे मनाची शुद्धता करणे, मनाला विकारांपासून मुक्त करणे. भगवान बुद्धांच्या मते, दहा संयोजने आपल्याला भवचक्राशी बांधून ठेवतात.

सांख्य दृष्टिकोनातून या संयोजनांकडे पाहिले तर त्यातील काही राजस असतील तर काही तामसिक असतील. चरकही मनालाच भवचक्रात बांधून ठेवण्यासाठी जबाबदार मानतात. ही बाब त्यांच्या पुढील वक्तव्यावरून स्पष्ट होते.

**'मोक्षो रजस्तमो' भावाद बलवत्कर्म संक्षयात्।**
**वियोग: सर्वसंयोगैरपुनर्भव उच्यते ॥**

सर्व संयोग पुनर्जन्माकडे नेत नाहीत आणि संयोग स्वत:च रज आणि तम आहे.

चरक संहितेच्या अभ्यासातून हे स्पष्ट होते की चरक अनेक गोष्टी सांख्य आणि बौद्ध तत्त्वज्ञानाच्या प्रभावाखाली करतो. परंतु त्याचे मुख्य उद्दिष्ट शारीरिक आणि मानसिक रोग बरे करणे हे होते आणि मुक्ती प्राप्त करणे हे नव्हते; परंतु हे नाकारता येत नाही की, धर्माच्या कठिण मार्गावर चालण्यासाठी आवश्यक असलेले शरीर आणि मन निरोगी ठेवण्यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले आणि लोकांनी शुद्ध आणि सदाचारी जीवन जगून आपले मन शुद्ध ठेवावे यासाठी प्रसंगोपात अनेक गोष्टी सांगितल्या आहेत.

आयुर्वेद शास्त्र हे बुद्ध आणि पतंजलीच्या आधीही खूप विकसित शास्त्र होते, याबद्दल काही मतभेद नाहीत. पालि साहित्यातील जीवकाच्या कहाणीतून हे स्पष्ट होते. तक्षशिलेत आचार्य दिशाप्रमुख यांच्याकडे सात वर्षे अध्ययन केल्यानंतर जीवकाने जेव्हा गुरूंना असे सांगितले की, हे शास्त्र अत्यंत कठीण आहे आणि त्याचा शेवट सापडेल की नाही हे सांगता येत नाही, तेव्हा आचार्यांना त्याच्या ज्ञानाची परीक्षा घ्यायचे ठरवले. तो हुशार तर होताच, पण मेहनतीही होता आणि जे इतर विद्यार्थी सतरा वर्षांत शिकू शकले नाहीत, ते तो सात वर्षांतच शिकला होता आणि तेही संध्याकाळी आचार्यांच्या घरी काम करून. आचार्य म्हणाले की, खनित्री घेऊन तक्षशिलेच्या चहुकडे एक योजन जा आणि जी काही लता, फुले, वनौषधी, झाडे औषधी म्हणून वापरण्यास योग्य नाहीत ती आण. जीवकाला औषधी गुण नसलेली एकही वनस्पती काही सापडली नाही. त्याने हे आचार्यांना सांगितल्यावर आचार्य त्याच्या वैद्यकशास्त्राच्या ज्ञानाने प्रसन्न झाले. तिथे असा उल्लेख आहे की, जीवकाने राजगीरच्या श्रेष्ठीची डोकेदुखी, राजा बिंबिसाराचा भगंदर, राजा चंडपज्जोतचा पंडुरोग आणि स्वत: भगवानांना जुलाब देऊन त्यांची पोटदुखी बरी केली. इतकेच नाही तर अशा दोन शस्त्रक्रिया केल्या ज्यांच्याबद्दल ऐकून आजही शल्यचिकित्सक थक्क होतात. राजगीरच्या श्रेष्ठींच्या डोकेदुखीचा इलाज करण्यासाठी त्याने त्याच्या डोक्यावर शस्त्रक्रिया करून कवटी उघडून त्यातून दोन जंतू काढले. त्यानंतर कवटी शिवून टाकली आणि मग तो श्रेष्ठी पूर्णपणे बरा झाला.

बनारसच्या एका श्रेष्ठीपुत्राच्या आतड्यात एक गाठ होती त्यामुळे त्याला खाल्ल्यानंतर काहीही पचत नव्हते आणि त्यामुळे तो खूपच अशक्त होत चालला होता. जीवकाने त्याच्या पोटावर शस्त्रक्रिया करून त्याच्या आतड्यातील गाठ सरळ करून पोट पुन्हा शिवून टाकले. मग त्यावर लेप लावला आणि काही दिवसांतच तो श्रेष्ठीपुत्र बरा झाला.

या सर्व गोष्टी चमत्कारासारख्या वाटत असल्या तरी त्या चमत्कार नव्हत्या. आयुर्वेदशास्त्रावरील जीवकाच्या प्रभुत्वाचे हे परिणाम होते आणि भगवान बुद्धांपूर्वीही आयुर्वेद किती विकसित अवस्थेत होता याचा हा पुरावा होता.

पण चरकसंहिता वाचल्यावर भगवान बुद्धांच्या शिकवणीचा, त्यांच्या मानसिक विचारांचा चरकावर खूप प्रभाव पडला होता यात शंका नाही आणि परिणामी असे म्हणता येईल की, त्याने लिहिलेल्या 'चरकसंहिते' वर भगवान बुद्धांच्या विपश्यनेच्या तत्त्वज्ञानाचा खूप प्रभाव होता. चरक संहितेचे भाषिक दृष्टिकोनातून परीक्षण केले तर भगवान बुद्धाचा त्याच्यावर खूप प्रभाव होता यात शंका नाही. याचा पुरावा म्हणजे त्याने वापरलेले तांत्रिक शब्द, ज्यांचा भगवान बुद्धांनी आधीच वापर केलेला होता. म्हणूनच चरक आपल्या संहितेत अनेक ठिकाणी आत्म-कल्याण आणि आत्यंतिक दु:खातून मुक्त होण्याच्या उपायांबद्दल जागोजागी सांगतो; परंतु भगवान बुद्धांनी यासाठी विपश्यनेचा राजमार्ग सांगितला, चरकने तसे काही केले नाही. जरी चरक हा या विचारांनी प्रभावित झालेला दिसत असला तरी तो विपश्यनेच्या मार्गावर चालणे तर सोडाच, पण तो अवलंबण्याबद्दलही बोलत नाही. मात्र, तो मनावर नियंत्रण करून मानसिक विकार दूर करण्याबद्दल नक्कीच बोलतो.

चरकाने आपल्या संहितेत असे शब्द वापरले आहेत, ज्याचा अर्थ भगवान बुद्धांचे विचार समजून घेतल्याशिवाय समजू शकत नाही. मी इथे दोन-तीन शब्दांकडे तुमचे लक्ष वेधू इच्छितो. पहिला शब्द 'उपधा', दुसरा 'अनायास' आणि तिसरा 'आतुर'.

भगवान बुद्धांप्रमाणेच चरक देखील 'उपधा' ला दु:ख आणि दु:खाने पीडित असलेल्या शरीराच्या उत्पत्तीचे मूळ कारण मानले आहे. भगवान बुद्धांनी हा शब्द 'पुनर्जन्माचा आधार' किंवा

आसक्तीचे कारण या अर्थाने वापरला आहे. **उपधी हि नरस्स नन्दना, उपधीहि रस्स सोचना।** (धनियसुत्त, सुत्तनिपात) म्हणजे पुत्र, पशुधन, सोने-चांदी इ. उपाधी आहेत. चरकाची 'उपधा' ही भगवान बुद्धांची '**उपधी**'च आहे.

संस्कृत कोशांमध्ये, '**उपधा**' म्हणजे '**फसवणूक**', '**लबाडी**' असा अर्थ दिला आहे. याचा अर्थ '**आसक्ती**' किंवा '**पुनर्जन्माचा आधार**' असा होत नाही. पण पालि शब्दकोशात, उपधी म्हणजे तृष्णा किंवा तृष्णेमवशात् '**व्यक्ती**' किंवा '**वस्तू**' होय. चरकानेही हा शब्द ज्या अर्थी बुद्धाने वापरला त्याच अर्थाने वापरला आहे.

दुसरा शब्द '**अनायास**' हा आहे. '**अनायास**' म्हणजे शोक न करणे, चिंता न करणे. हे सारिपुत्त थेर याच्या गाथेतून स्पष्ट होते.

**उपसन्तो अनायासो, विप्पसन्नो अनाविलो।**
**कल्याणसीलो मेधावी, दुक्खस्सन्तकरो सिया ।।**

शांत, दु:खरहित, आनंदी, विचलित न होता कल्याणकारी आणि गुणवंत त्यांच्या दु:खाचा अंत करतात. चरकाने हा शब्द नेमका याच अर्थाने वापरला आहे. त्याने शीलवान आणि सदाचारी बनण्याविषयी सांगितले आहे, तर असे जीवन जगल्याने मनुष्याला शारीरिक व मानसिक रोग होत नाहीत असेही त्याने सांगितले आहे.

**सत्यवादिनमक्रोधं, निवृत्तं मयमैथुनात्।**
**अहिंसकमनायासं, प्रशान्तं प्रियवादिनम्।।**
**उपसितारं वृद्धानामास्तिकानां जितात्मनाम् ।**
**धर्मशास्त्रपरं विद्यात्ररं नित्य रसायनम् ।**

येथे चरकने आचार रसायनाविषयी सांगितले आहे, ज्यात भगवान बुद्धांनी शीलाच्या अंतर्गत आणि '**मङ्गलसुत्त**' मध्ये सांगितलेल्या सर्व गोष्टी आहेत.

काशी हिंदू विद्यापीठाच्या वैद्यकशास्त्र विभागाचे माजी संचालक आणि डीन आचार्य श्री प्रियव्रतजी शर्मा यांनी याचा अर्थ असा सांगितला आहे-

जे सत्य बोलणारे, क्रोध न करणारे, मद्यपान आणि संभोगापासून दूर राहणारे, हिंसा न करणारे, श्रम न करणारे आणि शांत, प्रियवादी... आस्तिक, जितात्मा, वृद्धांची सेवा करणारे आणि धर्मशास्त्र वाचणारे लोक नेहमी रसायनयुक्त असतात.

येथे आचार्यजींनी 'अनयास' चा अर्थ 'श्रम न करणारा' असा केला आहे. संस्कृत शब्दकोशात याचा अर्थ 'उत्स्फूर्तपणे' असा दिलेला आहे. 'अनायास' म्हणजे 'ना आयस' म्हणजे कष्ट न करणारा. त्यांना कोणीतरी विचारावे की, जे काम करत नाहीत ते आचार रसायनयुक्त कसे होतील ? शारीरिक श्रम न करणारा तर रोगी होईल? शरीर निरोगी ठेवण्यासाठी श्रम तर केलेच पाहिजेत, यावर ते काय उत्तर देतील ?

खरे तर चरकाने 'अनायास' हा शब्द नेमका त्याच अर्थाने वापरला आहे ज्या अर्थाने बौद्ध साहित्यात वापरला गेला आहे. 'अनायास' चा अर्थ शोक न करणे, चिंता न करणे, शांत राहणे असा आहे जसे आपण सारिपुत्तच्या गाथेत पाहिले आहे. आपटे यांनी त्याचा अर्थ सोपा केला आहे आणि तोही असा केला आहे 'जे कठिन किंवा त्रासदायक नसेल.' या अर्थाने हा शब्द बौद्ध साहित्यात वापरला जात नाही.

शोक केल्याने, चिंता केल्याने माणूस आजारी होतो. म्हणूनच म्हटले आहे की -

**चिता दहति निर्जीवं, चिंता दहति जीवितम्**
**चिता मेलेल्यांना जाळते, पण चिंता जिवंत लोकांना जाळते.**

बौद्ध साहित्याचा चरकावर किती प्रभाव होता हे त्याच्या 'अनायास' या शब्द वापरावरून स्पष्ट होते.

आणखी एक शब्द म्हणजे 'आतुर'. चरकाने 'आतुर' हा शब्द 'रुग्ण' या अर्थाने वापरला आहे, ज्या अर्थाने बौद्ध साहित्यात वापरला आहे. '**प्रयोजनं चास्य स्वस्थस्य स्वास्थ्य रक्षणमातुरस्य विकारप्रशमनं च।**' (म्हणजेच, निरोगी व्यक्तीच्या आरोग्याचे रक्षण करणे आणि रोग्याचे रोग बरे करणे हा आयुर्वेदाचा उद्देश आहे.)

संस्कृत शब्दकोशात याचा अर्थ 'उत्सुक' असा अनुवादित करण्यात आला आहे ज्याचा त्याच्याशी काहीही संबंध नाही. चरक संहितेच्या सांगोपांग अभ्यासातून या विचाराला पाठबळ मिळू शकते की, चरकाने अनेक शब्द त्याच अर्थाने वापरले आहेत ज्या अर्थाने भगवान बुद्धांनी किंवा बौद्ध ग्रंथात वापरले आहेत.

मला असे वाटते की, भगवान बुद्धांचा चरकावर खूप प्रभाव होता आणि या प्रभावामुळे मुख्यत्वे शारीरिक आणि मानसिक आजारांवर उपचार करूनही चरक अशा गोष्टींची चर्चा करायला विसरत नाहीत, ज्यामुळे माणसाचे जीवन सदाचारयुक्त आणि

मन शुद्ध होऊ शकते. मनाची शुद्धता शारीरिक आरोग्य सुनिश्चित करते. भगवान बुद्ध आणि चरक यांचे मन आणि शरीराच्याबाबत इतके एकमत आहे की, चरकावर भगवान बुद्धांचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. या संदर्भात दोन गोष्टी लक्षात घेण्याजोग्या आहेत. चरकने ते शब्द फक्त त्याच अर्थाने वापरलेले नाहीत ज्या अर्थी पतंजलीने वापरले आहेत. आमचे एक विद्वान साधक, श्री. सत्येंद्रनाथ टंडन यांनी त्यांच्या 'पतंजली योगसूत्र' या पुस्तकात हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे की पतंजलीचे योगसूत्र हे बुद्धोत्तर आहे आणि त्यावर विपश्यना ध्यानपद्धतीचा मोठ्या प्रमाणात प्रभाव आहे. चरक हा भगवान बुद्ध आणि पतंजली या दोघांनी वापरलेल्या तांत्रिक संज्ञांचा व्यापक वापर करतो. पतंजलीच्या 'राजस' आणि 'तामस' या संज्ञांचा वापर हे त्याचे उदाहरण आहे. राजसला उत्कटता आणि तामसला द्वेष म्हणतात, जे पालि साहित्यात 'लोभ' आणि 'दोस' या नावांनी आढळतात. त्यामुळे चरकावर भगवान बुद्धांचा मोठा प्रभाव पडला आहे आणि भगवान बुद्धांच्या विचारांच्या प्रकाशात त्याचे वैद्यकीय शास्त्र विकसित आणि समृद्ध झाले आहे, असे म्हणता येईल.

चरकाने मन आणि शरीर यांच्यातील संबंधांचे वर्णन केले आहे आणि शारीरिक रोगांवर मनाचा किती खोल प्रभाव पडतो हे तो ज्या सखोलतेने स्पष्ट करतो, त्यावरून हे स्पष्ट होते की, तो भगवान बुद्धांच्या विचारांनी खूप प्रेरित आणि प्रभावित आहे. आयुर्वेदानुसार 'स्वास्थ्य' म्हणजे वात, पित्त आणि कफ या तिन्ही धातूंचा समतोल, त्याचप्रमाणे सांख्यदर्शनानुसार सत्त्व, रजस आणि तामस यांची समतोलावस्था म्हणजे निसर्ग आहे. 'स्वस्थ' म्हणजेच 'निरोगी' या शब्दाचा अर्थ 'स्व' मध्ये वसलेला म्हणजेच निसर्गात वसलेला असणे. चरकाने एका सूत्रात म्हटले आहे -

**वायु : पित्तं कफश्चोक्त : शारीरो दोषसंग्रह : ।**
**मानस : पुनरुद्दिष्ट रजश्च तम एव च ।।**

शारीरिक रोग हे वायू, पित्त किंवा कफ यांच्यामुळे होतात आणि मानसिक रोग वासना, क्रोध, लोभ इत्यादींमुळे होतात. एके ठिकाणी तर 'कफ आणि लोभ, पित्त आणि क्रोध आणि वात आणि काम यांचा जवळचा संबंध आहे' असे म्हटले आहे.

भगवान बुद्धांनी दीघनिकायच्या 'अग्गञ्ञ सुत्ता' मध्ये दाखवून दिले आहे की, लोभामुळे तृष्णा निर्माण होते, मग लोक चोरी करू लागतात, चोरी केल्याने देशद्रोह होतो आणि मग लोक खोटे बोलू लागतात आणि मग विकारांचे न संपणारे चक्र सुरू होते. यातून वासना, क्रोध, अहंकार, द्वेष, कटुता, अभिघात, भीती, दु:ख, चिंता आणि उद्वेग उद्भवतात. चरकानेही लोभ हे पापाचे कारण मानले आहे' लोभ: पापस्य कारणम ,।

"भगवान बुद्धांनी पर्यावरणाच्या प्रदूषणासाठी बाह्य कारणांपेक्षा अंतर्गत कारणांनाच जास्त जबाबदार मानले आहे. लोभामुळे आपण जंगले तोडतो, त्यामुळे मातीची झीज होते, नद्यांची पातळी वाढते आणि पूर येऊन सर्वनाश होतो. मग एक वेळ अशी येते की, जंगले तोडल्यामुळे ढग येत नाहीत, पाऊस पडत नाही आणि उष्णतेमुळे तिथे पिके घेता येत नाहीत. जर आपण स्वत:ला लोभाच्या नियंत्रणाखाली ठेवण्याऐवजी लोभावर स्वत:चे नियंत्रण ठेवले तर आपले आणि आपल्या पर्यावरणाचेही मोठे कल्याण होईल."

चरक यानेही असेच म्हटले आहे. प्राचीन काळी प्रज्ञापराध नसल्यामुळे लोक सुखी व शांत होते, पण कालांतराने अधर्म वाढल्याने लोभामुळे विश्वासघात, विश्वासघातामुळे खोटेपणा, खोटेपणामुळे काम, क्रोध, अहंकार, द्वेष, कटुता, आघात, भीती, उष्णता, शोक, चिंता आणि उद्वेग यांची प्रवृत्ती वाढली. त्यामुळे पंचमहाभूतांचे गुण नष्ट होऊ लागले आणि हवा, पाणी, अवकाश आणि काळ यांच्यात विकृती निर्माण होऊन रोग निर्माण होऊ लागले.

चरकाचे हे सर्व विचार भगवान बुद्धांच्या विचारांसारखेच आहेत. चरकावर भगवान बुद्धाचा प्रभाव इतका मोठा आहे की, आयुर्वेदशास्त्रातील सखोलतेचे परिमाण ही भगवान बुद्धांच्या विचारांचीच देणगी आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

ही भगवान बुद्धांचीच देणगी आहे ज्यांनी मनाचा अतिशय बारकाईने आणि खोलवर अभ्यास केला आणि सांगितले की जर मन दुर्गुणांनी दूषित असेल तर माणूस चांगला कसा होईल ? आणि मन जर विकाररहित, शुद्ध व निर्मळ असेल, तर लाभ मिळण्यात कसला संशय असेल ?

आयुर्वेदात उपचाराच्या तीन पद्धती आहेत दैवव्यपाश्रय, युक्तव्यपाश्रय आणि सत्वावजय. पहिल्या पद्धतीत तंत्र आणि मंत्र, मंगलकर्म आणि मणिधारण यांचा समावेश होतो, दुसऱ्या पद्धतीत औषधोपचार करून उपचार केले जातात आणि सत्वावजय उपचार पद्धतीमध्ये मनाला अपाय करणाऱ्या विषयांपासून दूर करून त्याची शक्ती वाढवून उपचार केले जातात. मनावर नियंत्रण आणून विकारांपासून मुक्ती मिळवण्याचा प्रयत्न केला जातो.

ही पद्धत मनाला खंबीर बनवायला शिकवते, आपले अहित करणारा कोण आहे आणि आपण त्याच्यापासून दूर कसे राहू शकतो किंवा त्याला आपल्यापासून कसे दूर ठेवू शकतो हे देखील सांगते. धर्मसम्राट स्वामी करपात्रीजी महाराज यांनी एका लेखात लिहिले आहे 'जेव्हा मनात वाईट विचार येऊ लागतात, त्या वेळी अलिप्त राहण्याचा प्रयत्न करा. भगवंतांचे चिंतन करून, मंत्रोच्चार करून, श्रवणाने, सत्संगाने वाईट विषयांचा प्रवाह खंडित केला पाहिजे. कादंबऱ्या, नाटके, वर्तमानपत्रे वाचावी लागली तरी चालेल, पण वाईट विचारांचा प्रवाह खंडित झाला पाहिजे. चांगल्या शास्त्रांचे आचरण, सत्पुरुषांचा सहवास आणि पवित्र वातावरणात राहिल्यास चांगले विचार तयार होतात, वाईट विचार आणि वाईट कर्म यांचा त्याग केला जातो. मन हे अचानकपणे संकल्प आणि निवड रहित होणे अशक्य आहे. त्यामुळे तसे प्रयत्न व्यर्थ आहेत. ज्याप्रमाणे सिंधू, शतद्, गंगा इत्यादी नद्यांचे प्रवाह भाद्रपदात थांबवून त्यांना त्यांच्या उगमस्थानी परत आणणे अशक्य आहे, मात्र त्यांच्या प्रवाहाचे तुकड्यांमध्ये रूपांतर करून त्या कोरड्या करणे शक्य आहे त्याचप्रमाणे मनातील विचार पूर्णपणे बंद करणे अशक्य आहे, तथापि, वाईट विचार थांबवून, सात्त्विक विचारांच्या प्रवाहांना प्रवाहित करून, सात्त्विक विचारांतून तामसी वृत्ती कमी करून आणि आंतरिक सूक्ष्म सात्त्विक वृत्तीतून स्थूल बाह्य सात्त्विक वृत्ती हळूहळू नष्ट करून, निवृत्ती प्राप्त होऊ शकते.

'येथे हे लक्षात घेण्यासारखे आहे की, या वैद्यकीय पद्धतीत' आपण मनाला हानिकारक विषयांपासून दूर करतो. मात्र, मनाला हानिकारक ठरणारे विषय तर शिल्लक राहतातच. पण पूर्णपणे संपत नाही. तुम्ही त्याला काही काळ मनाच्या अंधाऱ्या कोपऱ्यात ठेवता. तो तिथेच पडून राहतो आणि संधी मिळाल्यावर त्याचा ज्वालामुखीसारखा उद्रेक होऊ शकतो.

जिला तुम्ही एक छोटीशी ठिणगी मानून उपेक्षेच्या भावनेने कोपऱ्यात ठेवून देता, ती अनुकूल हवा मिळाल्यावर भयंकर रूप धारण करू शकते. म्हणूनच असे करणे म्हणजे खऱ्या अर्थाने तामसी वृत्तीला सत्त्वाने पराभूत करणे नव्हे. हे एक प्रकारे दडपशाहीचे धोरण आहे. तुमच्या मनात निर्माण झालेली खरी वृत्ती म्हणजे त्यापासून दूर जाण्याची वृत्ती.

विपश्यना ना दुर्गुणांना दडपायला शिकवते ना त्यापासून पळून जायला किंवा परामुख व्हायला शिकवते. ती विकारांकडे लक्ष देऊन, सजग राहून, त्यांच्याकडे आसक्तीने किंवा तिरस्काराने प्रतिक्रिया न देता तटस्थपणे पाहण्यास शिकवते. जर आपण आसक्ती किंवा द्वेषाने प्रतिक्रिया दिली तर आपण आपले दु:ख वाढवतो.

शमथ ध्यान पद्धतीमध्ये मुख्यत: मन एकाग्र करण्यावर भर दिला जातो. वर वर्णन केलेल्या पद्धतीने मनाची एकाग्रता साधता येते. पण आपल्या आत असलेल्या विकारातून कायमची मुक्तता मिळवता येते का ? आम्ही आत्ताच म्हटल्याप्रमाणे हे एक प्रकारचे दडपशाहीचे धोरण आहे, पळून जाण्याचे धोरण आहे.

करपात्री महाराजांनी नद्यांची उपमा देऊन त्यांचे प्रवाह उगमस्थानी नेऊन कोरडे करणे अशक्य असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांचे प्रवाह वळवून त्यांचे विघटन करून ते कोरडे करणे शक्य आहे. वरून पाहिल्यास आणि या साधर्म्यातून सांगितल्या गेलेल्या गोष्टी बरोबर वाटतात, पण थोडे खोलात गेल्यावर हे स्पष्ट होईल की, आपले संकल्प-विकल्प पाण्याच्या प्रवाहासारख्या स्थूल नाहीत. आपण एखादी स्थूल वस्तू इकडे तिकडे हलवू शकतो, परंतु सूक्ष्म संकल्प - विकल्पांवर, आपल्या आंतरिक विकारांवर विजय मिळवण्यासाठी दडपून टाकणे, पळून जाणे आणि पराङ्मुख होणे हे धोरण योग्य नाही. प्रतिक्रिया न देता त्यांच्याकडे जागरुकतेने आणि तटस्थतेने पाहणे हे योग्य धोरण आहे. असे केल्याने त्यांची शक्ती हळूहळू कमी होत जाते आणि शेवटी ते पूर्णपणे संपून जातात. विकारांचा समूळ नाश करण्यासाठी विपश्यनेची पद्धत रामबाणासारखी अचूक आहे.

विपश्यनाचार्य सत्यनारायण गोयंका यांनी ही गोष्ट अगदी स्पष्टपणे समजावून सांगितली आहे.

मनात कोणताही विकार निर्माण झाला की त्याला वाचन, विचार किंवा इतर कोणत्याही कामात गुंतवून ठेवणे म्हणजे वास्तवापासून दूर पळण्यासारखे आहे. जे मन इतर कामासाठी वापरले जाते ते वरवरचे चेतन मन आहे. आतील अवचेतन, अर्धचेतन मन तर क्षुब्ध होते आणि एखाद्या दोरीप्रमाणे आतून गाठी बांधत आकसून राहते. भविष्यात जेव्हा जेव्हा या गाठी जागृत मनावर उमटतील तेव्हा त्या अधिक अशांतता आणि अस्वस्थता निर्माण करतील.

'मनात विकार का येतात ? यावर जास्त चर्चा न करता त्यापासून मुक्ती कशी मिळवायची यावर चर्चा करूया. रागाचा विकार मनात जागृत झाला तर त्यापासून मुक्त होण्यासाठी काय करावे ? विपश्यनाचार्य गोयंकाजींचे विचार लक्षात घेण्याजोगे

आहेत - 'राग आला की, तो जसा आहे तसा बघा. बघत रहा यामुळे राग शांत होईल. त्याचप्रमाणे जागृत झालेल्या विकाराकडे तो जसा आहे तसे पाहिले तर त्याची शक्ती कमी होते.' पण प्रश्न पडतो की, राग हा अमूर्त आहे. आपण साक्षीभावाने त्याचे निरीक्षण कसे करू शकतो? विपश्यनाचार्य सत्यनारायण गोयंकाजी भगवान बुद्धांच्या निष्कर्षांबद्दल असे म्हणतात की,

'त्या महापुरुषाने निसर्गातील सत्याचा खोलवर शोध घेतल्यावर त्याला असे दिसले की, जेव्हा जेव्हा कोणत्याही कारणाने मनात कोणताही विकार निर्माण होतो तेव्हा श्वासाच्या गतीमध्ये एक विकृती निर्माण होते आणि दुसरे म्हणजे शरीराच्या अवयवांमध्येही सूक्ष्म पातळीवर काही जैव-रासायनिक प्रतिक्रिया होऊ लागते. या दोघांना पाहण्याचा सराव केला, तर अप्रत्यक्षपणे आपल्या मनातील विकार पाहण्याचेच काम होऊ लागते आणि हे विकार आपसूकच नाहीसे होऊ लागतात. श्वासोच्छ्वासाचे निरीक्षण करण्याच्या सरावाला 'आनापानसती' असे म्हणतात आणि शरीरात होणाऱ्या जैव-रासायनिक क्रिया पाहण्याच्या सरावाला विपश्यना' म्हणतात.

साक्षीभावाने पाहणे म्हणजे, प्रतिक्रिया न देता तटस्थपणे पाहणे. का ? कारण आनंददायी संवेदनांची आसक्ती असेल तर आसक्ती वाढेल आणि दु:खद संवेदनांचा तिरस्कार होईल. इथेच आपल्याला ही गोष्ट समजून घ्यायची आहे आणि हे वारंवार जाणवून आपण हे समजून घेऊ शकतो की, कोणतीही वेदना शाश्वत नसते. मग जे अशाश्वत आहे त्याबद्दल कसली आसक्ती, कसला द्वेष ?

भगवान बुद्धांनी प्रतीत्यसमुत्पादाच्या नियमाने हे स्पष्ट केले आहे की वेदना तृष्णेला जन्म देते **'वेदना पच्चया तण्हा'** आणि वेदनेचे निवारण केल्याने तृष्णेचे निवारण होते- **'वेदना निरोधा तण्हा निरोधो'**.

विपश्यनेचे अनंत फायदे आहेत. एक, जेव्हा प्रत्येक दु:खाकडे तटस्थ वृत्तीने पाहिले जाते, तेव्हा ती प्रज्ञेस जागृत करते सर्व काही अशाश्वत, नश्वर आहे हे प्रत्यक्ष ज्ञान उत्पन्न करते. आसक्ती ही नश्वरतेच्या जाणिवेतून निर्माण होत नाही आणि जेव्हा आसक्ती नष्ट होते तेव्हा खरे वैराग्य निर्माण होते. नवे संस्कार घडणे थांबते. ते बनणेच थांबत नाही तर जुनेही राहू लागतात.

**खीणं पुराणं नवं नत्थि संभवं ।**

म्हणजेच नवे निर्माण होत नाही आणि जुने क्षीण होत राहते. हे कसे घडते? याचा साधर्म्याने विचार करा. आग सतत जळत राहण्यासाठी इंधनाची गरज असते. जर आपण इंधन टाकले तर आग भडकेल. जर तुम्ही इंधन टाकणे बंद केले तर आधीपासून असलेल्या इंधनाच्या मदतीने ते संपेपर्यंत ती आग जळत राहते आणि नंतर विझते. विपश्यनेत असेच घडते. जेव्हा आपण आपल्या दुर्गुणांकडे तटस्थ वृत्तीने पाहतो तेव्हा आपण नवीन आसक्ती आणि तिरस्काराचे संस्कार निर्माण करत नाही आणि आपल्या आत संचयित केलेले संस्कार बाहेर येऊन जळून जातात. या प्रक्रियेला म्हणतात **फुस्स फुस्स व्यन्तीकरोति।**

जे संस्कार येतात त्यांच्याकडे प्रेक्षक असल्याच्या भावनेने पाहण्याऐवजी द्रष्ट्याच्या भावनेने पाहिल्यास ते आपल्याला स्पर्श करतात आणि त्या ठिणग्यांसारखे पटकन विझून जातात ज्यांना तेल आणि वात मिळत नाही.

या प्रक्रियेद्वारे आपण आपल्यातील विकार बाहेर काढून आपले मन शुद्ध करू शकतो.

म्हणूनच माझ्या मते, आयुर्वेदात जी सत्त्वावजय उपचार पद्धती आहे ती शमथची भावना आहे. त्याऐवजी विपश्यनेच्या भावनेने उपचार केले तर मानसिक विकारांच्या रूपात जे मनोरोग असतात त्यांचे निदान तर होईलच आणि विकारांमुळे स्थूल शरीराला झालेल्या रोगांचेही निदान होईल आणि लोक विपश्यना करता-करताच भवरोगांपासूनही मुक्त होतील.

विपश्यनेची साधना करण्यासाठी, अष्टपदी मार्गावर चालण्यासाठी निरोगी असणे आवश्यक आहे. शारीरिक आणि मानसिक रोगांपासून मुक्त व्हायचेच आहे. भगवान बुद्धांनी असेही म्हटले आहे की साधकाने **'अप्पाबाधो तथा अप्पातङ्गो'** असणे आवश्यक आहे. ही एक आवश्यक अट आहे.

या दिशेने आयुर्वेदाची भूमिका खूप महत्त्वाची आहे. तो आपल्याला **'अप्पाबाधो तथा अप्पातङ्गो'** बनवतो, आपल्या शारीरिक आणि मानसिक व्याधी दूर करतो आणि अष्टांगिक मार्गावर कठोर परिश्रम करण्यास सक्षम करतो. जर आयुर्वेदाच्या वैद्यकीय पद्धतीमध्ये विपश्यनेचा समावेश केला तर शारीरिक व्याधीग्रस्त व्यक्तीला तात्काळ लाभ तर मिळेलच, म्हणजेच शारीरिक व मानसिक रोगांपासून मुक्ती तर मिळेलच, भवरोगांपासून मुक्ती मिळण्याचा मोठा फायदाही होईल. 'सत्त्वावजयास' शमथापुरते मर्यादित न ठेवता विपश्यनेपर्यंत नेले पाहिजे.

## विध्वंसाबाबत सिंहाचे प्रश्न

**- पॉल कॅरस**

त्यावेळी नगराच्या सभागृहात अनेक प्रतिष्ठित नागरिक बसून भगवान बुद्ध, धम्म आणि संघ यांची विविध प्रकारे स्तुती करीत होते. निग्रंथ पंथाचे शिष्य आणि मुख्य सेनापती सिंह हेही त्यांच्यामध्ये बसले होते आणि सिंहाने विचार केला, 'भगवान अर्हत हेच योग्य ज्ञानी आहेत. मी जाऊन त्यांना भेटेन.'

तेव्हा सेनापती सिंह निग्रंथ पंथाचा प्रमुख ज्ञातपुत्र यांच्याकडे गेले आणि म्हणाले, स्वामी! मला श्रमण गौतमाला भेटायला जायचे आहे.

ज्ञातपुत्र यांनी उत्तर दिले, "सिंहा, तुझा कर्मांच्या नैतिक पुण्य फळावर विश्वास आहे, मग कर्मांचे परिणाम नाकारणाऱ्या श्रमण गौतमाला भेटायला का जातोस? अरे सिंहा! श्रमण गौतम कर्मांच्या फळावर विश्वास ठेवत नाही. तो निष्क्रियतेचा सिद्धांत शिकवतो आणि तो आपल्या शिष्यांना याचीच दीक्षा देतो!"

तेव्हा सेनापती सिंह यांची भागवतांना पाहण्याची इच्छा धुळीस मिळाली.

बुद्ध, धर्म आणि संघाची स्तुती ऐकून सिंहाने पुन्हा निग्रंथाच्या प्रमुखाची परवानगी मागितली आणि पुन्हा ज्ञातपुत्राने त्याला रोखले.

तिसऱ्यांदाही सेनापती सिंह यांनी काही प्रतिष्ठित व्यक्तींना बुद्ध, धर्म आणि संघ यांची स्तुती करताना ऐकले तेव्हा त्यांना वाटले, 'श्रमण गौतम हे निश्चितच अर्हत बुद्ध आहेत. मला निग्रंथांच्या परवानगीची गरज नाही. त्यांच्या परवानगीशिवायच मी भगवान् अर्हत बुद्ध यांना भेटायला जाईन.'

आणि सेनापती सिंह भगवतांना म्हणाले, भंते! मी ऐकले आहे की, श्रमण गौतम कर्माचे परिणाम नाकारतात, ते 'निष्क्रियतेच्या सिद्धांता' ची शिकवण देतात आणि त्यांचे असे मत आहे की, सचेतन प्राण्यांना त्यांच्या क्रियाकलापांचे फळ मिळत नाही. मी ऐकले आहे की, बुद्ध सर्व गोष्टींचा शेवट आणि घृणा यांची शिकवण देतात आणि ते आपल्या शिष्यांना याचीच दीक्षा देतात. तुम्ही आत्म्याचा नाश आणि माणसाच्या अस्तित्वाचे दहन यांची शिकवण देता का? भन्ते! कृपया मला सांगा की, असे म्हणणारे खरे बोलत आहेत की ते भगवानांच्या विरुद्ध खोटे पुरावे देऊन एक खोटा धर्म हा त्यांचाच धर्म असल्याचे सांगत आहेत?

'भगवान म्हणाले, सिंह!' एका रूपात ते माझ्याबद्दल सत्य सांगतात आणि दुसऱ्या रूपात जे त्याच्या उलट बोलतात तेही सत्यच सांगतात. ऐक, मी तुला सांगतो.

"ज्या मनसा वाचा कर्मणा शील यांच्या विरुद्ध आहेत, अशा कृती करू नका असा मी उपदेश करतो. मी असे शिकवतो की, मनाच्या त्या अवस्थांना जन्म देऊ नका, ज्या वाईट आणि चुकीच्या आहेत, पण हे सिंह! मी मनसा-वाचा- कर्मणा सदाचारांनी परिपूर्ण अशा कृती करायला शिकवतो. मी त्या अवस्था निर्माण करण्याबद्दल बोलतो ज्या योग्य आणि पवित्र आहेत."

"हे सिंह! मी असे शिकवतो की, मनाच्या वाईट आणि चुकीच्या अवस्था आणि मनसा वाचा कर्मणा अयोग्य कृतींचे दहन केले पाहिजे." "हे सिंह! ज्याने स्वत:ला वाईट आणि चुकीच्या मन:स्थितीपासून मुक्त केले आहे, ज्याने त्यांना ताडाच्या झाडासारखे उपटून टाकले आहे जेणेकरून त्या पुन्हा उद्भवू नयेत, त्या मनुष्याने आत्म्याचा नाश केला आहे."

"हे सिंह ! मी अहंकार, आसक्ती, माया आणि वैर यांच्या नाशाबद्दल बोलतो; परंतु प्रेम, सहिष्णुता, सत्य आणि परोपकाराच्या नाशाची शिकवण देत नाही."

"हे सिंह! मी मानस-वाचा-कर्मणा अयोग्य कृत्ये यांना तिरस्कारास पात्र मानतो, परंतु, मी सद्गुण आणि सदाचार यांना स्तुतीस पात्र मानतो.

यावर सिंह म्हणाला, भगवानांच्या तत्त्वांबद्दल माझ्या मनात अजून एक शंका आहे. भगवान माझ्या मनातील हे संशयाचे ढग दूर करतील का, जेणेकरून मला भगवानांनी सांगितलेल्या धर्माचे आकलन होईल."

तथागतांनी परवानगी दिल्यावर सिंह पुढे म्हणाले, भगवान! मी एक योद्धा आहे आणि मला राजाचे कायदे अंमलात आणण्यासाठी आणि त्याच्यासाठी लढण्यासाठी नेमण्यात आले आहे. असीम दयाळूपणा आणि दु:खी लोकांना सहानुभूती दाखविण्याची शिकवण देणारे तथागत गुन्हेगारांना शिक्षा होऊ देणार का? आणि स्वत:चे कुटुंब, पत्नी, मुले आणि संपत्ती यांच्या रक्षणासाठी लढणे चुकीचे आहे असे तथागत म्हणतील का? दुष्टाचा जुलूम सहन करून माझा हक्क बळजबरीने हिसकावून घेणाऱ्यापुढे नतमस्तक व्हावे म्हणून तथागत शरणागतीचे तत्त्व

शिकवतील का ? सर्व संघर्ष जरी ते न्याय्य कारणासाठी असले तरी तो निषिद्ध आहे असे तथागतांचे मत आहे का ?

भगवान बुद्धांनी उत्तर दिले, "जो शिक्षेस पात्र आहे त्याला शिक्षा झाली पाहिजे आणि जो दयाळू आहे त्याला दयाळूपणा दाखवला पाहिजे. परंतु, त्याच वेळी तथागत कोणत्याही जीवाला न दुखवण्याचा आणि प्रेम आणि करुणेने परिपूर्ण राहण्याचा उपदेश करतात. हे उपदेश विरोधाभासी नाहीत, कारण एखाद्या गुन्ह्यासाठी शिक्षा झालेल्या व्यक्तीला न्यायाधीशाच्या द्वेषामुळे नव्हे, तर त्याच्या स्वत:च्या गैरवर्तनामुळे शिक्षा दिली जाते. नियमांचे पालन करणाऱ्याला होणारी हानी ही स्वत: त्या गुन्हेगाराच्या चुकीच्या कृत्यांमुळेच होते. शिक्षा देताना न्यायाधीशांनी आपल्या मनात कोणताही द्वेष ठेवू नये आणि मृत्युदंड मिळालेल्या गुन्हेगाराने हे आपल्याच कृत्यांचे फळ आहे, असे समजावे. शिक्षेमुळे त्याचे अंत:करण शुद्ध होईल हे त्याला कळताच तो त्याच्या नशिबाला दोष देऊन दु:खी होण्याऐवजी आनंदी होईल.

आणि भगवान म्हणाले, तथागत शिकवतात की, प्रत्येक युद्ध, ज्यामध्ये एक माणूस दुसऱ्याला मारतो ते खेदजनक असतो. परंतु तथागत हे शिकवत नाहीत की जे लोक शांतता राखण्यासाठी सर्व शक्य प्रयत्नांमध्ये अपयशी ठरल्यानंतर न्याय्य कारणांसाठी युद्ध करतात ते निंदनीय आहेत; परंतु जो युद्धाचे कारण निर्माण करतो, तो निश्चितच दोषी आहे.

"तथागत नक्कीच स्वचे पूर्ण समर्पण करायला शिकवतात, परंतु ते कोणालाही वाईट शक्तींपुढे, मग ते मानव, देवता किंवा नैसर्गिक घटक असोत, शरणागती पत्करायला शिकवत नाहीत. कुठेही गेलात तरी संघर्ष हा असणारच, कारण संपूर्ण जीवन हा एक प्रकारचा संघर्षच आहे, परंतु संघर्ष करणारा हा सत्य आणि सदाचार यांच्याविरुद्ध लढतोय की काय हेही पाहावे लागेल.

"जो स्वत: च्या हितासाठी संघर्ष करतो, जेणेकरून तो शक्तिशाली, महान, श्रीमंत किंवा प्रसिद्ध व्हावा, तर त्याला कोणतेही चांगले प्रतिफळ मिळणार नाही; परंतु जो सत्याच्या आणि नीतिमत्तेच्या बाजूने लढतो त्याला सर्वोत्तम प्रतिफळ मिळेल, कारण त्याचा पराभवदेखील एक विजयच असेल.

'स्व' ला कोणतेही मोठे यश मिळू शकत नाही, 'स्व' लहान आणि क्षणभंगूर आहे आणि इतरांच्या भल्यासाठी आणि कदाचित शापासाठी देखील त्याचे तुकडे होऊन पडतात.

परंतु, सत्य हे सर्व आत्म्यांच्या आशा आणि आकांक्षा कवेत घेण्याइतके मोठे आहे आणि जेव्हा 'स्व' हे पाण्याच्या बुडबुड्यांसारखे फुटतात, तेव्हा त्यांचे भाग सत्यात संरक्षित होतात आणि अमर जीवन प्राप्त करतात.

हे सिंह! जो युद्धावर जातो, मग जरी तो न्याय्य कारणासाठी जात असला तरी, त्याने शत्रूकडून मारले जाण्याची तयारी केली पाहिजे, कारण तीच योद्धयांची नियती आहे आणि जरी त्याच्या नियतीने त्याला गाठले तरी त्याने तक्रार करण्याचे कारण नाही.

परंतु जो विजयी आहे त्याने भौतिक गोष्टींची क्षणभंगुरता लक्षात ठेवली पाहिजे. त्याचे यश मोठे असू शकते, परंतु, तरीही, नशिबाचे चाक पुन्हा फिरू शकते आणि त्याला धुळीला मिळवू शकते.

पण जर त्याने स्वत:ला मोठे केले आणि त्याच्या अंत:करणातील सर्व द्वेषभावना नाहीशी करून, आपल्या पतित झालेल्या शत्रूला उठवले आणि म्हटले, चल, आता समझोता करूया, आपण मित्र बनूया, तर तो असा विजय मिळवू शकतो, जे तात्पुरते यश नसेल, तर ज्याचे परिणाम सदैव टिकून राहतील.

हे सिंह ! कोणताही यशस्वी सेनापती महान असतो, परंतु ज्याने आत्म्याला जिंकले आहे तो सर्वोत्तम विजेता असतो.

हे सिंह, आत्म-विजयाचे हे तत्त्व माणसांचा नाश करत नाही, तर त्यांचे रक्षण करते. ज्याने स्वत:वर विजय मिळवला आहे तो जीवनासाठी, यशासाठी, विजयासाठी अधिक पात्र आहे, जो स्वत:चा दास आहे तो त्याच्यापेक्षा अधिक पात्र आहे.

ज्याचे मन स्वत:च्या भ्रमातून मुक्त होते, तो जीवनाच्या संघर्षात पडण्याऐवजी उभा राहतो.

जो न्याय आणि सदाचाराच्या बाजूने आहे तो अपयशी होत नाही, तर तो त्याच्या प्रयत्नात यशस्वी होतो आणि हे यश चिरस्थायी असते. जो आपल्या अंत:करणात सत्याचे प्रेम जपतो, तो मरत नाही, तर जगतो, कारण तो अमरत्वाचे पाणी पितो.

'हे सेनापती! हे लक्षात घेऊन तू धैर्याने लढ, आपले युद्ध शौर्याने लढ, परंतु सत्याचा योद्धा बनून. तरच तथागत तुम्हाला आशीर्वाद देतील.

भगवतांनी असे सांगितल्यावर सेनापती सिंह म्हणाले, आश्चर्य ! भन्ते! आश्चर्य! तुम्ही सत्य उघड केले आहे. भगवानांचा

धर्म सर्वश्रेष्ठ आहे. तुम्ही निश्चितच अर्हत बुद्ध, तथागत आहात. तुम्ही मानवतेचे उपदेशक आहात. तुम्ही मोक्षाचा मार्ग दाखवला आहे आणि हाच खरा मोक्ष आहे. तुमच्या अनुयायाला मार्ग प्रकाशित करणारा प्रकाश नक्कीच सापडेल. त्याला शांती आणि आनंद मिळेल. भन्ते ! मी भगवान, धर्म आणि संघ यांना शरण जातो. भगवानांनी आजपासून माझ्या आयुष्याच्या शेवटपर्यंत माझा शरणागत शिष्य म्हणून स्वीकार करावा

आणि भगवान म्हणाले, सिंह! आधी चांगला विचार कर, कारण तुझ्यासारख्या उच्चपदावर असलेल्या व्यक्तीने चांगला विचार केल्याशिवाय काहीही करू नये.

हे ऐकल्यावर सिंहाचा भगवानांवरील विश्वास आणखी वाढला. त्याने उत्तर दिले: भंते! इतर धर्मगुरू मला त्यांचा शिष्य बनवण्यात यशस्वी झाले असते, तर त्यांनी सर्व वैशाली शहरात दवंडी पिटविली असती की, 'सेनापती सिंह आमचे शिष्य झाले आहेत.' पुन्हा एकदा भन्ते! मी भगवान, धर्म आणि संघ यांना शरण जातो. भगवानांनी आजपासून माझ्या आयुष्याच्या शेवटपर्यंत माझा शरणागत शिष्य म्हणून स्वीकार करावा.

भगवान म्हणाले, 'हे सिंह, तुमच्या घरी अनेक वर्षांपासून निग्रंथांना भेटवस्तू दिल्या जात आहेत. म्हणून, भविष्यातही जेव्हा ते भिक्षेसाठी येतील तेव्हा भेटवस्तू आणि देणग्या द्याव्यात.

हे ऐकून सिंहाचे मन आनंदाने भरून आले. तो म्हणाला, भन्ते! मी ऐकले होते की, श्रमण गौतम म्हणतात की, फक्त मला आणि माझ्या शिष्यांनाच भेटवस्तू द्या, परंतु भगवान मला ते निग्रंथांनाही देण्याची भेटवस्तू देण्याची आज्ञा देत आहेत. भन्ते! आम्ही न्याय्य वस्तुस्थिती पाहू. तिसऱ्यांदा, भन्ते! मी भगवान, धर्म आणि संघ यांना शरण जातो.


**TATHAGAT PUBLICATIONS**

*Arvind Bhandare*
Proprietor

• Books on Buddhism •Books on Pali Language •Books on Ambedkarism
• Buddhist Children Books •Buddhist Calender •Buddhist Year Diary •Lantern / Flag
• T-Shirt / Caps •Dhamma Tour •Buddha Statue

Web: tathagattours.in • Mob. : 9967692014


## धम्म अज्झयन चारिका

| | | |
|---|---|---|
| जानेवारी 2023 | :- | 29 जानेवारी ते 9 फेब्रुवारी (बोधगया, सारनाथ, श्रावस्ती, लुम्बिनी, कपिलवस्तू, कुशीनगर, वैशाली, नालंदा, राजगिर, डुंगेश्वरी) |
| फेब्रुवारी 2023 | :- | 15 फेब्रुवारी ते 21 फेब्रुवारी दक्षिण भारत (सन्नती, नागार्जुन कोंडा, अमरावती) |
| ऑक्टोबर 2023 | :- | 29 ऑक्टोबर ते 9 नोव्हेंबर (बोधगया, सारनाथ, श्रावस्ती, लुम्बिनी, कपिलवस्तू, कुशीनगर, वैशाली, नालंदा, राजगिर, डुंगेश्वरी) |
| नोव्हेंबर 2023 | :- | सांची महोस्तव 26 नोव्हेंबर ( सांची, महू, सतधारा, सोनारी, मुरेलखुर्द, अंधेर ) |

## कुशल कर्माचा मूलाधार शील

**– भन्ते शुभमचित्त**

मानवाचे सुख हेच भगवान बुद्धांच्या धम्माचे एकमेव उद्दिष्ट आहे. संपूर्ण मानव समाजाचे कल्याण हेच भगवानांच्या धम्माचे एकमेव ध्येय आहे. बुद्धत्व प्राप्त केल्यानंतर आपल्या पहिल्या प्रवचनात त्यांनी चार उदात्त सत्ये आणि अष्टपदी मार्ग भिक्षूंच्या पाच वर्गांना सांगितला. ज्याला पाली आणि बौद्ध साहित्यात 'धम्मचक्कपवत्तन' म्हणून ओळखले जाते. त्यानंतर त्या पाच भिक्षूंच्या पश्चात एकसष्ट भिक्षूंचा संघ स्थापन झाला. त्यांना आज्ञा देताना भगवान म्हणाले,

चरथ भिक्खवे चारिकं बहुजनहिताय बहुजनसुखाय लोकानुकम्पाय अत्थाय हिताय सुखाय देवमनुस्सानं ।

यावरून हे स्पष्ट होते की भगवान बुद्धांचा धम्म बहुजन हिताय बहुजन सुखाय यासाठीच आहे. भगवान बुद्धांच्या धम्मात सांसारिक सुख असो वा इतर ऐहिक सुख, त्याच्या प्राप्तीसाठी ज्या पद्धतीचा अवलंब करावा लागतो त्याला 'आचार' असे म्हणतात. बौद्ध धर्मात याला स्थूलमानाने 'विनय' असे म्हणतात. विनय म्हणजे कृतीत शिस्त आणि वचनात सदाचरण. विनय म्हणजे जीवन जगण्याचा योग्य मार्ग म्हणूनच बुद्धवचनांमध्ये केवळ सैद्धांतिक चर्चा, उपदेश आणि तत्त्वज्ञान नाही तर प्रत्यक्ष कृती आणि आचरणाच्या विविध पद्धती वर्णन केल्या आहेत. बुद्धवचनात केवळ तात्त्विक चर्चाच नाही, तर प्रत्यक्ष कृतीवरही विशेष भर दिला गेला आहे. त्याला 'धम्म विनय' म्हणतात. तथागत हे तत्त्व आणि आचरण या दोन्ही गोष्टींवर वर्चस्व स्थापित केल्यामुळेच त्यांना **'विज्जाचरणसम्पन्नो'** असे म्हणतात. तथागताचा अर्थही यासाठीच आहे. तथागत म्हणजे जो उपदेश करतो, तो स्वत: त्या मार्गावर चालतो तो.

तथागतांच्या धम्माचा मुख्य केंद्रबिंदू माणूस आहे. त्यांनी सर्वप्रथम दु:खी मानवतेला दु:ख आर्यसत्याचा उपदेश दिला. भगवानांनी सांगितलेल्या सत्यांना आर्य का म्हटले गेले ? बुद्धपूर्व काळात लोकांना दु:खाचे ज्ञान नव्हते का? या प्रश्नांच्या अनुषंगाने असे म्हणता येईल की भगवान बुद्धांपूर्वीही लोकांना दु:खाबाबत जाणीव होती, परंतु त्यांना फक्त दु:खच माहीत होते. तथागतांनी अनुकंपा करून केवळ दु:खाला सत्याच्या पातळीवर स्वीकारण्यासच सांगितले नाही, तर दु:खाचे कारण, त्याचे निराकरण आणि त्यावरचे उपायही सांगितले. दु:ख सत्य हे या कारणांनी आर्य सत्य आहे की, ते सतत तीन सत्यांसह आहे. भगवानांनी केवळ एक सत्य किंवा अर्धसत्य सांगितले नाही, तर त्यांनी चार आर्यसत्यांच्या स्वरूपात संपूर्ण सत्याचा उपदेश केला.

तथागत हे ऐहिक दु:ख नष्ट करण्याचा उपदेश करतात. ते दु:ख जे वर्तमानात तर दु:खदायक आहेच, पण पुन: पुन्हा या जगात येत राहून अनंत जन्मापर्यंत दु:ख देत राहते.

त्यापासून मुक्ती हाच भगवानांच्या उपदेशाचा विषय आहे. तथागत आपल्या पहिल्या वचनात म्हणतात,

**अनेक जाति संसार सन्धाविस्सं अनिब्बिस**
**गहकारक गवे सन्तो, दुक्खा जाति, पुनप्पुनं ।।**
**गहकारक ! दिट्ठोसि, पुनगेहं न काहसि ।**
**सब्बा ते फासुका भग्गा, गहकूटं विसङ्खतं ।**
**विसङ्खारगतं चित्तं तण्हानं खयमज्झगा ॥**

म्हणजेच गृहकारकाच्या शोधात मी अनेक जन्म संसारात अखंड धावत राहिलो. पुन्हा पुन्हा जन्म घेणे हे दु:ख आहे. गृहकारक तू दिसलास. आता तू पुन्हा घर बांधू शकणार नाहीस. तुझे सर्व दुवे तुटले आहेत. घराचा वरचा भाग ढासळला होता. चित्त संस्काररहित झाले आहे. तृष्णेचा क्षय झाला आहे.

वरील कथेवरून हे स्पष्ट होते की, पुनपुन्हा जन्म घेणे म्हणजे दु:ख होय. या दु:खी मानवतेसाठी त्यांनी दु:खापासून पराकोटीची निवृत्ती घेऊन निर्वाण, परम सुखाची प्राप्ती करावी हेच बरे. भगवंताचा आर्य अष्टांगिक मार्ग दु:खांपासून मुक्तीसाठी आहे. तो तीन भागात विभागलेला आहे; जसे की, पञ्ञा, सील आणि समाधी. सांगताना असे म्हटले आहे की,

**मग्गानट्ठङ्गिको सेट्ठो सच्चानं चतुरो पदा**
**विरागो सेट्ठो धम्मानं द्विपदाञच चक्खुमा ॥**

म्हणजेच, मार्गांपैकी अष्टांगिक मार्ग सर्वोत्तम आहे, सत्यांमध्ये चार आर्य सत्ये सर्वश्रेष्ठ आहेत, धर्मामध्ये वैराग्य सर्वोत्कृष्ट आहे आणि चक्षुमान (बुद्ध) सर्वोत्तम आहे. अशा प्रकारे सर्व मार्गामध्ये या मार्गाचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे. जे शोक, दु:ख आणि पाखंड यांचा नाश करून परमसुख निर्वाणाच्या प्राप्तीसाठी हितकारक आहे. ज्ञानप्राप्तीसाठी या मार्गाचे श्रेष्ठत्व अशा प्रकारे सांगितले आहे;

**एसो व मग्गो, नत्थ दस्सनस्स विसुध्दिया ।**
**एतं हि तुम्हे परिपज्जथ मारस्सेतं पमोहनं ।।**

ज्ञान मिळवण्याचा हाच (एक) मार्ग आहे दुसरा नाही. भिक्खूंनो! तुम्ही या मार्गावर चालत जा. हा माराला मुर्छित करणारा आहे.

अशाप्रकारे या मार्गाच्या सुरुवातीला प्रज्ञाबाबत सांगितले आहे, मध्यभागी शील आणि शेवटी समाधी, असा हा क्रमागत मार्ग आहे-

| | |
|---|---|
| सम्यक दृष्टी | |
| सम्यक संकल्प | प्रज्ञा |
| सम्यक वाचा | |
| सम्यक कर्म | शील |
| सम्यक आजीव | |
| सम्यक व्यायाम | |
| सम्यक स्मृती | समाधी |
| सम्यक समाधी | |

अष्टांगमार्गाच्या क्रमाबाबत अशा प्रकारे सांगितले गेले आहे. पण व्यवहारात मात्र, शील, समाधी आणि प्रज्ञेचा वापर अशा प्रकारे केला जातो. या मार्गावरील वाटचालीची सुरुवात शीलापासून होते. संयुक्तनिकायच्या देवता संयुक्तात म्हटले आहे की,

**सीले पतिट्ठाय नरोसपञ्ञ चित्तं पञ्ञच भावयं ।**
**आतापी निपको भिक्खु सो इमं विजटये जटं ॥**

म्हणजेच जी व्यक्ती शीलामध्ये स्थापित आहे आणि जिला समाधी आणि विपश्यनेची अनुभूती आहे, ती तृष्णेच्या रूपातील जरा समूहास भेदते. तृष्णारूपी जरा समूह नष्ट करण्यासाठी शीलाची प्रस्थापना करणे अत्यंत आवश्यक आहे हे स्पष्ट आहे. शील हाच धम्माची सुरुवात आणि पाया आहे. बुद्धाच्या धम्माचे आचरण करण्यासाठी सुरुवातीला शीलाकडेच निर्देश केला आहे. श्रमणांसाठी अष्टमी, चतुर्दशी आणि पौर्णिमा या दिवसांसाठी पाळावयाचे अष्टशील आणि सामान्य उपासकांसाठी दैनंदिन जीवनात पाळायचे पंचशील सांगितले आहे. शील म्हणजे प्रत्येक मनुष्याने पाळावे असे आचरणाचे नियम. हे नियम असे आहेत की पृथ्वीवर जिथे जिथे माणूस राहतो आणि समूहाने राहतो; तिथे-तिथे त्यांचा अवलंब करता येईल. सदाचरणाचे हे नियम मनुष्याच्या सुखाचे कारण नक्कीच आहेत. शीलांचे पालन करण्यासाठी कोणत्याही देवावर श्रद्धा ठेवण्याची, कोणतेही कर्मकांड करण्याची किंवा कोणतेही व्रत विधी पाळण्याची गरज नाही. शीलांचे पालन हे आपल्या आचरणाशी संबंधित आहे. यामध्ये जागृत राहून, सावध मनाने, वस्तुनिष्ठ पद्धतीने, आपल्या कर्मावर व शब्दांवर योग्य नियंत्रण व लक्ष द्यावे लागते. ही स्वत:च अनुसरण करण्यायोग्य आहेत; स्वत:वर नियंत्रण ठेवावे लागेल, संयम ठेवावा लागेल, मर्यादांचे पालन करावे लागेल. धम्मपदात म्हटले आहे-

**चक्खुना संवरो साधु साधु सोतेन संवरो ।**
**धाणेन संवरो साधु साधु जिह्वाय संवरो ॥**

डोळयावरील नियंत्रण चांगले असते, कानावरील नियंत्रण चांगले असते, नाकावरील नियंत्रण चांगले असते, जिभेवरील नियंत्रण चांगले असते.

**कायेन संवरो साधु साधु वाचाय संवरो ।**
**मनसा संवरो साधु साधु संयम संवरो ।**
**सब्बत्थ संवुतो भिक्खु सब्बदुक्खा पमुच्चति ॥**

शरीराने संयमी असणे चांगले असते, वाणीत संयम ठेवणे चांगले असते, मनाचे संयमित असणे चांगले असते, सर्व इंद्रियांवर नियंत्रण ठेवणारा भिक्षू सर्व दु:खांपासून मुक्त असतो.

वरील वचनांच्या भावार्थात हेच सांगितले आहे की, शरीर आणि वाणीत संयम ठेवणे चांगले असते. सर्व प्रकारच्या दु:खापासून मुक्त होण्यासाठी संयम आणि शिस्त आवश्यक आहे. शिस्त हाच विनय आहे, ही शिस्तच शील आहे. कोणत्याही कारणाने जर मनुष्य हा त्याच्या जीवनात संयमित नसेल तर तोच त्याच्या दु:खाचे कारण बनतो.

**पापोपि परसति भद्रं याव पापं न पचति ।**
**यदा च पचति पापं अथ पापो पापानि पस्सति ॥**

पापाची फळे मिळत नाही तोपर्यंत पाप्यालाही बरे वाटते. पापाची फळे मिळू लागली की वाईट वाटते.

**भद्रोपि परसति पापं याव भद्रं न पस्सति ।**
**यदा च पच्चति भद्रं अथ भद्रो भद्राणि पस्सति ॥**

चांगले कर्म करणाऱ्यालाही तोपर्यंत वाईट वाटते जोपर्यंत चांगल्या कर्माची फळ मिळत नाहीत. जेव्हा पुण्य कर्माची फळे

मिळतात तेव्हा त्याला चांगले वाटू लागते. भगवान मानवांना सन्मार्गावर चालण्यासाठी मार्गदर्शन करताना पापी कृत्यांच्या दु:खद परिणामांचे किंवा आणि पुण्यकर्माच्या सुखद परिणामांचे विवेचन करत नाहीत. तथागतांनी त्यांच्याच वचनांत सांगितले आहे की, बुद्धाचे शासन अर्थात शिक्षण म्हणजे कुशलतेचे संपादन, अकुशतेचा त्याग आणि मनाची शुद्धी करणे होय.

**सब्ब पापस्स अकरणं कुसलस्स उपसम्पदा।**
**सचित्तपरियोदपनं एतं बुद्धान सासनं ॥**

सर्व पापांपासून दूर राहणे, सत्कर्म करणे, मन शुद्ध ठेवणे हीच बुद्धांची शिकवण आहे.

अशा प्रकारे बुद्धाच्या शिकवणीचे तीन प्रकारे वर्गीकरण करता येते पापकर्मापासून दूर राहणे, पुण्य संचय करणे आणि मन शुद्ध करणे. या त्रिविध कर्माच्या जोरावरच मनुष्य प्रापंचिक दु:खापासून मुक्त होऊ शकतो. भगवान बुद्धांचा धम्म याच दिशेने नेतो. तो कर्मवादी आहे, अकर्मण्यता ही त्याच्या विचारांची बाजू नाही. तथागतांनी शीलाचा उपदेश करताना मनुष्याला स्वत:च्या कुशल कर्माचा भागीदार बनवले आहे. भगवान हे तर फक्त मार्गदर्शक आहेत, निर्वाण (मुक्तीचा मार्ग तर ज्याने त्याने स्वत:च ठरवायचा आहे.)

शीलामध्ये पंचशील, अष्ट शील आणि दहा शील नमूद केले आहेत असे वर सांगितले आहे. पाली भाषेत याला सिक्खापद म्हणजे शिक्षणाचे पद असे म्हटले जाते. वरील सर्व नियमांमधील पहिला उपदेश म्हणजे **'पाणातिपाता वेरमणी सिक्खापदं समादियामि ।'**

पाण + अतिपात = पाणातिपात. 'पाण' म्हणजे प्राण अथवा जीव. अतिपात म्हणजे बोलणे, मारणे किंवा वध करणे.

वेरमणी म्हणजे दूर राहणे, अलिप्त राहणे, विरक्ती. 'सिक्खापदं' म्हणजे शिक्षणाचे पद आणि 'समादियामि' म्हणजे संपादन करणे.

येथे हे अगदी स्पष्ट आहे की, आपल्यासाठी आणि इतरांसाठी हानिकारक किंवा दु:खदायक असलेल्या कृतींपासून आपण दूर राहिले पाहिजे. या शिकवणी लादल्या जात नाहीत किंवा त्यांचे पालन करण्यास भाग पाडले जात नाही. मनुष्य स्वत: ठरवतो की, त्याने या अशुभ कृतीपासून दूर राहण्याची शिकवण स्वीकारली आहे. प्रत्येक माणसाचे स्वत:चेच स्वत:वर नियंत्रण असते. म्हणूनच तथागत म्हणतात-

**अत्ता हि अत्तनो नाथो कोहि नाथो पयो सिया ।**
**अत्तनाव सुदन्तेन नाथं लभति दुल्लभं ॥**

माणूस हा स्वत:चा मालक आहे, दुसरा कोण असू शकतो. जो स्वत:ला दडपतो त्याला दुर्मिळ स्वामीत्व मिळते. प्रस्तुत गाथेतून हे स्पष्ट होते की, आपणच आपला गुरू बनू शकतो. म्हणूनच इतर कोणत्याही सद्‌गुरूच्या अधीन राहण्याची गरज नाही.

पंचसीलमध्ये अनुक्रमे अदिन्नादाना वेरमणिसिक्खापदं समादियामि ।

अदिन्नादाना म्हणजे अदत्त दानापासून दूर राहणे. 'अ' म्हणजे दिलेले नाही. जे दिले नाही ते घेणे म्हणजे चोरी करणे असे समन्वित पद्धतीने म्हणता येईल.

अब्रह्मचरिया वेरमणिसिक्खापदं समादियामि।' म्हणजे अब्रह्मचर्य (मैथुन धर्म) पासून दूर राहणे. हे शील भिक्षू आणि सामणेर यांच्यासाठी निर्दिष्ट केलेले आहे. कामेसुमिच्छाचारा वेरमणि हे गृहस्थाश्रमी उपासकांसाठी निर्दिष्ट केलेले आहे. कामेसुमिच्छा चारा म्हणजे लैंगिक गैरवर्तनापासून दूर राहणे, काम म्हणजे कामवासना, लैंगिक वर्तन, मिच्छाचार म्हणजे दुराचरण.

**मुसावादा वेरमणिसिक्खापदं समादियामि** मुसावाद म्हणजे मुसा असत्य, वाद-बोलण्यापासून दूर राहणे..'

**सुरामेरयमज्जपमादट्ठना वेरमणिसिक्खापदं समादियामि ।** सुरा मेरय मज्ज पमादट्ठाना म्हणजे दारू किंवा मादकपदार्थांचे सेवन करणे टाळणे.

येथे विरतिद्वारे व्यक्तीसाठीच्या व्रतांकडे म्हणजेच संवरांकडे निर्देश केला आहे. 'संवराचे पाच प्रकार आहेत- प्रतिमोक्ष संवर, स्मृती संवर, ज्ञान संवर, क्षांतिसंवर आणि वीर्य्य संवर. या पाच प्रकारच्या व्रतांबरोबरच पापाची भीती असलेल्या घराण्यातील मुलांसमोर येणाऱ्या पापजन्य वस्तूंपासून विरक्ती आहे. ती सर्व व्रते शील म्हणून सांगितली आहेत. शील (आधार, स्थिरता) या अर्थामध्ये शील आहे. याचा अर्थ कार्य कर्म इत्यादींच्या संयमाने एकसमान राहणे किंवा उभे राहण्यासाठीच्या आधारासारखे कुशल- धर्मांचा अंगीकार करणे असा अर्थ आहे. याचा अर्थ पश्चात्ताप न करणे असा आहे.

अंगुत्तरनिकायातील तिक निपतोक्त चुळवग्गमधील आगत सीलवंतसुत्तामध्ये असे म्हटले आहे की, शीलवान प्रव्रजित पुरुष ज्या गावात जातात त्याला तीन प्रकारे पुण्य मिळते. १. शरीराने २. शब्दाने आणि मनाने. आनंद वग्गातील शील व्रत सुत्तामध्ये पुन्हा असे सांगितले आहे की, ज्या शील व्रतांच्या जिवंत धार्मिक आचरणाच्या रूपात केलेल्या साधनेमुळे अकुशल धर्म वाढू लागतो आणि कार्यक्षम धर्माचा -हास होऊ लागतो अशा शीलव्रताचा सेवाभाव निष्फळ होतो; आणि ज्या शील व्रतांच्या जिवंत धार्मिक आचरणाच्या रूपात केलेल्या साधनेमुळे अकुशल धर्म कमी होऊ लागतो आणि कार्यक्षम धर्म वाढू लागतो, अशा शीलव्रताचा सेवाभाव सफल होतो.

पुन: पाणातिपातसुत्तामध्ये भगवान असे म्हणतात की, पुढील चार धर्मांनीयुक्त लोक नरकगामी असतात - (९) पाणातिपाती, (२) चोर (३) व्याभिचारी (४) असत्य बोलणारे. त्याच क्रमाने, मुसावादी लोकांचेदेखील वर्णन नरकात जाणारे असे केले आहे, जसे की, असत्य बोलणारे, चुगली करणारे आणि गोडगोड बोलणारे, आणि प्रलाप करणारे (बकवादी) .

सत्पुरुष वग्गच्या शिक्षापद सूत्रावरून चार प्रकारच्या व्यक्तींचे वर्णन केल्याचे समोर येते. -

१. असत्पुरुष हिंसा, चोरी, व्याभिचार करणारे, खोटे बोलणारे आणि मद्यपान करणारे.

२. अष्टपुरुष जो स्वत: वरील कर्मे करतो आणि इतरांना वरील सर्व गोष्टी करण्यास प्रेरित करतो.

३. वरील पाच क्रिया न करणारा सत्पुरुष.

४. सत्पुरुषापेक्षा मोठा सत्पुरुष - जो स्वत: वरील कृत्ये करतो आणि इतरांनाही तशी कर्मे करण्यास प्रेरित करतो. अशाप्रकारे संपूर्ण पाली साहित्य, ज्याला आपण बुद्धवचन म्हणतो, ते सत्पुरुषांची स्तुती करते आणि दुष्टांची निंदा करते. धम्मपदाच्या पुप्फवग्गामध्ये म्हटले आहे-

**चंदनं तगरं वापि उप्पलं अथ वस्सिकी।**
**एतेसं गन्ध जातानं सीलगन्धो अनुत्तो.**

चंदन, कमळ किंवा जुही यांच्या सुगंधापेक्षा शीलाचाराचा (पुण्य) सुगंध जास्त असतो.

शेवटी, असे म्हणता येईल की, शील हीच मानवी सद्‌गुणांची जननी आहे. मानवामध्ये जे सर्वोत्कृष्ट मानवी सद्‌गुण सांगितले गेले आहेत ते शीलावर आधारित आहेत. प्रत्यक्षात पाहिल्यास मैत्री, करुणा, दया, क्षमा, शांती, दान, परोपकार, त्याग, शौर्य, संयम, सत्य, समाधान, स्वाभिमान आणि स्वावलंबन या सद्‌गुणांचा उदय आणि विकास शीलावरच अवलंबून आहे. तथागतांनी शीलाची स्तुती केली आणि म्हटले- 'हे भिक्षू ! शीलाचे पाच फायदे आहेत. कोणते पाच ?

१. विनयशील व्यक्ती उपद्रवी कार्यात न गुंतल्यामुळे श्रीमंत होते.

२. शीलामुळे त्याची सर्वत्र स्तुती होते.

३. तो निर्भयपणे फिरतो आणि सभेत किंवा परिषदेत तो उपस्थित राहतो.

४. जागृत अवस्थेत त्याला मृत्यू प्राप्त होतो.

५. मृत्यूनंतर, सद्‌गती प्राप्त होते.

अशा प्रकारे संपूर्ण पाली आणि बौद्ध साहित्यात शीलाचे महत्त्व सूचित केले आहे.

**-: आवाहन :-**

**पालि रिसर्च इन्स्टिट्युट, मुंबई च्या वतीने सर्व वाचकांना तसेच सर्व हितचिंतकांना आवाहन करण्यात येते की, बुद्धसासन त्रैमासिक हे बुद्ध धम्मासाठी व पालि भाषेसाठी वाहिलेले एकमेव त्रैमासिक असून या त्रैमासिकाचे प्रकाशन अखंडित सुरु राहण्यासाठी या त्रैमासिकाला आपल्यासारख्या बौद्ध उपासकांकडून जाहिरात व शुभेच्छा (Paid) या माध्यमातून हातभार लावण्याची अपेक्षा आहे! आपण या त्रैमासिकाच्या एका पानाच्या छपाईचा खर्च रु. ५००/- देखील देऊ शकता. ५००/- रु. देणाऱ्या उपासकाचे नाव त्रैमासिकात प्रकाशित करण्यात येईल. आपल्या जाहिरात शुभेच्छा देण्याकरीता संपादकांशी संपर्क साधावा.**

## चिखलात रूतलेला महाबलवान हत्ती

कौशल नरेश कडे बध्दरेक नावाचा एक महाबलवान हत्ती होता. त्याच्या ताकदीचा व पराक्रमाचा बोलबाला दूरपर्यंत पसरला होता. लोक म्हणत असत त्यासारखा हत्ती त्यांनी कधीही पाहिला नाही. मोठे मोठे राजे महाराजे बध्दरेकाला विकत घेऊ इच्छित होते. तो हत्ती आपल्या राज्याची शान बनावा असे अनेकांना वाटत होते. ह्या हत्तीला युध्दातून माघार घेताना कधी कोणी पाहिले नव्हते. कितीही भयंकर युध्द असो, बाणांचा वर्षाव होत असो, भाले फेकले जात असो तो खंबीर पहाडाप्रमाणे उभा असे. त्याचा चित्कार सुध्दा असा होता की शत्रूच्या का ? जाचा ठोका चुकत असे. त्याने आपल्या मालकाची कौशल नरेशची खूप सेवा केली होती. अनेक युध्द त्याला जिंकून दिली होती.

बद्धरेक वृद्ध झाला, राजाच्या सेवेतून निवृत्त झाला तेव्हा तो एका तलावाच्या गाळात, चिखलात अकडला. वृध्दत्वामुळे तो इतका असहाय्य झाला की चिखलातून त्याला आपला एक पायही वर काढता येईना. त्याने अनेक प्रयत्न केले परंतु तो चिखलातून निघू शकला नाही. राजाच्या सेवकांनी देखील बरेच प्रयत्न केले परंतु ते देखील अपयशी ठरले.

त्या महाबलवान महापराक्रमी हत्तीची ही दुर्दशा पाहून सर्वच दुखी झाले. तलावाजवळ बघ्यांची गर्दी जमा झाली, सारा गाव गोळा झाला. राजाच्या कानावर ही बातमी पडताच राजादेखील तलावाजवळ आला व आपल्या जुन्या सेवकाची ही अवस्था पाहून दुखी झाला.

राजाने बद्धरेकाला बाहेर काढण्यासाठी अनेक माहुत बोलाविले परंतु सर्वांनीच हार मानली. तेव्हा राजाला बद्धरेकाच्या जुन्या माहुताची आठवण झाली. तो सुध्दा आता वृद्ध झाला होता, राजाच्या सेवेतून निवृत्त झाला होता. तथागतांचा उपासक होऊन धम्मात रत झाला होता. राजाच्या प्रती माहुताच्या मनात खूप आदर होता तसेच राजालादेखील माहुतावर खूप विश्वास होता. राजाने विचार केला की हा जुना माहुत काहीतरी तोडगा काढू शकेल. कारण बद्धरेक व माहुत या दोघांमध्ये खूप मैत्री होती. दोघं एकमेकांशिवाय राहू शकत नसे.


माहुताला निरोप पाठविला गेला. माहुत जिथे बद्धरेक अकडला होता त्या ठिकाणी पोहचला व त्या अपूर्व हत्तीला पाहून खदखदून हसू लागला. त्याने युद्ध रणभैरी वाजविली, युध्दाचे नगारे वाजविले. त्याचक्षणी तो वृद्ध बद्धरेक आपण वृद्ध आहोत हे विसरून क्षणात जवान झाला. त्याच्यातील झोपलेला योद्धा जागा झाला. क्षणात उसळी मारून तो चिखलातून बाहेर आला. रणभैरी वाजवण्याचा उपाय कामी आला.

अनेक भिक्खू तलावाजवळ बद्धरेकाला पहात होते. त्यांनी हा प्रसंग तथागतांना सांगितला. तेव्हा तथागत काय म्हणाले माहित आहे ? भिक्खूंनो ! त्या अपूर्व हत्तीकडून काही शिका. त्याने तर चिखलातून आपला उद्धार केला परंतु तुम्ही कुठपर्यंत या चिखलात अडकणार आहात ? मी केव्हापासून रणभैरी वाजवत आहे. भिक्खूंनो जागा, संकल्प करा. तो दुर्बल, वृद्ध हत्ती जर हे करू शकतो, तर तुम्ही का नाही ? तुम्ही तर मनुष्य आहात, बुध्दिमान आहात. त्या हत्तीकडून आव्हान शिका, आत्मबल शिका. तुमच्या आत जो झोपला आहे त्याला जागे करा. स्वत:च्या श्रध्दा शक्तीवर विश्वास ठेवा.


आणि पुन्हा बुद्ध म्हणाले - ऐकतंच नाहीत मी केव्हापासून रणभैरी वाजवतोय.

### मी प्रमाण आहे


एरफ़दा एक तरुण भगवान बुद्धांकडे येऊन म्हणाला, आनंद, निर्वाण, मोक्ष यांच्यावर माझा विश्वासच बसत नाही. कृपा करून मला समजावून सांगा. तथागत म्हणाले, 'मला बघ, मला बघून देखील विश्वास बसत नसेल तर , मी तुला समजावून सांगण्यावर कसा तुझा विश्वास बसेल ? मी समोर हजर आहे. मी स्पष्ट प्रमाण आहे, मी साक्ष आहे. आणि जर तू मला पाहू शकत नसशील तर मला ऐकू तरी कसा शकशील ? ज्यांनी मला खऱ्या अर्थाने पाहिले, त्यांना माझे ऐकण्याची जरुरीच वाटली नाही आणि ज्यांनी फक्त ऐकण्यावरच ध्यान दिले, ते मला पाहूच शकले नाहीत.'





किंमत रु. १००/-





किंमत रु. १००/-




मोफत वितरण





किंमत रु. ५०/-





किंमत रु. २००/-




किंमत रु. १००/-





किंमत रु. २००/-





किंमत रु. ५५०/-





किंमत रु. ५०/-




किंमत रु. १५०/-





किंमत रु. २२५/-




किंमत रु. ६०/-




किंमत रु. १००/-



किंमत रु. २००/-